# संयुक्त महाराष्ट्राची माहिती

★

SERVANTS OF INDIA SOCIETY LIBRARY
POONA 4

V2-2(P155).N5

V2-2(P155).N5
H8
063449

# संयुक्त महाराष्ट्राची माहिती

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-063449

संयुक्त महाराष्ट्र परिषद
प्रकाशन ७ वें

तारीख
२५ एप्रिल १९४८

किंमत
तीन रुपये

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | निवेदन .... .... | |
| २ | प्रास्ताविक .... .... .... | १ ते २६ |
| ३ | क्षेत्रविस्तार व लोकसंख्या .... .... | २७ ते ४० |
| ४ | संयुक्त महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न .... | ४१ ते ७२ |
| ५ | संयुक्त महाराष्ट्राची शेती व पिकें .... | ७३ ते १०० |
| ६ | संयुक्त महाराष्ट्रातील उद्योगधंदे .... | १०१ ते १२० |
| ७ | संयुक्त महाराष्ट्राचें हवामान .... .... | १२१ ते १२२ |

# निवेदन

हिंदी संघराज्यांतील मराठी भाषिकांच्या सलग प्रदेशाचा 'संयुक्त महाराष्ट्र' हा एक नवीन प्रांत निर्माण करण्यांत यावा ही संयुक्त महाराष्ट्र परिषदेची मुख्य मागणी आहे. यासंबंधीं महाराष्ट्रांतील लोकमत जागृत करून ही मागणी शक्य तितक्या लवकर पुरी करून घेण्याचे, म्हणजे नवीन होणाऱ्या हिंदी संघराज्याचे घटनेंतच महाराष्ट्राचा—मराठी भाषिकांच्या प्रदेशाचा एक स्वतंत्र प्रांत म्हणून स्पष्टपणें नामनिर्देश केला जावा असे प्रयत्न संयुक्त महाराष्ट्र परिषद करीत आहे. हा आपला जो नवीन भाषावार प्रांत होणार त्याचें भौगोलिक स्वरूप, त्याची लोकसंख्या, त्याची आर्थिक स्थिति—सरकारी उत्पन्न, शेतीचें उत्पन्न, उद्योगधंदे व व्यापार इत्यादि सर्व गोष्टींची माहिती मराठी भाषिकांना असणें जरूर आहे. त्यामुळें ज्या प्रांताची आपण मागणी करतों त्याचें संपूर्ण चित्र आपल्या डोळ्यासमोर उभें राहतें. भाषावार प्रांतरचना आवश्यक आहे याबाबत फारसें दुमत आढळून येणार नाहीं. ह्या प्रश्नाची तात्त्विक बाजू सर्वांना मान्य असते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत हा प्रांत कसा होईल, दिसेल याचें स्पष्ट चित्र त्यांच्या डोळ्यापुढें नसतें. आणि असें स्पष्ट चित्र दृष्टीसमोर नसल्यामुळें पुष्कळ वेळां ही भाषावार प्रांतनिर्मितीची मागणी एक सत् श्रद्धा ठरते. आपली मागणी पुरी करून घेण्याइतकी कार्यप्रवणता जर ती मागणी करणाऱ्यांमध्यें नसेल तर निव्वळ सत् श्रद्धेनें ती पुरी होणार नाहीं. आपल्या मागणीचें संपूर्ण ज्ञान झाल्यानें ती पुरी करून घेण्यासाठीं आपण कार्यप्रवण होतों. मराठी भाषिकांच्या प्रदेशाच्या नवीन होणाऱ्या प्रांताची संपूर्ण माहिती जर प्रत्येक मराठी भाषिकास झाली तर त्यामुळें तो ह्या नवप्रांतनिर्मितीसाठीं अधिक कार्यप्रवण होईल. महाराष्ट्राचा भाषावार प्रांत निर्माण होणें कां जरूर आहे यासंबंधीं संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें पूर्वी कांहीं पत्रकें प्रसिद्ध केलींच आहेत. इतर लेखकांनींहि वर्तमानपत्रद्वारां अगर स्वतंत्र पुस्तक लिहून या प्रश्नाची चर्चा केली आहे. परंतु संयुक्त महाराष्ट्रासंबंधींची संपूर्ण माहिती आजपर्यंत एकत्रित अशी उपलब्ध नव्हती. अशा संपूर्ण माहितीचें एक पुस्तक प्रसिद्ध करावें असें संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकर्त्यांना पुष्कळ दिवसापासून वाटत होतें. आज ती इच्छा पूर्ण होत आहे. आशा आहे कीं मराठी भाषिकांना ही माहिती वाचून आपल्या भावी नवप्रांताचें स्वरूपदर्शन होईल व हा नवप्रांत भारतीय राज्यसंसारांत शक्य तितक्या लवकर प्रत्यक्ष न लागावा यासाटीं ते आतुर होऊन कार्यप्रवण होईल.

ही माहिती मिळविणें विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या संभाव्य सरकारी उत्पन्नाची माहिती गोळा करणें फार कठीण काम होतें. आज महाराष्ट्र राजकीय दृष्ट्या संघराज्याच्या दोन प्रांतांत, अनेक देशी संस्थानांत व गोमंतकासारख्या परदेशी राज्यसत्तेखालींही, विभागला गेला आहे. त्यामुळें संयुक्त महाराष्ट्राच्या सरकारी उत्पन्नाचा अंदाज त्यांतील मराठीभाषी जिल्ह्यांचेंच तेवढें सरकारी उत्पन्न एकत्र करून करतां येणें शक्य होतें. मुंबई व मध्यप्रांत सरकारच्या मध्यवर्ती कचेऱ्यांनीं ही जिल्हा-

वार माहिती आम्हांस उपलब्ध होऊं दिल्यामुळें या सरकारी उत्पन्नाचा अंदाज करतां येत आहे. लोकसंख्या, शेती, उद्योगधंदे वगैरे संबंधाची ही माहिती सरकारी शिरगणती अहवाल, शेतकी खात्याचे अहवाल, उद्योगधंद्यासंबंधीं सरकारनें नेम-लेल्या कमिश्यांचे अहवाल व अन्य अधिकृत पुस्तकें व अहवाल इत्यादींवरून मिळ-विली आहे.

ही सर्व माहिती मिळवून व ती एकत्रित करून हें पुस्तक लिहिण्याचें काम संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे संघटक श्री. यशवंत कृष्ण सोवनी यांनीं केलें आहे. सुरु-वातीपासून त्यांना या कामीं महाराष्ट्रांतील प्रसिद्ध अर्थ व राज्यशास्त्रज्ञ आणि पुणें येथील गोखले अर्थशास्त्र व राजकारण संशोधन मंदिराचे संचालक प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनीं मार्गदर्शन केलें आहे. या पुस्तकाचें हस्तलिखित वाचून त्यांत त्यांनीं योग्य त्या दुरुस्त्या केल्या आहेत. प्रा. गाडगीळांनीं लिहिलेल्या संयुक्त महाराष्ट्र-संबंधींच्या पत्रकांचाहि या पुस्तकाचे कामीं उपयोग झाला आहे. या पुस्तकाच्या प्रास्ताविक भागांतलि उपप्रांतांच्या योजनेसंबंधीचा भाग व सीमानिर्णयासंबंधींचा भाग प्रा. गाडगीळांच्या पत्रकांतून जशाचा तसा दिला आहे. प्रा. गाडगीळांनीं परिषदेस केलेल्या या सहाय्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. म. म. दत्तो वामन पोतदार यांनींहि पुस्तकाचें हस्तलिखित वाचून सूचना केल्या त्याबद्दल त्यांचेहि आभार मानले पाहिजेत.

या पुस्तकाच्या प्रास्ताविक भागांत महाराष्ट्राचा पूर्वेतिहास थोडाफार देण्यांत आला आहे. तो देण्याचा उद्देश मराठी भाषिकामध्यें एकात्मतेची भावना निर्माण होण्यास हा पूर्वेतिहासहि थोडाफार कारणभूत आहे हें दाखविणें एवढाच आहे. महारा-ष्ट्राच्या पुर्वेतिहासाच्या अनुरोधानें 'संयुक्त महाराष्ट्र' या भाषावार प्रांताची आमची मागणी नाहीं हें येथें स्पष्ट नमूद करणें जरूर आहे. हिंदी संघराज्य प्रभावी व सामर्थ्यशाली होण्याचे दृष्टीनें त्याचे घटक (प्रांत) एकात्म व एकजिनसी असणें जरूर आहे व ही एकात्मता ठरविणारीं जीं कांहीं सर्वमान्य तत्त्वें आहेत तींच आम्ही भाषावार प्रांताची मागणी करतांना पायाभूत म्हणून मानीत आहों. ही एकात्मता ठरविणाऱ्या अनेक लक्षणांपैकीं एकभाषित्व हें एक प्रमुख लक्षण आहे असें आमचें मत आहे.

संयुक्त महाराष्ट्राचा एक मोठा नकाशा (२० × ३० इंच दोन रंगी) आम्ही पांचसहा महिपूर्वीच प्रसिद्ध केला आहे. त्याचा ब्लॉक करून तो नकाशाहि या पुस्तकांत दिला आहे.

ह्या पुस्तकाचें परिशीलन करून मराठीभाषी जनता संयुक्त महाराष्ट्र निर्मि-तीच्या कार्यास आम्हांस सहाय्य करील अशी आशा आहे.

शं. द. जावडेकर
अध्यक्ष,
संयुक्त महाराष्ट्र परिषद

# प्रास्ताविक

हिंदुस्तानचें अगर 'हिंदचें' राज्य हें एक संघराज्य आहे असें आपण ज्या वेळीं म्हणतों त्या वेळीं त्या संघांत सामील झालेले घटक ( प्रांत ) हे स्वतःच्या क्षेत्रमर्यादेंत राजकीय दृष्ट्या स्वायत्त विभाग असून ते कांहीं भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक व आर्थिक कारणांमुळें स्वखुषीनें आपला एक संघ निर्माण करीत आहेत व त्या संघसत्तेकडे स्वहितार्थच कांहीं सत्ता सोंपवीत आहेत असा अर्थ अभिप्रेत होतो. परंतु उत्तर अमेरिकेंतील संस्थानांचें संघराज्य ( युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका ) आणि सध्यां हिंदुस्तानांत निर्माण होणारें संघराज्य यांत महत्त्वाचा फरक म्हणजे अमेरिकेंत पूर्वी राजकीय दृष्ट्या पूर्णपणें स्वतंत्र असलेलीं संस्थानें एकत्र येऊन त्यांचें संघराज्य बनलें, आणि हिंदुस्तानांत ब्रिटिशांच्या परकीय अमदानींतील एकावयवी (यूनिटरी) राजसत्तेखालीं ब्रिटिशांच्या राज्यकारभाराच्या सोयीचे दृष्टीनें पूर्वी जे विभाग (प्रांत) पाडले गेले होते त्याच प्रांतांना स्वायत्तता देऊन त्यांचें एक संघराज्य निर्माण करण्यांत येत आहे. जोंपर्यंत प्रांतांना स्वायत्तता नव्हती व मध्यवर्ती सत्ता हीच सर्वंकष सत्ता होती आणि तिचें वास्तविक शक्तिस्थान दूरवरच्या ब्रिटनमध्यें ब्रिटिशांच्याच हातीं होतें त्या वेळीं त्यांनीं आपल्या राज्यकारभाराचे सोयीसाठीं केलेले हे प्रांत एकजिनसी, एकात्म असण्याचें विशेष कारण नव्हतें. म्हणजे तसे ते नसले तरी राज्यव्यवहारांत त्यामुळें कांहीं अडचण निर्माण होत नव्हती. ब्रिटिश राज्यकर्ते जसजसा प्रदेश जिंकीत गेले तसतशी त्यांनीं राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें त्याची निरनिराळ्या प्रांतांत विभागणी केली; ती कोणत्याहि तत्त्वानुसार केली गेली नाहीं.

परंतु सत्तेचें विकेन्द्रीकरण होऊन एकावयवी राज्यसत्तेऐवजीं संघराज्यसत्तेचें स्वरूप ज्या वेळीं हिंदी राज्यसत्ताप्रकारास लाभलें त्या वेळीं विद्यमान प्रांतरचना ही कृत्रिम असून तीमुळें प्रांतीय राज्यकारभारांत अनेक अडचणी निर्माण होत आहेत ही गोष्ट दिसून येऊं लागली. प्रांत हे एकजिनसी व एकात्म असले तरच त्या स्वायत्त प्रांतांचा राज्यकारभार सुरळीत चालतो असें अनुभवास येऊं लागलें. १९३५च्या घटना–कायद्यानें प्रांतांना स्वायत्तता मिळाली. तेव्हांपासून ही विद्यमान प्रांतरचना बदलून तिच्या जागीं कांहीं विशिष्ट तत्त्वावर आधारलेली अशी नवी प्रांतरचना करावी अशी जोराची मागणी सुरू झाली. त्यापूर्वी ती नव्हती असें नाहीं. परंतु १९३७ सालीं प्रांतिक स्वायत्तता अंमलांत आल्यापासून ती निव्वळ शाब्दिक मागणी न राहतां त्याप्रमाणें प्रत्यक्ष नवे प्रांत निर्माण करण्याची चळवळ जोरांत सुरू झाली. हिंदी स्वातंत्र्यार्थ झगडणाऱ्या राष्ट्रसभेनें ब्रिटिशांनीं केलेली हिंदुस्थानची प्रांत–

विभागणी ही कृत्रिम असून पायाशुद्ध नाहीं हें केव्हांच ओळखलें होतें व भाषावार प्रांतरचनेचा पुरस्कारहि केला होता. राष्ट्रसभेनें १९२० सालीं त्या अर्थाचा ठराव केला असून राष्ट्रसभेची १९२१ सालीं जी नवी घटना तयार केली गेली, तींत राष्ट्रसभेच्या व्यवहारासाठीं हिंदुस्तानचे भाषावार प्रांत पाडण्यांत आले. फक्त महाराष्ट्राचे चार तुकडे पडले आहेत. किंबहुना खुद्द ब्रिटिश राज्यकर्त्यांनाहि आपण केलेली ही प्रांतरचना कृत्रिम आहे याची जाणीव होऊं लागली होती. लॉर्ड कर्झननें हें मत त्या वेळीं प्रदर्शित केलें असून प्रांतांची पुनर्रचना व्हावयास हवी असा त्याचा आग्रह होता. निव्वळ राज्यकारभाराच्या सोयीचे दृष्टीनें देखील भाषावार प्रांत असणेंच चांगलें असें त्यांचें मत होतें. १९११ सालीं लॉर्ड हॉर्डिजनेंहि आपलें मत याचप्रमाणें व्यक्त केलें आहे. " बंगाल प्रांतामधील हिंदी बोलणाऱ्या लोकांचा राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें बंगाल्यापासून त्यांना फोडून त्यांचा एक अलग प्रांत करणें अत्यंत जरूर आहे, आजपर्यंत यामुळें हिंदी बोलणाऱ्यांची कुचंबणा झाली आहे " असें मत प्रदर्शित करून तो पुढें म्हणतो, " हिंदी लोकांना आपली उन्नति करून घेण्यासाठीं ज्या सवलती देणें अवश्य आहे त्यांतील सर्वांत जास्त महत्त्वाची सवलत म्हणजे त्यांच्यामध्यें स्थानिक देशाभिमान जागृत करणें ही होय. हें उद्दिष्ट साधण्यासाठीं वंश आणि भाषा या पायावर नवीन नकाशे तयार करवून त्याप्रमाणें प्रांतरचना केली पाहिजे व तदनंतर अशा प्रांतांमध्यें आपल्या उत्कर्षासाठीं आणि स्वायत्ततेसाठीं स्पर्धा निर्माण झाली पाहिजे. "

त्या वेळच्या बंगाल प्रांतामध्यें सामील कलेल्या हिंदी भाषिकांच्या प्रश्नाच्या अनुरोधानें जरी त्यांनीं हें म्हटलें असलें तरी हिंदुस्तानांतील कृत्रिम व अनैसर्गिक अशी प्रांतरचना बदलली पाहिजे हें १९११ सालीं ब्रिटिश राज्यकर्त्यांना देखील अवश्यक वाटत होतें, हें यावरून दिसून येतें. त्यानंतर पुढें १९१९ सालीं मॉटेग्यू–चेम्सफर्ड रिपोर्टमध्यें याबाबत म्हटलें आहे कीं " हल्लींचे राज्यकारभारांकरितां बनविलेले प्रांत हे कृत्रिम व पुष्कळ वेळां अत्यंत गैरसोयीचे असल्याचें आपणांस आढळून येतें. ऐतिहासिक कारणामुळें हे प्रांत कसे तरी बनविले गेले आहेत हें आपणांस माहीत आहेच. राज्यकारभारासाठीं पाडलेले हे विभाग आकारानें लहान व एकभाषिकांचे व एका वंशाच्या लोकांचे असे जर बनविण्यांत आले असते तर राज्यकारभाराचे दृष्टीनें सरकारचें काम बरेंच सुलभ झालें असतें ही गोष्ट निःसंशय खरी आहे. या ठिकाणीं आम्हांस आमचें मत स्पष्टपणें नमूद करणें जरूर आहे आणि तें असें कीं, ज्या वेळीं प्रांतांची पुनर्रचना करणें अवश्य आहे व ती लोकांच्या संमतीनें व्हावी असें सरकारला वाटेल त्या वेळीं ती करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आणि आतां नवीन सुधारणा–कायद्याप्रमाणें जीं प्रांतांचीं सरकारें अस्तित्वांत येतील त्यांनीं या प्रश्नाकडे लक्ष देणें हें त्यांचें अगदीं तांतडीचें कर्तव्य आहे असें त्यांनीं समजलें पाहिजे व त्याप्रमाणें त्यांनीं नवप्रांतानिर्मितीच्या योजना आंखून त्यांवर

लोकमत अजमावलें पाहिजे. " ' मॉटेग्यू–चेम्सफर्ड ' सुधारणा–कायद्याचे वेळीं जें जॉइंट पार्लमेंटरी बोर्ड नेमण्यांत आलें होतें त्यानेंहि " सध्यांच्या प्रांतांची पुनर्रचना केली पाहिजे. सध्यांचे प्रांत हे लष्करी, राजकीय व राज्यव्यवस्थेच्या सोयी-प्रमाणें ज्या वेळीं जशी गरज पडली त्याप्रमाणें बनविण्यांत आले आहेत. त्यांतील लोकांची इच्छा अगर त्या लोकांचें सांस्कृतिक वा नैसर्गिक ऐक्य यांपैकीं कोण-त्याहि तत्त्वाकडे लक्ष दिलेलें नाहीं. मद्रास, बंगाल, संयुक्तप्रांत हे प्रांत फारच मोठे झाले आहेत. ज्या वेळीं मध्यवर्ती सत्ता हीच प्रमुख असते त्या वेळीं राज्यव्यवस्थेसाठीं निर्माण केलेल्या प्रांतांची संख्या थोडी असावी ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. परंतु हिंदुस्तानांत जबाबदार राज्यपद्धति सुरू करण्याच्या मार्गांतील अडचणींचा ज्या वेळीं आम्ही विचार करतों त्या वेळीं विद्यमान प्रांतांचा मोठा आकार, त्यांच्या अनैस-र्गिक व कृत्रिम सीमा व त्या प्रांतांतील लोकांमध्यें एकजिनसीपणाचा दिसून येणारा अभाव, यांमुळें त्या अडचणी अधिक वाढतच आहेत असें वाटतें. "

सायमन कमिशननेंहि आपल्या अहवालांत ( व्हॉ. २, पृष्ठें २४,२५.) म्हटलें आहे कीं, " प्रांतांच्या विद्यमान सरहद्दी बदलून प्रदेशांची पुनर्विभागणी अगर प्रांतांची पुनर्रचना करण्यांत यावी याबद्दल हिंदुस्थानांतील बऱ्याच मोठ्या लोकमताकडून मागणी केली जात आहे. विद्यमान प्रांतरचना पूर्णपणें समाधान-कारक नाहीं, असें जें त्यांचें म्हणणें आहे तें आम्हांस पूर्णपणें मान्य आहे. सध्यांच्या प्रांतरचनेंत ज्यांमध्यें कोणतेंहि स्वाभाविक ऐक्य अगर एकात्मता नाहीं असे प्रदेश एकाच प्रांतांत समाविष्ट करण्यांत आले असून ज्यांच्यामध्यें स्वाभाविक ऐक्य अगर एकात्मता असल्याचें उघडपणें दिसून येत आहे असे प्रदेश निरनिराळ्या प्रांतांत विभागले गेले आहेत. वस्तुतः ज्या प्रदेशांत एकच भाषा बोलणारे लोक आहेत व जो प्रदेश अवश्यक साधनसंपत्तीनें समृद्ध असून एक स्वतंत्र प्रांत म्हणून नांदू शकण्या-सारखी ज्याची आर्थिक परिस्थिति असेल त्याचा स्वतंत्र प्रांत होण्यास कांहींच हरकत असूं नये. अशा परिस्थितींत तेथील लोकांची सर्वसामान्य बोलण्याची भाषा हेंच त्यांचें प्रांतीय विशिष्टत्व अगर वेगळेपण निश्चित करणारें पायाभूत लक्षण मानलें जाईल; परंतु एक भाषा हेंच निर्णायक लक्षण मात्र मानलें जाणार नाहीं. वंश, धर्म, आर्थिक हितसंबंध, भौगोलिक सलगता, त्या प्रदेशांतील शहरें व खेडीं, तसेंच समुद्रकिनारा व आंतील प्रदेश यांचें प्रमाण, ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेऊनच प्रांतांच्या सरहद्दी ठरवाव्या लागतील. परंतु या सर्वांपेक्षांहि महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रांतांची पुनर्रचना करतांना ज्यांचा प्रदेश कमी होणार अगर ज्यांना नवीन प्रदेश मिळणार त्या दोन्ही भागांतील लोकांचें या विभागणीचे बाबतींत जास्तींत जास्त मतैक्य असणें व्यावहारिक दृष्ट्या अत्यंत अवश्य आहे. "

जबाबदार राज्यपद्धति ही स्वायत्ततेपेक्षां खालच्या दर्जाची असली तरी देखील ती यशस्वी होण्यासाठीं प्रांतांची पुनर्रचना करून नवीन एकजिनसी

प्रांत निर्माण करण्यांत यावे असें त्या वेळीं ब्रिटिश राज्यकर्त्यांनाहि वाटलें. मग प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता मिळाल्यानंतर येवढेंच नव्हे तर स्वतंत्र हिंदी संघ-राज्यांतील स्वायत्त घटक हा दर्जा प्रांतांना लाभल्यानंतर पूर्वींची कृत्रिम, तत्त्वशून्य व व्यवहाराच्या सोयीसाठीं ज्या वेळीं जशी जुळेल त्याप्रमाणें केलेली प्रांतरचना टिकूं शकणार नाहीं, ही गोष्ट निर्विवाद आहे. लॉर्ड आयर्विन यांनींहि सायमन कमिशनच्या योजनेवरील आपला अभिप्राय प्रकट करतांना विद्यमान प्रांतांच्या सरहद्दी कशा बदलाव्या व नवीन प्रांत कसे निर्माण करावे याची पद्धत सांगितली आहे. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें कीं, "नवीन प्रांतीय सरकारांनींच हे प्रश्न हातीं घ्यावे. त्यांकरितां घटनेमध्यें तशी तरतूद करून ठेवावी. प्रत्यक्ष सरहद्दी बदलणें व नवे प्रांत निर्माण करणें हें काम जरी ऑर्डर-इन्-कौन्सिलनें होणार असलें तरी या कामीं प्रांतांनींच पुढाकार घेऊन सुरुवात केली पाहिजे व मध्यवर्ती सरकार व कायदेमंडळ यांची आपल्या योजनेस संमति मिळविली पाहिजे. सध्यांच्या प्रांतांची विभागणी करून अगर विद्यमान प्रांतांतीलच कांहीं भागांचें एकीकरण करून नवीन 'गव्हर्नरचे प्रांत' निर्माण करण्याची अवश्यकता असेल तेव्हां असे प्रांत निर्माण करण्याची तरतूद घटना-कायद्यामध्यें करून ठेवणें अवश्य आहे. ज्या प्रांतांतील लोकांना विद्यमान प्रांतरचनेमुळें आपल्यावर अन्याय होत आहे असें वाटतें त्यांना आपलें मत प्रदर्शित करण्याची संधि अवश्य दिली गेली पाहिजे." विद्यमान प्रांतरचनेच्या कृत्रिमतेची जाणिव असल्यामुळेंच ब्रिटिश सरकारनें १९३५चा घटना-कायदा करतांना ओरिसा, सिंध आणि वायव्यसरहद्द-प्रांत हे नवीन प्रांत निर्माण केले. १९३५च्या घटना कायद्यांतहि २९० व्या कलमान्वयें असे नवीन प्रांत बनविण्याचा अधिकार देऊन ठेवण्यांत आला होता. येवढेंच नव्हे तर, तत्पूर्वीं १९१९च्या घटना-कायद्यांतहि या कृत्रिम प्रांतरचनेच्या अडचणींचें निराकरण करतां येईल अशी ६० व्या कलमान्वयें थोडीफार तरतूद करून ठेवली होती.

१९३७ सालीं हिंदुस्तानांतलि अकरापैकीं आठ प्रांतांत कॉंग्रेस-मंत्रिमंडळें अधिकारावर आलीं. त्यानंतर या भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नास अत्यंत निकडीचें स्वरूप येऊं लागलें. कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व १९२० सालींच मान्य केलें होतें व आपल्या व्यवहारासाठीं कॉंग्रेसनें त्या वेळींच भाषावार प्रांत पाडून हें तत्त्व प्रत्यक्ष कृतींतहि आणून दाखविलें होतें. हिंदुस्तानची राज्यव्यवस्था ही एकांवयवी (यूनिटरी) राहूं शकणार नाहीं, हिंदुस्तान देश हा कांहीं अर्थानें सांस्कृतिक दृष्ट्या व भौगोलिक दृष्ट्या जरी एक राष्ट्र दिसत असला तरी वस्तुतः तो तसा नाहीं, तो एक खंडप्राय देश आहे, त्यांतील निरनिराळे प्रांत हे भाषेनें व संस्कृतीनें एकमेकांपासून भिन्न आहेत, दक्षिणेंतील लोकांची राहणी, भाषा, संस्कृति, आचार-विचार व उत्तरेकडील हजार-पंधराशें मैलांवरील लोकांची राहणी, भाषा, संस्कृति, आचार-विचार, आहार-विहार यांमध्यें बरेंच अंतर

आहे. तेव्हां हिंदुस्तानचें कांहीं अर्थानें सांकृतिक दृष्ट्या व भौगोलिक दृष्ट्या जरी ऐक्य दिसत असलें तरी तें पूर्णत्वानें नाहीं. हें अखिलभारतीय स्थूल ऐक्यहि टिकवावयाचें व प्रांतीय ऐक्यहि साधावयाचें तर मध्यवर्ती राज्यसत्ता ही संघराज्य-सत्ताच ( फेडरेशन ) असली पाहिजे व प्रांत हे स्वायत्त घटक बनून त्यांच्यामध्यें स्वत्वाची जाणिव निर्माण झाली पाहिजे व त्यांना आपल्या सांस्कृतिक व आर्थिक विकासास पूर्ण अवसर दिला पाहिजे, ही गोष्ट हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांना मान्य असल्यामुळें नेहरू-कमिटीनें १९२८ सालीं हिंदी राज्यघटनेचा जो खर्डा तयार केला तो ह्या तत्त्वास अनुसरूनच केला होता. त्यांना विद्यमान प्रांतरचनेच्या कृत्रिमतेची पूर्ण जाणीव होती व त्यामुळेंच त्यांनीं आपल्या अहवालांत म्हटलें आहे कीं, "कोणत्याहि विशिष्ट तत्त्वाच्या आधारानें हिंदुस्तानांतील सध्यांचे प्रांत निर्माण केले गेले नाहींत ही गोष्ट सर्वांना माहित आहेच. ब्रिटिशांची सत्ता हिंदुस्तानांत जसजशी वाढत गेली तसतसे परिस्थितीप्रमाणें त्यांनीं हे प्रांत पाडले आहेत; कोणतेंहि भौगोलिक, ऐतिहासिक, राजकीय अगर भाषाविषयक ऐक्य आहे, म्हणून हे प्रांत निर्माण केले आहेत असें बिलकुल नाहीं. निव्वळ राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनेंहि ही प्रांतरचना मोठी यशस्वी झाली आहे असें म्हणतां येत नाहीं. यावरून ही गोष्ट स्पष्ट आहे कीं प्रांतांची पुनर्विभागणी ही झालीच पाहिजे. अर्थात् ती कोणत्या तत्त्वानुसार व्हावी हें आपण ठरविलें पाहिजे. हें ठरवितांना आपण भौगोलिक व आर्थिक परिस्थितीचा थोडाफार विचार करणें जरूर आहे. पण प्रामुख्यानें त्या प्रदेशांतील लोकांचें भाषिक ऐक्य व त्यांच्या इच्छा यांचाच आपणांस विचार केला पाहिजे" (नेहरू–रिपोर्ट, पृष्ठें ६१ ते ६९.) असें आपलें मत त्यांनीं नमूद केलें असून तदनंतर पुढें "त्या विशिष्ट प्रदेशांतील बहुसंख्य लोकवस्तीच्या मागणीप्रमाणें प्रांतांची भाषावार पुनर्विभागणी व्हावी; मात्र असें करतांना त्या नवीन प्रांतांच्या आर्थिक व राज्यकारभारविषयक अडचणींचाहि विचार करण्यांत यावा" असें म्हटलें आहे. (नेहरू–रिपोर्ट, पृष्ठ १२२, परिच्छेद ८६).

म्हणजे विद्यमान प्रांतरचना ही कृत्रिम आहे, चुकीची आहे, बदलली पाहिजे, याची जाणीव ब्रिटिश राज्यकर्त्यांपासून तो हिंदुस्तानांतील निरनिराळ्या पक्षांच्या पुढाऱ्यांपर्यंत सर्वांना होती. प्रश्न ती बदलायची कशी व केव्हां येवढाच होता. लोकांची जोराची मागणी येऊन अगदीं निरुपाय व्हावा तेव्हांच ब्रिटिश सरकार तिचेकडे लक्ष देई. त्याप्रमाणें १९३५च्या नवीन कायद्यांत कांहीं नवीन प्रांत त्यांनीं निर्माण केले. परंतु सबंध हिंदुस्तानच्या पायाशुद्ध प्रांतरचनेच्या प्रश्नास त्यांनीं हात घातला नाहीं. १९३७ सालीं प्रांतांमध्यें स्वायत्तता नांदूं लागल्यानंतर अनेक भाषांची व संस्कृतींची खिचडी असलेल्या अशा प्रांतांमध्यें, विशेषतः मद्रास प्रांतामध्यें या प्रश्नानें जोरानें उचल खाल्ली. प्रांतामध्यें एकजिनसीपणा नसल्यामुळें राजकीय स्वायतत्ता मिळूनहि तिचा आपणांस कांहीं उपयोग होत नाहीं असें त्या

प्रांतांतील कांहीं भागांना वाटूं लागलें. विशेषतः आंध्र लोकांची फारच कुचंबणा होऊं लागली. आणि या दुःस्थितीचें निराकरण, आपल्या भाषेचा स्वतंत्र प्रांत केल्याखेरीज कधींहि होणें शक्य नाहीं असें त्यांचें ठाम मत झालें व त्यासाठीं त्यांनीं जोरानें चळवळ सुरू केली. मुंबई प्रांतांतील कन्नडिगांनाहि या दुःस्थितीची जाणीव होऊन त्यांनीं स्वतंत्र प्रांताची मागणी केली. राजकीय स्वायत्ततेचा पुरेपूर उपभोग घेऊन आपला उत्कर्ष साधावयाचा असल्यास प्रांत हे एकजिनसी व एकात्म असले पाहिजेत व ही एकात्मता एकभाषित्वामुळें निर्माण होते असें दिसून आलें. अनेकभाषिकांचे बहुजिनसी प्रांत ठेवल्यानें कोणाचाच उत्कर्ष साधत नाहीं असें अनुभवास आलें. मद्रास–विधिमंडळांत १९३८मध्यें आंध्र प्रांत स्वतंत्र करावा म्हणून ठराव मांडण्यांत आला व तो मंजूरहि झाला. मध्यप्रांत–विधिमंडळांतहि त्या प्रांतांतील मराठी–भाषिकांचा महाविदर्भ हा स्वतंत्र प्रांत निर्माण करावा म्हणून १९३८ सालीं ठराव मांडण्यांत आला व तोहि मंजूर झाला. हिंदुस्तानांत राष्ट्रसभापक्ष (कॉंग्रेसपक्ष) त्या वेळीं सत्तारूढ असल्यामुळें त्याला या मागण्यांचा गंभीरपणें विचार करावा लागला. तत्त्व या दृष्टीनें कॉंग्रेसनें भाषावार प्रांतरचना केव्हांच मान्य केली होती व आपल्या पक्षाच्या प्रत्यक्ष व्यवहारांतहि ती बरीचशी आणली होती. परंतु आतां देशाच्या राज्यकारभारविषयक प्रत्यक्ष व्यवहारांत ती आणण्याचें महत्त्वाचें काम आलें. पण अचानक महायुद्ध सुरू झालें व हे सर्व प्रश्न मागें पडले. कायदेमंडळेंहि अस्तित्वांत राहिलीं नाहींत. देशाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नापुढें हे प्रांतांचे प्रश्न गौण ठरले. परंतु ते गौण म्हणून कांहीं काळच दबून राहिले. १९४६ सालीं प्रांतीय विधिमंडळांच्या निवडणुकींत पुनः कॉंग्रेसला प्रचंड बहुमत मिळून प्रांतांमध्यें कॉंग्रेस–मंत्रिमंडळें सत्तारूढ झालीं. १९४५ ते १९४७ या कालांत हिंदुस्तानांत किती तरी महत्त्वाच्या राजकीय घडामोडी अत्यंत झपाट्यानें झाल्या. त्रिमंत्रि–योजनेप्रमाणें स्वतंत्र भारताची घटना बनविणारी समिति निवडली गेली व तिनें हिंदी संघराज्याची घटना तयार करण्याचें काम सुरू केलें. तें काम अजून चालूच आहे. पण त्रिमंत्रि–योजनेनुसार निर्माण झालेली ही घटनासमिति आतां १५ ऑगस्ट १९४७नंतर स्वतंत्र भारताची सार्वभौम घटनासमिति झाली असून तिला आतां अखिल हिंदुस्तानचा सर्वांगीण उत्कर्ष साधेल अशी आदर्श घटना बनविण्याचें जोखमीचें काम करावयाचें आहे. १९४६च्या निवडणुकीनंतर प्रांतिक स्वायत्ततेचा राज्यकारभार पुनः सुरू झाला व पुनः या भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नानें उचल खाल्ली. परंतु या वेळीं हा प्रश्न एकदोन प्रांतांपुरता मर्यादित न राहतां बहुभाषी अशा सर्व प्रांतांमध्यें या प्रश्नानें उचल खाल्ली आहे. मद्रास, मुंबई, मध्यप्रांत यांतील विधिमंडळांनीं भाषावार प्रांतरचना करण्यांत यावी व त्याप्रमाणें नवीन प्रांत निर्माण करून त्यांची घटना बनविण्यांत यावी अशी घटनासमितीकडे मागणी करणारे ठराव मंजूर केले आहेत. कांहीं प्रांतांत या भाषावार प्रांतरचनेच्या चळवळीनें

अत्यंत उग्र रूप धारण केलें आहे. तेव्हां घटनासमितीला याबाबतींत आतां निर्णय घेणें अवश्य आहे. कॉंग्रेस आपल्या ध्येयानें व धोरणानें भाषावार प्रांतरचना निर्माण करण्यास बांधली गेली आहे येवढेंच नव्हे तर, १९४५च्या कॉंग्रेसच्या निवडणुकीच्या जाहिरनाम्यांत भाषावार प्रांतरचना करूं असें जनतेला आश्वासनहि देण्यांत आलें आहे.

हिंदुस्तानांत एकावयवी राज्यसत्ता असावी असें कोणीहि म्हणणार नाहीं. हिंदुस्तानचा सर्वांगीण विकास, सत्तेचें विकेंद्रीकरण होऊन आणि हिंदुस्तानच्या नैसर्गिक व भाषावार विभागांना (भाषावार राष्ट्रांना) संपूर्ण स्वायत्तता मिळून अशा प्रबल राष्ट्रांचें एक संघराज्य होण्यांतच आहे. स्थूल संस्कृति व भौगोलिक रचना यांमुळें हिन्दुस्तान हें एक राष्ट्र आहे असें मानलें जातें. परंतु ज्या कारणांमुळें निरनिराळ्या प्रादेशिक विभागांत विशिष्टत्वाची भावना निर्माण होऊं शकते, तीं बहुतेक सर्व कारणें हिंदुस्तानसारख्या अवाढव्य देशांत या ना त्या स्वरूपांत निश्चितपणें आढळतात. हिंदुस्तानचे आर्थिक व भौगोलिक दृष्ट्या किती तरी वेगळे भाग पडतात. शिवाय वंश, भाषा, परंपरा, धर्म इत्यादिकांमुळें पडणारे भेदहि आपल्या देशांत कांहीं थोडेथोडके नाहींत. असे भेद असूनहि हिंदी जनतेमध्यें समान सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरेमुळें एकात्मतेची भावना जागृत आहे. ही भावना व संघराज्यामुळें होणारे आर्थिक व राजकिय फायदे यांमुळेंच हिंदी संघराज्य निर्माण करण्याची तीव्र इच्छा त्यांच्यामध्यें जागृत झाली आहे. अशा परिस्थितींत जन्मास येणारें संघराज्य कार्यक्षम व बलशाली होण्यासाठीं त्याचे घटक—प्रांत—कसे असले पाहिजेत, असावे, ह्याचा विचार करणें अत्यंत जरूर आहे. ब्रिटिशांनीं निर्माण केलेली प्रांतरचना कायम करावयाची कीं काय ?

अलीकडच्या इतिहासांत हिंदुस्तानांत ब्रिटिश येण्यापूर्वी मुसलमानांचीं व मराठ्यांचीं साम्राज्यें होतीं. परंतु त्या साम्राज्यसत्तांनीं हिंदुस्तानच्या नैसर्गिक प्रांतरचनेंत फरक केला नाहीं. किंबहुना त्या राज्यसत्तेचें स्वरूप व आधुनिक एककेंद्रित एकावयवी ब्रिटिश राज्यसत्तेचें स्वरूप यांमध्यें खूपच अन्तर होतें. मोंगलांच्या व मराठ्यांच्या राज्यसत्तांचें स्वरूप मध्ययुगीन सरंजामशाही राज्यव्यवस्थेसारखें होतें. देशांतील मूळचे हक्कदार असलेल्या सरदार—सरंजामदारांना मांडलिक करून त्यांचेकडून आपल्या सार्वभौमत्वाबद्दल खंडणी वसूल करण्यापलीकडे त्यांचा साम्राज्यसत्तेशीं संबंध येत नसे. फार तर या वसुलीच्या कामासाठीं व त्यांच्यावर कायमची निगराणी राहावी म्हणून साम्राज्यसत्ता आपले सुभेदार नेमी. त्यामुळें पूर्वीच्या प्रांतरचनेंत अगर समाजव्यवस्थेंत कोणताहि मौलिक फरक झाला नाहीं. मराठे हिंदुस्तानांतील व हिंदु—धर्माचे असले तरी हिंदुस्तानांतील इतर प्रांतांत ज्या वेळीं त्यांनीं आपली सत्ता प्रस्थापित केली अगर मुलुखगिरी केली त्या वेळीं त्यांना तेथील लोक परके, परराष्ट्रीयच समजत. ब्रिटिश सरकारच्या सर्वंकष सत्तेमुळें व त्या सत्तेविरुद्ध हिंदी लोकांना जो एकत्रित

होऊन झगडा करावा लागला त्यामुळें हिंदी जनतेंत ही एकराष्ट्रीयत्वाची भावना जास्त दृढमूल झाली. हिंदुस्तानांत ब्रिटिश आले नसते व ऐतिहासिक क्रमानें सरंजामशाही जाऊन त्या ठिकाणीं आधुनिक भांडवलदारी वा समाजवादी समाजव्यवस्था व राज्य-व्यवस्था निर्माण झाली असती तर हिंदुस्तानचे नैसर्गिक दृष्ट्या जे विभाग पडतात तेच हिंदुस्तानचे प्रान्त म्हणून आपणांस दिसले असते व अशा घटकांचें हिंदी संघराज्य बनलें असतें. जगांतील हल्लींचीं बहुतेक संघराज्यें अस्तित्वांत येण्यापूर्वी त्यांचे आजचे घटक स्वतंत्रपणें निर्माण झाले होते व त्यांनीं स्वतंत्र राजकीय अस्तित्व व त्यांच्यापैकीं कांहींनीं सार्वभौमत्वहि उपभोगिलें होतें. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, कॅनडा, स्वित्झर्लंड व ऑस्ट्रेलिया या संघराज्यांचे आजचे घटक हीं पूर्वी स्वतंत्र राज्यें अगर संस्थानें होतीं. हिंदुस्तानांतहि ब्रिटिश आले नसते तर अशींच वांशिक, भाषिक, सांस्कृतिक अगर अन्य तऱ्हेच्या भिन्नत्वावर आधारलेलीं स्वतंत्र राज्यें अगर राष्ट्रें आपणांस पाहावयास मिळालीं असतीं. परंतु ब्रिटिश साम्राज्यशाहीला अशा तऱ्हेचे नैसर्गिक विभाग कायम ठेवण्याची कांहींच गरज भासली नाहीं. मध्यवर्ती सत्ता हीच सर्वंकष असल्यामुळें त्यांना सोयीचे पडले तसे विभाग ते करीत गेले. परंतु ब्रिटिश साम्राज्यसत्तेचा लोप झाल्यानंतर ही कृत्रिम प्रान्तव्यवस्था स्वतंत्र हिंदी संघराज्यास खात्रीनें उपकारक ठरणार नाहीं. वर वर्णिलेल्या जगांतील इतर संघराज्यांच्या बाबतींत तीं पूर्वीचीच स्वतंत्र राज्यें अगर संस्थानें असल्यामुळें त्यांचे घटक बदलण्याचा प्रश्नच निर्माण झाला नाहीं. परंतु हिंदुस्तानचें आतां जें संघराज्य होणार तें पूर्वी स्वतंत्र असलेल्या घटकांचें होणार नसून ऐतिहासिक योगायोगामुळें बनलेल्या किंवा राज्यकारभाराच्या सोयीसाठीं एकावयवी मध्यवर्ती सत्तेनें बनविलेल्या प्रांतिक विभागांचें होणार आहे. म्हणून तें बदलण्याची जरुरी आहे. आजचे प्रान्त हे कोणत्याहि मूलभूत तत्त्वावर निर्माण झाले नसल्यामुळें बदलत्या राज्यसंघटनेंत व स्वतंत्र हिंदुस्तानच्या राज्यव्यवस्थेंत ते तसेच ठेवण्यांत कांहींच स्वारस्य नाहीं. ते नवीन हिंदी संघराज्याचे राजकीय दृष्ट्या युक्त अगर इष्ट असे घटक होऊंच शकत नाहींत. कारण राज्यकारभाराच्या सोयीसाठीं निरनिराळे प्रादेशिक घटक त्यांत समाविष्ट केलेले असल्यामुळें मुळांतच अशा प्रांतांना लहान लहान संघराज्यांचें स्वरूप आलें आहे. तेव्हां हिंदुस्तानची नवी घटना कायम व टिकाऊ होण्याचे दृष्टीनें संघराज्याचे घटक कोणते असावे हें संघराज्याची घटना बनविण्याच्या अगोदर ठरविणें जास्त सयुक्तिक होईल.

हे घटक ठरविण्यासाठीं कोणत्या तत्त्वाचा अंगीकार केला असतां त्या घटकांचा राज्यकारभार सोयीचा व सुरळीत होईल हें आपण पाहिलें पाहिजे. स्वतंत्र वेगळें अस्तित्व ठेवून व्यापक फायद्यासाठीं एकत्र येऊं इच्छिणाऱ्या घटकांचें संघराज्य बनतें. म्हणजेच प्रत्येक घटकांतलि लोकांना इतरांपासून त्यांच्या भिन्नत्वाची व आपल्या एकात्मतेची जाणीव असायला पाहिजे. प्रत्येक घटकांतलि ही

एकात्मतेची भावना समान सांस्कृतिक, धार्मिक अगर ऐतिहासिक परंपरांमुळें अगर भाषेमुळें निर्माण होऊं शकते. ज्या राजकीय घटकाच्या राज्ययंत्राबाबत समग्र जनतेची आपलेपणाची भावना सहज उद्भूत होईल व तेथील कारभारास या आपलेपणाच्या भावनेमुळें लोकमताचा स्वयंस्फूर्त पाठिंबा मिळूं शकेल असेच कोणत्याहि संघराज्याचे घटक बनविणें अवश्यक आहे. हिंदी संघराज्याचे घटक हे एकभाषिक प्रांत असावे हें तत्त्व कोणीहि सहज मान्य करील. अनेक भाषा प्रचलित असलेल्या घटकांत लोकशाही पद्धतीनें कारभार चालविण्यांत फार अडचणी निर्माण होतात असा अनुभव आहे. म्हणून दुसऱ्या कशासाठीं नाहीं तरी निदान खऱ्या लोकशाहीच्या निर्मितीसाठीं तरी भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व अंगीकारिलें पाहिजे.

या दृष्टीनें मराठीभाषी प्रदेशाकडे पाहिलें तर तो प्रदेश सलग व मोठा असल्यामुळें संघराज्याचा एक स्वतंत्र घटक होऊं शकतो. शिवाय या प्रदेशामध्यें वर सांगितलेल्या कारणांसाठीं आणखी एकादा लहान पण स्वतंत्र घटक होऊं शकेल असा कोणताहि भाग दिसून येत नाहीं. राजकीय एकात्मता कायम ठेवून हिंदी संघराज्याचा प्रत्येक घटक जितका मोठा होईल तितका तो संघराज्याच्या दृष्टीनें व त्याप्रमाणेंच त्या घटकाच्या अंतर्गत व्यवहाराच्या दृष्टीनेंहि अधिक फायदेशीर होईल. कारण एकाद्या प्रांताचें राजकीय महत्त्व व बलशालित्व, तसेंच तेथील सरकारनें हातीं घेतलेल्या आर्थिक व सामाजिक पुनर्घटनांच्या योजनांची यशस्विता, या सर्व गोष्टी त्या प्रदेशाच्या विस्तारावर व तेथें उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संपत्तीवर अवलंबून असतात. यामुळें मोठ्या घटकाला आंतरप्रांतीय व्यवहारांत अगर संघराज्याच्या कारभारांत साहजिकच जें महत्त्व प्राप्त होईल तें लहान लहान घटकांना प्राप्त होणार नाहीं. म्हणून संघराज्याचे सर्वच घटक एकात्मतेच्या तत्त्वाला बाध न आणतां स्वाभाविकपणें जितके मोठे होतील तितके करणें व होणें इष्ट आहे. या सर्व दृष्टींनीं महाराष्ट्रएकीकरणाचा विचार केला तर सर्व मराठी–भाषी लोकांचा एक सलग प्रांत बनविणें किती वाजवी आहे हें सिद्ध करणें अगदीं सोपें आहे. हिंदुस्तानांतील इतर कोणत्याहि एकभाषी प्रदेशापेक्षां राजकीय दृष्ट्या महाराष्ट्र अधिक एकजिनसी आहे. ह्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांची भाषाच एक आहे असें नव्हे तर त्यांची वाङ्मयीन परंपराहि एकच आहे. ह्या सर्व प्रदेशांतील जनतेमध्यें आतांपर्यंत सामाजिक व सांस्कृतिक दळणवळणाच्या बाबतींत कोणत्याहि प्रकारचे विशिष्ट अडथळे उत्पन्न झाले नाहींत. एकमेकांपासून पुष्कळ दूर असलेल्या मराठीभाषी लोकांच्या सामाजिक रूढी, चालीरीती व एकंदर समाजव्यवस्था खरोखरच आश्चर्य वाटण्याइतक्या सारख्या आहेत. महाराष्ट्रीय जनतेचे ब्राह्मण, मराठा व महार हे जे तीन मुख्य घटक वर्ग मानले जातात ते या प्रदेशांत बहुतांशीं सर्वत्र सारख्याच प्रमाणांत विखुरलेले आहेत आणि

त्या वर्गांमध्यें आपण कोठेंहि असलों तरी एक आहों ही भावना कायम आहे व त्यांच्यामध्यें सामाजिक व्यवहारहि मोठ्या प्रमाणांवर चालू आहेत. या सर्व प्रदेशाची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा एकच आहे. या प्रदेशांतील जनतेच्या श्रद्धास्थानीं असलेले संत, पूजास्थानीं असलेल्या ऐतिहासिक व्यक्ति व तिच्या स्मृति-संपुटांत सांठविलेला इतिहास व परंपरा हीं सर्वत्र एकच आढळून येतात. सामाजिक अगर सांस्कृतिक भिन्नता दाखविण्यासाठीं या सर्व प्रदेशाचे विभाग करूं म्हटलें तरी तसें करणें शक्य होणार नाहीं इतका या प्रदेशांतील जनतेमध्यें एकजिनसीपणा आहे. हा एकजिनसीपणा आजकाल निर्माण झालेला नसून तो कित्येक शतकापूर्वींपासून चालत आलेला आहे.

या ठिकाणीं महाराष्ट्राचा थोडा पूर्वेतिहास देणें अस्थानीं होणार नाहीं. आज मराठी भाषेचा जेवढा देशविस्तार आहे, जवळजवळ तेवढ्याच विस्ताराचा महाराष्ट्र आपणांस इ. स. १२००च्या सुमारास होता असें आढळून येईल. या प्रदेशांत राहणारे लोक आपणां स्वतःला त्या वेळीं महाराष्ट्रीय म्हणवून घेत होते कीं नाहीं, याचा जरी स्पष्ट उल्लेख कोठें आढळत नसला तरी या वेळेपासून या भागामध्यें राहणाऱ्या लोकांमध्यें स्वतःच्या एकजिनसीपणाची व इतरांपासून वेगळें असल्याची जाणीव असावी असें वाटतें. याच काळांत (बाराव्या शतकांत) जन्मास आलेला महानुभाव-पंथ हा मराठी भाषेचा कट्टा अभिमानी असून त्या वेळच्या महाराष्ट्राच्या प्रदेशाची जी व्याप्ति त्यांनीं सांगितली आहे ती जवळजवळ आजच्या महाराष्ट्रायेवढी—मराठी भाषिक प्रदेशायेवढी आहे. या प्रदेशाला महाराष्ट्र हें नांव कसें व केव्हां मिळालें याबद्दल निरनिराळ्या उपपत्ती आहेत. महाराष्ट्र या प्रादेशिक नांवाचा उल्लेख शकपूर्व पांचव्या शतकांत आढळतो. परंतु महाराष्ट्र–समाजाचा प्रथम उल्लेख शकोत्तर तिसऱ्या शतकांत आढळतो. या निव्वळ उल्लेखावरून त्या वेळच्या महाराष्ट्राचा अगर महाराष्ट्र–समाजाचा स्पष्ट असा कांहींच बोध होत नाहीं. बृहदारण्यकोपनिषद्, बौधायनस्मृति, महाभारत, रामायण इत्यादि प्राचीन ग्रंथांत महाराष्ट्रांत अंतर्भूत होणाऱ्या पुष्कळ स्थळांचा निर्देश जरी आढळत असला तरी 'महाराष्ट्र' असा प्रादेशिक नांवाचा उल्लेख त्यांत आढळत नाहीं. वराहमिहराच्या बृहत्संहितेंत (इ. स. ४९०) प्रथम प्रदेशवाचक महाराष्ट्राचें नांव आलें असून विदर्भ देश हा भारतवर्षाच्या मध्यभागाच्या आग्नेय दिशेला आहे असेंहि सांगितलें आहे. इ. स.पूर्व अनेक शतकें 'महाराष्ट्र' हा शब्द प्रचारांत होता; परंतु त्याचा विशिष्ट प्रदेशवाचक असा स्पष्ट उल्लेख त्यांत आढळून येत नाहीं. महाराष्ट्र देशाबद्दल सगळ्यांत जुना व अत्यंत स्पष्ट उल्लेख सीलोनमधील महावंश नामक ग्रंथांत आढळतो तो "मौर्य चक्रवर्ती अशोक राजानें थेरो महाधर्मरखिताला महरठ्ठाकडे पाठविलें" असा आहे. (टर्नरचा 'महावंसो', पृष्ठ ७१). या ग्रंथाचा काल इ. स. ५२० ते ५४० आहे.

महाराष्ट्राला दक्षिणापथ म्हणण्याचीहि रूढि होती. या दक्षिणापथाचा राजा अश्वमेध हा होता. विदर्भ, कुंतल, अपरान्त, प्रतिष्ठानक या देशांचा दक्षिणापथामध्यें समावेश होत होता. महाभारतांत अपरान्ताचा उल्लेख आहे. वररुचीच्या ( इ. स. पू. ८०० ते ६०० ) कालाच्या अगोदर विदर्भ, कुंतल, अपरान्त व अश्मक इत्यादि राष्ट्रें महाराष्ट्रांत होतीं. परंतु त्यांचा महाराष्ट्र म्हणून स्वतंत्र उल्लेख केलेला आढळत नाहीं. परंतु या सर्व राष्ट्रांना वररुचीच्या कालापासून कदाचित् त्याचे पूर्वींहि दोन—अडीचशें वर्षें महाराष्ट्र असें म्हणण्यांत येऊं लागले असावें. वररुचीच्या 'प्राकृत प्रकाश' ग्रंथामध्यें महाराष्ट्र देशविषयक लेख आढळतो. इ. स. पू. अनेक शतकें महाराष्ट्र शब्द प्रचारांत होता.

ऐहोळी येथील रविकीर्तीनें लिहिलेल्या शिलालेखामध्यें ( इ. स. ६३४ ) " चालुक्यांचा सत्याश्रय पुलकेशी तिन्ही महाराष्ट्रांचा ( या महाराष्ट्रांची ९९००० गांवें आहेत. ) सार्वभौम राजा झाला " असा उल्लेख आहे. तसेंच वात्स्यायनाच्या कामसूत्रांत व्यंगोक्तीनें महाराष्ट्रांतील स्त्रियांच्या चालीरीतींचें वर्णन केलें आहे.

ह्याच वेळीं हिंदुस्तानांत आलेला चिनी प्रवासी ह्युएनत्संग यानें आपल्या प्रवासवृत्तांतांत वर्णन केलें आहे तें असें कीं, " द्रविड देशाहून उत्तरेस एका लहान गांवास जाऊन तेथून २५०—३०० मैल प्रवास केल्यानंतर कोंकणपुर देशाला गेलों व तो देश सोडून वायव्येस प्रवास केल्यानंतर एक मोठें अरण्य लागलें. त्यांत पुष्कळ क्रूर पशू व लुटारू होते व कोंकणपुराहून २५०--४०० मैल वाट चालल्यानंतर महाराष्ट्र ( mo—ha—la—cho ) या देशांत आलों. या देशाचा विस्तार ७५०—८०० मैल होता व राजधानी ३--४ मैल होती. "

राष्ट्र हा शब्द भाषाविशिष्ट समुच्चयास लावला जात नाहीं. तरी लोकांची सामाजिक कल्पना म्हणजे ' एकलोककल्पना ' भाषानुसारी आहे. चालुक्योदय कालांत देशभाषांना प्राधान्य देण्याचा काल येऊं लागला होता. शातवाहनांच्या सत्ताविकासामुळें महाराष्ट्र भाषा पुढें आली. महाराष्ट्री ही राज्यव्यवहाराची व काव्याची भाषा झाली. वररुचीनें शौरसेनी, मागधी, पैशाची व महाराष्ट्री एवढ्याच चार देशभाषांचा उल्लेख केला आहे. महाराष्ट्री ज्या भागांत बोलली जात असें त्यास महाराष्ट्र म्हणण्याचा प्रघात सुरू झाला असावा.

रट्ट नांवाच्या आर्यांनीं शकपूर्व तिसऱ्या शतकांत महाराष्ट्रांत वस्ती करण्यास सुरुवात केली. हे रट्ट, रट्टी, रथि अगर राष्ट्रिक स्वतःला महारठ्ठी किंवा महारठ्ठ म्हणवीत. त्यांच्या देशाला महारठ्ठ म्हणत व याचेंच संस्कृत रूप महाराष्ट्र होय. अशोकाच्या शिलालेखांत राष्ट्रिकांचा उल्लेख आहे यावरून राष्ट्रिकांचें म्हणजेच रठ्ठांचें जें राष्ट्र तेंच महाराष्ट्र असावें असें वाटतें. महाराष्ट्रांत पूर्वीं मोठें अरण्य होतें व त्या ठिकाणीं या रट्ट आर्यांनीं वस्ती करून त्याचें एक मोठें राष्ट्र बनविलें म्हणूनहि त्यास महाराष्ट्र अगर महारठ्ठ असें नांव पडलें असावें. महारठ्ठांचा म्हणजे

मराठ्यांचा देश म्हणजे महारठ्ठ—महाराष्ट्र हें नांव त्या प्रदेशांतील राहणाऱ्या लोकांवरून प्राप्त झालें असण्याचाहि संभव आहे. महारठ्ठ हे 'मराठे' या शब्दाचे पूर्वरूप असून नाणेघाट, कार्ले, कान्हेरी येथील शिलालेखांतून दान करणाऱ्या पुरुषांच्या नांवाच्या मागें 'महाराठि 'व स्त्रियांच्या नांवाच्या मागें 'महाराठिनी' असें लावलें आहे. नाणेघाटांतील पहिल्या क्रमांकाच्या शिलालेखांत "वेदिसिरिस......महाराठिनो" हे शब्द आले आहेत. महारांच्या देशांत रठ्ठ आर्यांचा प्रसार होऊन महाराष्ट्र बनलें; महार आणि रठ्ठ यांची लढाई होऊन नंतर ते एक झाले व पुढें त्या प्रदेशास या दोघांच्या नांवांचा समावेश होईल असें महारठ्ठ हें नांव पडलें असेंहि कांहींचें मत आहे. भोज (भोई) कुरुयुद्धपूर्व महाराष्ट्रांत होते. महार हे शकवंशीय आहेत. शकानंतर ज्यांचें महाराष्ट्रांत राज्य स्थापन झालें तें शातवाहन हें आंध्र म्हणून समजले गेले आहेत. आंध्र ही जात मूळची महाराष्ट्रीय असली पाहिजे. परंतु ते तेलंगणाचे राजे असले पाहिजेत असें निश्चयेंकरून सांगतां येत नाहीं. शातवाहनांची राजधानी पैठण होती व त्यांचीं नाणीं व शिलालेख अजून महाराष्ट्रांतच सापडत आहेत. शातवाहनांची राजावली आंध्र या नांवानें प्रसिद्ध आहे. आज देखील आंध्र ही जात यवतमाळ व चांदा जिल्ह्यांत विशेषेंकरून आहे व त्यांतील कांहीं लोक मराठी बोलतात व कांहीं तेलंगी बोलतात. वऱ्हाडांत माने किंवा मान्य कुणबी ही जात होती. भोई (भोज), कोळी, महार, रठ्ठ, मान्य इत्यादि जातींपैकीं महार व रठ्ठ यांचें संख्याबल अधिक होतें व पुढें त्यांच्यांत एकीकरण होऊन ते रहात असलेल्या देशास महारठ्ठ—महाराष्ट्र हें नांव प्राप्त झालें. मूळचे द्राविड व नंतर आलेले आर्य—रठ्ठ आर्य—या दोहोंची मिळून महाराष्ट्राची संस्कृति बनली आहे. शकपूर्व सातव्या शतकापासून दंडकारण्यांत आर्यांची वस्ती होण्यास सुरुवात झाली. तत्पूर्वी महाराष्ट्रांत शकपूर्व तिसऱ्या शतकांत रट्ट आर्यांचीं किंवा राष्ट्रकूटांचीं छोटीं छोटीं राज्यें स्थापन झालीं होतीं. अशोकाच्या शासनावरून व नाणे—घाटांतील शिला—लेखांवरून ही गोष्ट सिद्ध होते. मानव्य, सेंद्रक, यादव, कदंब इत्यादि गोत्रांचे रट्ट आर्य दंडकारण्यांत शिरले व तेथें त्यांनीं ग्रामकूटपणा (पाटिलकी), राष्ट्रकूटपणा (देशमुखी), महाराष्ट्र-कूटपणा (सर—देशमुखी) इत्यादि अधिकार प्रस्थापित केले. या रट्ट आर्यांच्या गोत्रांचीं नांवें व महाराष्ट्रांतील शहाण्णव कुळांच्या मराठ्यांचीं आडनांवें (माने, शिंदे, जाधव, कदम) यांत बरेंच साम्य आहे. आर्य दंडकारण्यांत येण्यापूर्वी पुलिंद, शबर, भिल्ल, गोंड, कातकरी, ठाकूर, कोळी, नाग इत्यादि अनार्य लोक तेथें रहात होते.

या महाराष्ट्रांत निरनिराळ्या लोकांचीं राज्यें झालीं. मौर्य घराण्याच्या राज्या-नंतर शातवाहन (शालिवाहन) या घराण्याचें राज्य झालें. आंध्रभृत्यांच्या (शात-वाहनांच्या) पडत्या काळांत महाराष्ट्रांतील रट्टांच्या घराण्याचें राज्य कांहीं काळ

होतें. नंतर त्यांचा पराभव करून चालुक्य आले ( सहावें ते आठवें शतक ). त्यांचा पुलकेशी हा पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानंतर पुनः राष्ट्रकूट ( रट्ट ) घराण्याचें राज्य झालें ( आठवें ते दहावें शतक ). त्यानंतर पुनः चालुक्यांचें राज्य झालें व बाराव्या शतकांत यादवांचें राज्य झालें. देवगिरी ( दौलताबाद ) ही त्यांची राजधानी होती. या राजघराण्यांत रामदेवराव यादव हा प्रसिद्ध पुरुष झाला. रामदेवराव यादवांच्या कारकीर्दींतच ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी रचिली. यादव ( जाधव ) घराण्याचा शेवट मुसलमानांनीं केला. महाराष्ट्राच्या देशावरील भागांत राष्ट्रकूट, चालुक्य, यादव ह्यांचीं राज्यें होतीं त्या वेळीं कोंकणपट्टींत—ठाणें ते कोल्हापूर भागांत शिलाहार राजांचें राज्य होतें. मुसलमानांच्या आक्रमणानंतरचा इतिहास सर्वांना परिचित आहेच. यादवानंतर तीन चारशें वर्षें महाराष्ट्रांत मुसलमानांचें राज्य होतें. शिवाजी महाराजांनीं मराठी राज्याचा सतराव्या शतकांत पाया घातला. त्यानंतर त्याची वाढच होत गेली. मुसलमानांशीं सतत झगडे चालले होते तरी मराठी सत्ता टिकून राहिली. पुढें पेशव्यांनीं इतर मराठे सरदारांच्या मदतीनें मराठी राज्याचा खूपच विस्तार केला व त्यास साम्राज्याचें स्वरूप आणलें. मराठे अटकेपर्यंत पोंचले होते. मराठ्यांचा इ. स. १८१८मध्यें अखेरचा पराभव ब्रिटिशांनीं केला व पुढें ब्रिटिश राज्यसत्ता महाराष्ट्रांत आली हा तर अगदीं आधुनिक इतिहास आहे.

महाराष्ट्रांत राहणाऱ्या लोकांत देशवाचक राष्ट्रीयत्वाची जाणीव बाराव्या अगर तेराव्या शतकापासून निर्माण झाली असावी असें महानुभावांच्या ग्रंथांवरून दिसतें. हे मराठे लोक इतरांपेक्षां वेगळे आहेत, ते शूर आहेत वगैरे त्यांच्या स्वभावाचीं केलेलीं वर्णनेंहि आढळतात. मराठ्यांचें स्वभाववर्णन, 'ते इमानी आहेत, त्यांना पळपुट्यांची चीड आहे, ते करारी आहेत, कृतज्ञ आहेत, ते शत्रूचा पुरा सूड उगविल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत,' असें ह्युएनत्संग या चिनी प्रवाशानें इ. स. ६४०मध्यें केलेलें आढळतें. मराठ्यांचे हे व इतर स्वभावविशेष मराठ्यांच्या उत्कर्षाच्या काळांत तर दिसून येतातच, परंतु या सर्वांपेक्षां महाराष्ट्रांत एकराष्ट्रीयत्वाची भावना मराठी भाषेमुळें निर्माण झाली होती, ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. मराठी ही संस्कृतोत्पन्न भाषा आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे, तर ती पाली भाषेपासून झाली असेंहि कांहींजण म्हणतात; महाराष्ट्री या प्राकृत भाषेपासून ती झाली असेंहि दुसरे कांहींजण म्हणतात. महाराष्ट्रीय व अपभ्रंश या दोन प्राकृत भाषांचें मिश्रण होऊन त्यापासून मराठी झाली असावी हें मत सयुक्तिक असावेसें वाटतें. इ. स.च्या सातव्या शतकांत ती जन्म पावली असावी. त्या वेळेपासून ती बोलभाषा म्हणून सुरू झाली. परंतु संस्कृत भाषेच्या त्या वेळच्या वर्चस्वामुळें त्या भाषेंत चांगली ग्रंथनिर्मिति बाराव्या शतकापर्यंत झालेली दिसत नाहीं. सुशिक्षित लोक संस्कृतांत लिहीत. म्हैसूर संस्थानांतील श्रवणबेळगोळ येथील गोमतेश्वराच्या शिलालेखांत इ.स.

९८३च्या सुमारास मराठींत लिहिलेलें पहिलें वाक्य आढळतें. चाळिसगांवजवळील पाटण या गांवीं इ.स.१२२६मध्यें लिहिलेला दुसराहि एक मराठी शिलालेख उपलब्ध आहे. मराठींत साहित्यनिर्मिति बाराव्या शतकापासून सुरू झाली. मुकुंदराज यांस आद्य ग्रंथकार म्हणतां येईल. त्यानंतर ज्ञानेश्वर महाराज तेराव्या शतकांत येतात. या दोहोंच्या कालामध्यें 'महानुभाव' पंथाचें प्रमुख वाङ्मय निर्माण झालें आहे. मराठी ही त्यांच्या धर्मपंथाचीच भाषा होती. ज्ञानेश्वरी या ग्रंथास तो निर्माण झाल्यापासून सर्व महाराष्ट्रानें शिरोधार्य मानलें व आजहि मानलें जातें. बहुजनसमाजाच्या भाषेंत ज्ञानेश्वरांनीं वेदान्तांतील सर्व ज्ञान सांगितलें. महाराष्ट्रांत एकतेची जाणीव उत्पन्न होण्यास संतवाङ्मयच खरें कारणीभूत झालें आहे. ज्ञानेश्वरानंतर सतराव्या शतकापर्यंत जे जे मराठी ग्रंथ--लेखक झाले ते बहुतेक 'संत'--कवि होते व त्यांनीं वेदान्तांतील व धर्मग्रंथांतील उच्च ज्ञान व तत्त्वज्ञान बहुजनसमाजापर्यंत आणून सोडण्याचें महत्त्वाचें ऐतिहासिक व सांस्कृतिक कार्य केलें. महानुभाव पंथ, ज्ञानदेव, नामदेव, जनाबाई, एकनाथ व तुकाराम ह्यांनींच मराठी भाषा बोलणाऱ्यां-मध्यें एकत्वाची खरी भावना वाढीस लावली. वारकरी-पंथाचा सर्व महाराष्ट्रभर फैलाव झाला. मराठ्यांच्या राज्यसंस्थापनेच्या कामीं शिवाजी महाराजांस, या संत मंडळींनीं निर्माण केलेल्या महाराष्ट्रासंबंधींच्या एकत्वाच्या भावनेचा फार उपयोग झाला. महाराष्ट्र ' आम्ही सांस्कृतिक दृष्ट्या एक आहों ' असें म्हणतो तीं संस्कृति या 'संत'—कवींनींच आपल्या वाङ्मयानें निर्माण केलेली आहे. पंढरीचा विठोबा हें आमचें राष्ट्रीय दैवत व ' ग्यानबा--तुकाराम ! ' हा आमचा जयघोष व 'हर हर महादेव!' ही रणगर्जना हें नागपूर-भंडाऱ्यापासून तों तहत गोव्यापर्यंतच्या प्रदेशांतील लोकांना एकत्र बांधणारें सूत्र आहे असें म्हटलें तर बिलकुल अतिशयोक्ति होणार नाहीं. संतवाङ्मय यच्चयावत् मराठी भाषिकांच्या खालच्या थरापर्यंत पोंचलें. मराठी बोलणाऱ्यांची एक समान संस्कृतीच या वाङ्मयानें निर्माण केली असें म्हणतां येईल. संतांनीं प्रसृत केलेलें तत्त्वज्ञान जातिपंथभेद--निरपेक्ष असल्यामुळें ज्यांनीं ज्यांनीं तें वाचलें त्या सर्व लोकांमध्यें म्हणजे सर्व मराठी--भाषिकांमध्यें ' आपण सर्व एक आहों ' ही ऐक्य--भावना निर्माण झाली. भाषिक राष्ट्रीयत्वाचा खरा पाया महाराष्ट्रांत या संतमंडळींनींच घातला. महाराष्ट्रांतील एकंदर समाज वांशिक व जातिव्यवस्थेच्या दृष्टींनीं विभागलेला दिसला तरी त्यांत सामान्य महाराष्ट्रीयत्वाची जाणीव दिसून येत होती याचें खरें कारण म्हणजे मराठी भाषाच ! महिकावतीच्या बखरींत मराठा—समाजाची व्यापक व्याख्या केली आहे. तींत शहाण्णव कुळींच्या मराठ्यांपासून तों इतर सर्व लहानसहान कनिष्ठ जातीं-पर्यंतच्या साऱ्या लोकांचें ' हे सर्व मराठे ' असें वर्णन केलें आहे त्यावरून मराठी बोलणाऱ्यांचें राष्ट्र तें महाराष्ट्र ही राष्ट्रीय भावना पंधराव्या शतकाच्या सुमारासच

१ "श्रीचावुण्डरायें करवियलें"

महाराष्ट्रांत दृढ झाली होती असें वाटतें. नंतर पुढें शिवाजी महाराजांच्या स्वराज्य–संस्थापनेच्या कार्यामुळें ही भावना दृढतर झाली. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य-प्रस्थापनेच्या बुडाशीं स्वधर्मरक्षणाच्या भावनेबरोबरच स्वराष्ट्र--भाषा व स्वसंस्कृति यांचें रक्षण करण्याची भावनाहि प्रेरक होती असें आपणांस आढळून येईल.

हा सर्व इतिहास देण्याचा उद्देश हा कीं मराठी भाषिकांच्या प्रदेशामध्यें पूर्वीपासूनच एकराष्ट्रीयत्वाची भावना वसत आहे, त्यांच्यामध्यें सांस्कृतिक ऐक्य व एकात्मता आहे हें समजून यावें. शेजारच्या इतर समाजांपासून त्यांचा वेगळेपणा सहज दाखवितां येतो. महाराष्ट्रीयांचेच असे, कांहीं विशिष्ट स्वभाव–विशेष आहेत. हा सर्व इतिहास व ही पूर्वपीठिका लक्षांत घेऊन आज राजकीय दृष्ट्या भंगलेल्या महाराष्ट्राचें पुनः एक राष्ट्र—संयुक्त महाराष्ट्र बनविलें तर या प्रदेशांतील जनता या एकात्मतेमुळें 'संयुक्त महाराष्ट्रा'च्या सरकारशीं स्वयंस्फूर्तीनें सहकार्य करील व एकनिष्ठ राहील आणि असा एकात्म बनलेला महाराष्ट्र हिंदी संघराज्याचा एक प्रबळ घटक बनून संघराज्यासहि मजबुती आणील हें उघड आहे.

आर्थिक किंवा भौगोलिक दृष्ट्याहि या सर्व प्रदेशाचे आणखी विभाग पडण्यासारखे नाहींत. कोंकणची भौगोलिक परिस्थिती व आर्थिक परिस्थिती देशावरील मराठीभाषी भागापेक्षां जरा वेगळी आहे म्हणून व मुख्यतः तेथें बोलली जाणारी कोंकणी ही मराठीपेक्षां वेगळी भाषा आहे म्हणून अलीकडे कोंकण हा एक वेगळा प्रांत करण्यांत यावा असें कांहीं कोंकणी--भाषिकांचें म्हणणें आहे. वस्तुतः या कारणांकरितां कोंकणचा एक वेगळा राजकीय प्रांत करण्यांत यावा असें कोणीहि म्हणणार नाहीं. कारण निदान गेलीं हजार वर्षें तरी कोंकण हें राजकीय दृष्ट्या कधींच स्वतंत्र नव्हतें व नेहमींच घाटावरच्या महाराष्ट्राला जोडलें होतें. परंतु वेगळा प्रांत करण्यांची ही विचारसरणी मुख्यत्वेंकरून दक्षिण कोंकणांतील गोमंतक व कारवारमधील कांहीं लोकांची आहे. राजकीय दृष्ट्या गोमंतक हें पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं गेल्यामुळें व सर्व कारवार जिल्हा कर्नाटकांत घातल्यामुळें घाटावरील मराठी--भाषिकांचे संबंध दुरावले व त्यामुळें त्यांच्यामध्यें मुख्यत्वेंकरून ही वेगळेपणाची भावना निर्माण झाली असावी. उत्तर कोंकणांत सावंतवाडी व रत्नागिरींत, तसेंच ठाणें-कुलाब्यांत जी कोंकणी बोलली जाते ती, या दक्षिण कोंकणांतील कोंकणीपेक्षां पुष्कळ वेगळी आहे. उत्तर कोकणांतील लोकांचे घाटावरील महाराष्ट्रांशींच घनिष्ठ संबंध आहेत. म्हणून सबंध कोंकणी बोलणाऱ्यांचा एक प्रांत करण्यास उत्तर कोंकणांतील सर्व लोकांचा खात्रीनें विरोधच होईल. कोंकणी लोकांची ग्रांथिक भाषा स्टॅन्डर्ड मराठीच आहे. देवनागरी हीच लिपी कोंकणींत लिहावयाचें म्हटलें तरी वापरतात. पोर्तुगीजांच्या अंमलानंतर रोमन लिपींत कोंकणी लिहिण्यास थोडीफार सुरवात झाली व त्यामुळें त्यांत पोर्तुगीज शब्दही आले. कोंकणींत लिहिलेलें वाङ्मय फारसें नाहींच. गोव्यामध्यें जे शिलालेख सांपडले आहेत त्यांतील भाषा पाहतां त्या

वेळची देशावरील मराठी व ती यामध्यें कांहींच फरक नव्हता असें दिसून येतें. बोल-भाषेला स्वतंत्र भाषेचा दर्जा केव्हांच मिळत नाहीं. ग्रियर्सन साहेबांनीं हिंदुस्थानची भाषाविषयक पाहणी करून जो अहवाल प्रसिद्ध केला त्यांत स्पष्ट म्हटलें आहे कीं, " कोंकणी ही वेगळी भाषा होऊं शकत नाहीं. त्यामध्यें लिहिलेलें वाङ्मय नाहीं. कोंकणी भाषिकांनींहि जे ग्रंथ लिहिले ते देशावरील मराठी भाषेंतच लिहिले आहेत. शिवाय ज्या प्राकृत भाषेंतून मराठी भाषा निर्माण झाली त्याच प्राकृत भाषेपासून कोंकणीचीहि निर्मिती आहे. तिला स्वतंत्र भाषा असें कधींच म्हणतां येणार नाहीं. ती एक मराठीची बोली आहे " असें आपलें स्पष्ट मत नमूद केलें आहे व गोवा ते मंगलोरकडील कांहीं मिशनऱ्यांचें कोंकणी ही मराठीची बोली नसून ती एक स्वतंत्र भाषा आहे असें जें म्हणणें आहे तें खोडून काढलें आहे. ' सारस्वती बालभाषा' या नांवाच्या जुन्या एका बोलभाषेपासून कोंकणीची उत्पत्ति झाली आहे असें जें एक मत आहे तेंहि त्यांनीं मान्य केलेलें नाहीं. तसेंच कोंकणी भाषेसंबंधीं डॉ. सुखठणकर यांच्या अध्यक्षतेखालीं चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिटीनेंहि अनेक पुराव्यानिशीं कोंकणी ही मराठीचीच एक बोलभाषा आहे, ती ग्रांथिक भाषा नाहीं, मराठीहून वेगळी अशी स्वतंत्र भाषा नाहीं असाच अभिप्राय प्रकट केला आहे. मिशनऱ्यांनीं गोमंतकांतील कोंकणीभाषिकांच्या करितां म्हणून खिस्तपुराणासारखे जे ग्रंथ लिहिले ते स्टँडर्ड मराठींतच आहेत. यावरून हें सिद्ध होतें कीं कोंकणी ही मराठीची बोली असून ती वेगळी भाषा नाहीं. तेव्हां कोंकणी भाषिकांचा स्वतंत्र प्रांत करण्याची कांहींच गरज नाहीं. कोंकणीमध्येंहि स्थानपरत्वें अनेक फरक आहेत. उत्तर कोंकणांतील लोक भौगोलिक दृष्ट्या जरी कोंकणांत मोडत असले तरी त्यांचे राजकीय, आर्थिक व भाषेच्या दृष्टीनेंहि देशावरील मराठी भागाशींच घनिष्ठ संबंध आहेत. तेव्हां कोंकणीचा वेगळाच प्रांत करावयाचें म्हटलें तरी गोमंतक व कारवार जिल्ह्यांतील कोंकणी-भाषी भाग येवढ्याचाच करावा लागेल. राजकीय व आर्थिक दृष्ट्या येवढा लहानसा मुलूख एक स्वतंत्र राजकीय प्रांत म्हणून कसा नांदूं शकेल ? त्याला कोणत्या तरी शेजारच्या मोठ्या प्रांतांत सामील होण्याखेरीज गत्यंतरच नाहीं. म्हणून या भागाचे नैसर्गिक स्थान मराठी भाषिकांच्या महाराष्ट्रांतच राहील. कोंकणीसारख्या स्थानिक बोलभाषा ( तुळु, कच्छी इत्यादि सारख्या ) हिंदुस्थानांत इतक्या आहेत कीं त्या प्रत्येक भाषेचा वेगळा प्रांत करणें हिंदी संघराज्याची घटना करणाऱ्यांना कधींही युक्त व इष्ट वाटणार नाहीं.

याखेरीज उरलेल्या महाराष्ट्रांत तर विशेष असे आर्थिक व भौगोलिक भेद नाहींतच. त्याचप्रमाणें त्यांतील कोणत्याहि एका भागाचे आर्थिक हितसंबंध इतर भागांहून कांहीं विशेष वेगळे आहेत अशीहि परिस्थिति नाहीं. कारण कोणत्याहि एका भागांत औद्योगिक वाढ केंद्रित झालेली नाहीं किंवा विशिष्ट प्रकारचें उत्पादन व उत्पादनव्यवस्था इतर भागापेक्षां अगदीं भिन्न अशा प्रकारची नाहीं. आज निर-

निराळ्या सरकारांमध्यें वांटल्या गेलेल्या महाराष्ट्रांतील कोणत्याहि विभागाकडे पाहिलें तर मराठीभाषी प्रदेशांची झालेली वांटणी अगदीं अर्थहीन असल्याचें उघड दिसून येतें. महाराष्ट्रांतील कोल्हापूर वगैरे दक्षिणी संस्थानांतील आर्थिक, सामाजिक अगर सांस्कृतिक जीवन हें त्यांच्या लगतच्या मुंबई प्रांतांतील मराठी जिल्ह्यांतलि जीवनापेक्षां कोणत्याहि तऱ्हेनें वेगळें नाहीं. वऱ्हाडमधलि आर्थिक परिस्थितिहि खानदेशच्या आर्थिक स्थितीशीं जितकी जुळती आहे तितकी ती भंडारा किंवा चांदा ह्या मध्यप्रांतांतील जिल्ह्यांच्या आर्थिक परिस्थितीशीं जुळती नाहीं. त्याप्रमाणेंच निजामच्या राज्यांतलि मराठवाडा हा भाग व अहमदनगर, सोलापूर, खानदेश व वऱ्हाडांतील जिल्हे हे बव्हंशीं एकजिनसी स्वरुपाचे आहेत. म्हणून या विभागाची राज्यव्यवस्थेसाठीं निरनिराळ्या प्रांतांत विभागणी करणें या सर्व प्रदेशाला किंवा त्यांतील एका भागाला मुळींच हितावह होणार नाहीं. हिंदुस्थानच्या संघराज्यांत सर्व महाराष्ट्राचा मिळून असा एकच घटक राहिला नाहीं तर महाराष्ट्र लंगडा व दुर्बल होईल. शिवाय या विभागांचे हितसंबंध कोणत्याहि रीतीनें वेगळे नसल्यामुळें त्या विभागांचे स्वतंत्र घटक बनविण्यानें त्यांचें कोणतेंहि हित साधण्याचा संभव नाहीं.

एकाद्या विस्तृत प्रदेशाचा एकच राजकीय प्रांत बनाविल्यानें त्यांतील स्थानिक हितसंबंधांची गळचेपी होऊन कोणचा तरी एकादा विभाग अगर प्रादेशिक गट हा इतरांवर वर्चस्व गाजवील अशी भीति केव्हां व्यक्त केली जाते. तसेंच एकाद्या विभागाची आर्थिक परिस्थिति इतरांपेक्षां थोडी बरी असल्यास त्याचा फायदा फक्त त्याच विभागाला न मिळतां सर्व प्रदेशाला मिळेल व त्यामुळें त्या विशिष्ट विभागांचें नुकसान होईल अशीहि एक तक्रार केली जाते. अशी उघड उघड स्वार्थी तक्रार करणें हें हल्लींच्या काळांत कितपत रास्त होईल हें न सांगतांच समजण्या सारखें आहे. आज हिंदुस्थान आणि इतर दलित व गरीब राष्ट्रें ही अन्नधान्याच्या किंवा इतर बाबतींत संपन्न राष्ट्रांनीं आपणाला विशेष सवलती द्याव्यात अशी मागणी करतांना आढळतात. जगांतील संपन्न राष्ट्रांनीं गरीब राष्ट्रांना मदत करावी हा न्याय जितका सार्वराष्ट्रीय व्यवहारांत लागू पडतो त्यापेक्षां एकाच घटकांतील निरनिराळ्या विभागांना तर अधिकच लागू व्हावयास पाहिजे. म्हणून ही संकुचित वृत्ति कोणी दाखविली तर ती स्वागतार्ह आहे असें म्हणतां येणार नाहीं. शिवाय महाराष्ट्रांत असा कोणताहि एक विभाग वरील तक्रार करण्याला पुरेसें कारण असण्याइतका श्रीमंत नाहीं. फक्त उत्तर कोंकण हा एकच भाग महाराष्ट्रांतील सर्वांत गरीब विभाग आहे. बाकी कोल्हापूर किंवा दक्षिण सातारा, कालव्याच्या पाण्यावर पिकांचें उत्पन्न काढणारे महाराष्ट्रांतील जिल्हे, खानदेश, वऱ्हाड आणि नागपूर हे सर्व भाग शेतीच्या संपन्नतेच्या दृष्टीनें जवळ जवळ सारखेच आहेत. कापसाला तेजी आली असतांचा काळ सोडून दिला तर वऱ्हाडचे जिल्हे हे महाराष्ट्रां-

तील इतर भागांपेक्षां कांहीं विशेष संपन्न होते किंवा आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. उलट विजेच्या शक्तीचें उत्पादन वाढविणाच्या अगर अधिक पाटबंधारे व कालवे खोदण्याच्या शक्यतेमुळें भविष्यकाळांत मुंबई प्रांतांतील महाराष्ट्रच विशेष सधन होण्याचा संभव आहे. तेव्हां कोणत्याहि एका संपन्न विभागानें आपली संपात्ति आपल्यासाठींच उपयोगांत आणली जावी अशी संकुचित मागणी करण्यांतील युक्तायुक्तता जरी बाजूला ठेवली तरी संयुक्त महाराष्ट्रांत आज हा प्रश्नच उद्भवत नाहीं. पुढें आम्ही सरकारी उत्पन्नाची व शेतीच्या उत्पादनाची जी तपशीलवार व आंकडेवार माहिती दिली आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होत आहे. एक भाग अगर प्रादेशिक गट दुसऱ्या भागांवर वर्चस्व गाजवील किंवा एकाद्या भागाकडे सरकारचें दुर्लक्ष होईल ही भीति नाहींशी करण्यासाठीं महाराष्ट्राच्या भावी घटनेमध्यें जरूर तर कांहीं योजना करणें शक्य आहे. मतदानाचा हक्क व राजकीय सत्ता ही सर्वत्र सारख्याच प्रमाणांत वांटलेली असल्यानंतर संयुक्त महाराष्ट्रांतील एक विभाग दुसऱ्या विभागावर वर्चस्व गाजवील ही भीति खरोखर निराधार आहे. सर्वसामान्य-पणें राजकीय जीवनाच्या बाबतींत किंवा सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या बाबतींत ह्या सर्व प्रदेशांत सारखीच परिस्थिति असल्यामुळें अशी कोणत्याहि एका विभागांतील लोकांच्या मनांत ही भीति कां निर्माण व्हावी हें समजणें मोठें कठिण आहे. या सर्व प्रदेशांतील ग्रामीण जनताहि सर्वसाधारणपणें एकाच प्रवृत्तीची व प्रकृतीची, सारखेच हितसंबंध असलेली व एकाच विचारसरणीची आहे. संयुक्त महाराष्ट्रांतील राजकीय सत्ता त्यांच्याच प्रतिनिधींच्या हातीं जाणार आहे. यामुळें त्यांनीं निवड-लेले प्रतिनिधि किंवा त्यांचे राजकीय कार्यक्रम आणि कार्यपद्धति याबाबत निर-निराळ्या विभागांत फारसा फरक पडेल असें वाटत नाहीं. म्हणून या सबंध मराठी-भाषी प्रदेशाचे—संयुक्त महाराष्ट्राचे—कांहीं प्रादेशिक हितसंबंध रक्षण करण्याचे दृष्टीनें आणखी कांहीं विभाग पाडण्याची मुळींच जरुरी नाहीं. परंतु आर्थिक परिस्थितीच्या विषमतेमुळें किंवा भिन्न हितसंबंधांमुळें नव्हे, तर प्रांतांतील राजकीय सत्ता ज्या मध्यवर्ती ठिकाणीं केंद्रित होणार त्या केंद्रापासून एकादा विशिष्ट भाग हा फार दूर असल्यामुळें त्याच्या उन्नतीकडे दुर्लक्ष होईल अशा भीतिमुळेंच पुष्कळ वेळां वेगळा उपप्रांत मागितला जाण्याचा संभव आहे. संयुक्त महाराष्ट्रांतील कांहीं प्रदेशाकडून या मुद्यावर भर देऊन वेगळ्या उपप्रांताची मागणी केली जाण्याचा संभव आहे.

ब्रिटिश राज्ययंत्रांत स्कॉट्लंडसाठीं पुढीलप्रमाणें व्यवस्था झालेली आहे. स्कॉट्लंडसाठीं स्कॉटिश ऑफिस नांवाचे एक वेगळेंच खातें उघडण्यांत आलें असून त्याच्या मुख्याधिकाऱ्याला ‘ सेक्रेटरी फॉर स्कॉट्लंड ’ हें नांव आहे. हा सेक्रेटरी ब्रिटिश कॅबिनेट्चा सभासद असतो. त्याचप्रमाणें स्कॉट्लंड-साठीं लॉर्ड ॲड्व्होकेट व सॉलिसिटर जनरल हे निराळे असून ते जरी ब्रिटिश कॅबिनेटमध्यें नसले तरी ते ब्रिटिश सरकारमध्यें मंत्रिमंडळाचे सभासद असतात.

स्कॉट्लंडमध्यें पूर्वीपासून चालत आलेले अनेक विशिष्ट कायदेकानू असून त्या देशाची कोर्टें व त्यांची कार्यपद्धति याहि वेगळ्या आहेत. पुष्कळ विषयांच्या बाबतींत स्कॉट्लंडसाठीं वेगळे कायदे करावे लागतात. हे सर्व कायदे पूर्वापार चालत आलेल्या रूढिप्रमाणें पार्लमेंटच्या सर्व स्कॉटिश सभासदांच्या मिळून बनलेल्या ' सिलेक्ट कमिटी 'कडे अगोदर विचारासाठीं पाठविले जातात. स्कॉटलंडसाठीं नेमलेल्या मंत्र्याकडे स्कॉटिश प्रश्नाबाबतचीं खातीं असतात. या खात्यांवर कायमचे सेक्रेटरी नेमलेले असून त्यांच्या कचेऱ्या एडिंगबर्ग येथें आहेत. उदाहरणार्थ, स्कॉटलंडसाठीं स्कॉटिश बोर्ड ऑफ् हेल्थ, कॉटिश शिक्षणखातें, स्कॉटिश मच्छीमारी खातें वगैरे खातीं एडिंगबर्ग येथें ठेवण्यांत आलीं आहेत. गेलीं वीस वर्षें स्कॉटलंडला प्रभावी मंत्री मिळाल्यामुळें व स्वायत्ततेच्या चळवळीच्या जोरामुळेंहि आजपर्यंत ह्या व्यवस्थेपासून स्कॉटलंडचा पुष्कळच फायदा झाला आहे. मंत्रिमंडळांतील एका प्रमुख मंत्र्यावर स्कॉटलंडच्या बाबतींतली सर्व जबाबदारी टाकलेली असते व या जागेसाठीं साहजिकच स्कॉट्समनचीच निवड होते. यामुळें स्कॉटलंडमधील प्रश्नांकडे सरकारचें कधीं दुर्लक्ष झालें नाहीं. सामाजिक व आर्थिक व्यवस्थेच्या बाबतींत दोन प्रदेशांत पुष्कळ साम्य असलें तरी ते जेथें एकमेकांपासून फार दूर असतात व प्रांतीय सरकारचें अधिकारकेंद्र दूर राहिल्यामुळें त्यांपैकीं एकाद्या प्रदेशाच्या उन्नतीकडे प्रांतीय सरकारचें दुर्लक्ष होण्याचा संभव असतो, तेथें स्कॉटलंडसारखी व्यवस्था अंमलांत आणल्यानें सर्व प्रकारच्या तक्रारी दूर होण्याचा संभव आहे.

घटक प्रांतांतील मोठमोठ्या शहरांचा प्रश्न हा आणखी एक वेगळाच प्रश्न आहे. कांहीं जणांची अशी सूचना आहे कीं ह्या मोठ्या शहरांना त्यांच्या आजुबाजूच्या प्रदेशांपासून वेगळें करण्यांत येऊन त्यांना हिंदी संघराज्याचें स्वतंत्र घटक बनवावें. मुंबई शहराचे बाबतींत ही सूचना केली जाते. मुंबई शहर हें भौगोलिक दृष्ट्या, ऐतिहासिक दृष्ट्या, वांशिक दृष्ट्या व इतर अनेक दृष्टींनींहि कोंकण विभागांत मोडतें व म्हणून ते मराठीभाषी प्रदेशांपासून कधींहि अलग करतां येणार नाहीं. एकंदर मराठीभाषी प्रदेशांशीं एकात्म असाच तो भाग आहे. ब्रिटिशांच्या कारकीर्दींत महाराष्ट्राबाहेरील पुष्कळ लोक तेथें येऊन राहिले, म्हणून तो महाराष्ट्राचा विभाग नाहीं असें कधींही म्हणतां येणार नाहीं व मराठ्यांच्या देशापासून तोडून त्याला कधींहि अलग करतां येणार नाहीं. लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तरी देखील मराठी भाषिकांचीच मुंबईंत बहुसंख्या आहे. तेव्हां अशा परिस्थितींत मुंबई महाराष्ट्रांतून काढून तिला एका स्वतंत्र शहराचा ( फ्री सिटी ) दर्जा द्यावा हें म्हणणें हास्यास्पद आहे. संघराज्याचें घटक कसे असावेत या बाबतींत पूर्णपणें अज्ञान असणाऱ्यांच्या तोंडूनच अशी सूचना ऐकावयास मिळेल. आधुनिक नागर-जीवन हें अतिशय एकांगी असतें आणि

शहरामध्यें व त्यांच्या आजुबाजूच्या प्रदेशांमध्यें जर कोणत्याही प्रकारचें दळणवळण अगर राजकीय व सामाजिक संबंध नसतील तर त्यामुळें त्या ग्रामीण जनतेचें जें नुकसान होईल त्यापेक्षांहि शहरांचेंच नुकसान अधिक होण्याचा संभव आहे. शहरांतील राजकीय व आर्थिक जीवन हें इतकें वैशिष्टयपूर्ण असतें कीं हिंदी संघ-राज्यांतील इतर घटकांच्या बरोबरीनें कोणतेंही मोठें शहर हें स्वावलंबी व जवळ जवळ सार्वभौम असा घटक बनूंच शकत नाहीं. शिवाय शहर व त्याच्या भोंवताल्च्या प्रदेश यांच्या फारकतीमुळें आजुबाजूच्या प्रदेशांस शहरांतील केंद्रित संपत्तीचा व साधनांचा फायदा मिळेनासा झाल्यामुळें त्यांच्यावर अन्याय होईल तो वेगळाच. प्रांतांतील मुख्य शहराला प्रांतापासून वेगळें केल्यानें प्रांतांतील बौद्धिक व सामाजिक जीवनाचे मुळावरच घाव बसतो. प्रांताच्या अंतर्गत कारभारांत त्यामुळें अनेक अडचणी व घोटाळे निर्माण होतील. त्याचे दुष्परिणाम प्रांतास भोगावे लागतील. त्यामुळें प्रांताची आर्थिक स्थितीहि हलाखीची होईल. शिवाय एक केंद्र अशा रीतीनें गमावल्यास साहजिकच त्या शहराशीं स्पर्धा करणारें असें शहर आपल्या प्रदेशांत निर्माण करण्याची भोंवतालच्या प्रांतांना बुद्धि होईल. अशा रीतीनें प्रांतांतील शहरांना त्यांतून वेगळें काढण्यानें एकंदरींत बरीच अनवस्था माजेल. परंतु अशा मोठ्या मिश्र वस्तीच्या शहरांच्या बाबतींत कांहीं तरी विशेष व्यवस्था दर प्रांतांत करणें अवश्य आहे हें तितकेंच खरें आहे. या शहरांना इतर देशांतील कॉर्पोरेशनच्या धर्तीवर जास्तींत जास्त स्वायत्तता दिल्यानें हा प्रश्न सुटण्यासारखा आहे. या नागर शासनसंस्थांच्या बाबतींत उदार धोरण स्वीकारून त्यांना सार्वजनिक आरोग्य, रस्ते, पूल आणि सार्वजनिक हिताचीं इतर बांधकामें, धंदेशिक्षण धरून इतर सर्व प्राथमिक व दुय्यम शाळांतील शिक्षण, घरबांधणी व शहराची मांडणी, वाढ व सुधारणा याबाबतच्या सर्व योजना, व्यापारी वाहतुक अगर वहातुकीचा कारभार करण्यास मुभा व या सर्व बाबतींत योजनाबद्ध आखणी करण्याचे सर्व अधिकार, तसेंच सर्व प्रकारचें समाजहित व सांस्कृतिक संवर्धन याबाबत नवीन योजना व उपक्रम करण्याची सत्ता वगैरे अधिकार दिले जावेत. इतके अधिकार हातीं मिळाल्यानंतर या मोठ्या शहरांतील जीवनाचे निरनिराळे प्रश्न सोडविण्याचें काम शहरांतील नगरपालिका सहज व सुलभ रीतीनें करूं शकेल.

राजकीय दृष्ट्या मुंबई प्रांतांतील महाराष्ट्र व मध्यप्रांतांतील नागपूर—वऱ्हाडचे मराठी जिल्हे हे एकमेकांपासून फार काळ वेगळे राहिल्यामुळें तेथील लोकांना संपूर्ण एकीकरणाची भूमिका लवकर पटत नाहीं व त्याच्या इष्ट परिणामाची सर्वांना खात्री वाटत नाहीं. म्हणून तेथील जनतेची इच्छा लक्षांत घेऊन विशिष्ट प्रादेशिक व्यवस्था व हितसंबंध रक्षण करण्याची जरूर भासल्यास प्रांताच्या घटनेमध्यें तशी तरतूद करून ठेवण्यास कांहीं हरकत नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वच प्रांतांमध्यें असे प्रश्न कदाचित् निर्माण होण्याचा संभव आहे, म्हणून तो कसा सोडवितां येईल हें व्यापक भूमिकेवरून

पाहिलें पाहिजे. प्रांतांतील त्या विशिष्ट विभागांना प्रांताचा एक पोटविभाग म्हणून उपप्रांताचा दर्जा, एकंदर प्रांताच्या सामर्थ्यास व संघटनेस बाध न येईल अशा रीतीनें देतां येणें शक्य आहे तेवढे सर्व राज्यकारभारविषयक अधिकार त्या उपप्रांताकडे सोपवून हा प्रश्न सोडवितां येईल. संयुक्त महाराष्ट्रांतील जो प्रदेश संस्थानी सत्ते-खालीं आहे त्यांचा प्रश्न सोडवितांनाहि अशा रीतीनें त्या विभागास उपप्रांतांचा दर्जा देण्याची जरूरी कदाचित् भासेल. अर्थात् प्रत्येक संस्थानी विभागाला हा दर्जा देतां येणें शक्य नाहीं. या इतस्ततः विखुरलेल्या लहान संस्थानांना शेजारच्या प्रांतांतच मिळून जावें लागेल. दक्षिण महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व लहान संस्थानें याप्रमाणें मुंबई प्रांतांत नुकतींच विलीन झालीं आहेत. जीं संस्थानें मोठीं आहेत त्यांचे बाबतींतच हे उपप्रांताचे अधिकार देण्याचा प्रश्न निर्माण होतो.

रशिया (यु. एस्. एस्. आर.) हें स्वायत्त लोकसत्ताक राष्ट्रांचें एक संघराज्य बनलेलें आहे. परंतु त्या प्रत्येक स्वायत्त घटकामध्येंहि स्वायत्त प्रदेश अगर स्वायत्त जिल्हे यांचा अंतर्भाव केलेला आहे. युद्धापूर्वी फ्रान्समध्येंहि निरनिराळे विभाग आपल्या प्रादेशिक विभिन्नतेवर जोर देऊन स्वायत्ततेची मागणी करीत होते आणि ब्रिटनमध्येंही स्कॉटलंड व वेल्स यांचेकडून स्वराज्याची मागणी केली जात होती. हिंदुस्थानांतील प्रांतांचा मोठा आकार लक्षांत घेऊन येथेंही हे प्रश्न निर्माण होणार याची जाणीव मॉटफर्ड सुधारणांचा मसुदा तयार करणाऱ्यांना होती व म्हणून प्रांतांमध्यें उपप्रांत निर्माण करून त्यांना बरीच स्वायत्तता द्यावी लागेल असें त्यांना वाटत होतें.

प्रांतामध्यें कांहीं भागांना स्वायत्तता देण्यासाठीं ही उपप्रांतांची योजना पुढीलप्रमाणें करतां येईल. सर्व प्रांतासाठीं म्हणून सर्व सत्ताधीश असें एक कायदे-मंडळ व त्या बरोबरच त्याचें कार्यकारी मंडळ राहील. उपप्रांतासाठीं त्याच्या अधिकारकक्षेपुरतें एक कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ राहील. वरिष्ठ सरकारी नोकरींतील भरती, सध्याच्या 'अखिल भारतीय नोकरी' (ऑल इंडिया सर्व्हिसेस्) प्रमाणें, सर्व प्रांतासाठीं म्हणूनच केली जाणें अवश्य आहे. त्याचप्रमाणें सर्व प्रांताकरितां म्हणून एकच वरिष्ठ न्यायालय राहील किंवा उपप्रांत बराच मोठा असल्यास त्याचेंहि एक वरिष्ठ न्यायालय राहील. तशा परिस्थितींत कांहीं विशिष्ट बाबींपुरतेच सर्व प्रांताच्या वरिष्ठ न्यायालयाचे अधिकार राहतील. तज्ज्ञ नोकर-वर्ग व संशोधन संस्थांसारख्या विशेष संस्था प्रांतिक सरकारच्या अधिकारकक्षेंतील असल्या पाहिजेत. सर्व प्रांताचा गव्हर्नर हा एकच सत्ताप्रमुख असला पाहिजे. डेप्युटी गव्हर्नरही एकच राहील. कायदे करण्याच्या क्षेत्रांत सर्व प्रांताच्या कायदे-मंडळाला आर्थिक, सामाजिक इ. सर्व बाबतींत व्यापक व सर्वश्रेष्ठ स्वरूपाचे अधिकार असले पाहिजेत, हें स्पष्टच आहे. सर्व प्रांतासाठीं म्हणून दिवाणी व फौजदारी कायदे एकच राहतील. तसेंच औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांतील कायदे-कानूहि एकच राहतील. आर्थिक नियोजनास आवश्यक असे सर्व अधिकारहि प्रांता-

कडेच राहतील. तसेंच शेती व पिकें यांच्या नियोजनाचे अधिकारहि प्रांताकडेच राहतील. प्रमुख सामाजिक संस्थांचें संचलन व नियमन प्रांताकडेच राहील व सामाजिक कायद्यांच्या स्थूल रूपरेषांची आखणीहि प्रांतच करील.

उपप्रांतांना कोणते अधिकार सुपूर्त करतां येतील ह्याचा तपशीलवार विचार करण्यापूर्वी संघराज्य—सरकार व त्याचे घटक प्रांत—सरकार यामध्यें कशी सत्ताविभागणी झाली आहे, हें पाहणें जरूर आहे. नव्या हिंदी संघराज्यघटनेंतील या सत्ताविभागणीची निश्चित माहिती आज नसल्यानें सध्यां आपणांस १९३५ च्या हिंदुस्थान सरकारच्या घटना कायद्याच्या सातव्या कोष्टकांत कायदे करण्याचे अधिकाराबाबत ज्या याद्या दिल्या आहेत त्यांचा उपयोग करावा लागेल. या कोष्टकांतील पहिली यादी, म्हणजे संघराज्य—सरकारच्या कक्षेतील जे कायद्यांचे विषय प्रांतिक सरकारकडे देतां येतील त्यांची यादी, तीमधील सर्व अधिकार प्रांतिक सरकारकडेच असावेत. तसेंच संघराज्य—सरकार व प्रांतिक सरकार या उभयतांच्याहि कक्षेंत येणारे असे याच कोष्टकांतील तिसऱ्या यादींतील सर्व अधिकार हेहि प्रांतिक सरकारकडेच असावेत. प्रांतांच्या कक्षेतील कायद्यांच्या यादींतील म्हणजे याच कोष्टकांतील दुसऱ्या यादींतील बरेच विषय उपप्रांत—सरकारकडे देतां येतील. जे प्रमुख अधिकार उपप्रांताकडे सोपविणें शक्य आहे त्या विषयांची यादी पुढीलप्रमाणें होईल.

(१) सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था.
(२) प्रांतिक वरिष्ठ न्यायालयाखेरीज इतर सर्व न्यायालयांवरील देखरेख व सत्ता.
(३) पोलिस.
(४) तुरुंग व अल्पवयी गुन्हेगारांच्या सुधारणा—शाळा.
(५) स्थानिक कामें.
(६) स्थानिक स्वराज्यसंस्था.
(७) सार्वजनिक आरोग्य आणि स्वच्छता.
(८) प्राथमिक व दुय्यम शिक्षण. तसेंच या इयत्तेपर्यंत दिलें जाणारें औद्योगिक व धंदेशिक्षण.
(९) उपप्रांताची म्हणून ठरविलेलीं वहातुक व दळणवळणाचीं साधनें.
(१०) लहान पाटबंधारे.
(११) शेती—संशोधन व पिकांचें नियोजन याव्यतिरिक्त शेतीविषयक कामें.
(१२) जमीन व खंडपद्धति.

(१३) स्थानिक बाजार व जत्रा.

(१४) धर्मादाय व धर्मादाय संस्था.

(१५) नाट्यगृहें व नाट्यप्रयोग.

(१६) उपप्रांतांचीं वाचनालयें व पदार्थसंग्रहालयें.

१९३५ च्या घटना—कायद्यांतील प्रांताच्या कक्षेतील कायद्यांच्या यादीपैकीं जे प्रमुख विषय प्रांताकडेच असणें जरूर आहे ते पुढीलप्रमाणें:—

(१) मोठीं धरणें व पाटबंधारे.

(२) शेतीसंशोधन व पिकांचें नियोजन.

(३) खाणी व खानिज संपत्ति.

(४) गॅस, वीज, इ. शक्तींची निर्मिति व वाटणी.

(५) उद्योगधंदे व व्यापार, सावकारी व सावकारी करणारे (संस्था व व्यक्ति).

(६) कारखाने व त्यांची वाढ.

(७) वजन—मापें.

(८) बेकारी, अनाथांना मदत व सामाजिक सुरक्षा.

(९) औद्योगिक व व्यापारी संघ आणि मंडळ्या (कंपनी).

(१०) चित्रपट—व्यवसाय

(११) विद्यापीठें व त्या दर्जाचें इतर उच्च शिक्षण.

यावरून हें दिसून येईल कीं दैनंदिन राज्यकारभाराचें बहुतेक सारें काम या वाटणीमुळें उपप्रांतांकडे जात आहे व प्रामुख्यानें लहान प्रदेशाशीं संबद्ध असलेले सर्व विषयहि त्याचेकडे जात आहेत. पद्धतशीर कामाच्या व काटकसरीच्या दृष्टीनें शक्य तितक्या मोठ्या क्षेत्रावर जे विषय हाताळणें जरूर आहे व ज्यांचें परिणाम दूरगामी व व्यापक संभवतात तेवढेच विषय प्रांतिक सरकारकडे ठेवले आहेत. तथापि प्रांताच्या कक्षेतील पुष्कळशा विषयांचा प्रत्यक्ष कारभार स्वतंत्र प्रांतिक नोकरवर्गाकडून न करतां उपप्रांत—सरकारच्या मध्यस्तीनें करतां येण्यासारखा आहे.

राज्यकारभाराच्या सर्व शाखांतील वरिष्ठ प्रतीच्या नोकरवर्गाची भरती ‘ प्रांतिक सरकारचा नोकरवर्ग ’ म्हणून केली जाणें आवश्यक आहे. तसेंच प्रत्येक वरिष्ठ अधिकाऱ्यानें एकापेक्षां अधिक उपप्रांतांत नोकरी केली पाहिजे. यामुळें उपप्रांताच्या अधिकारकक्षेतील विषयांची यादी मोठी असली तरी देखील, उपप्रांतामध्यें राज्यकारभारविषयक कल्पनांची परस्परांत देवघेव होऊन राज्यकारभाराच्या पद्धतींत बरीचशी समानता येईल.

कायदेविषयक व राज्यकारभाराविषयक बाबींच्या विभागणीपेक्षां उत्पन्न-विषयक बाबींची विभागणी करतांना अनेक अडचणी निर्माण होतील. जमीन महसूल, शेती उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर, दिवाणी ( ज्युडिशियल ) स्टँपांचें उत्पन्न आणि कदाचित् करमणुकीवरील कर, यांचें उत्पन्न उपप्रांतांना देणें शक्य आहे. इतर बहुतेक करांच्या बाबतींत ही गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बऱ्याच मोठ्या प्रदेशांत करांची समानता असली पाहिजे आणि कोणत्याहि दोन उपप्रांतांत करांच्या आकारणींत व अंमलबजावणींत तफावत पडूं न देण्याची दक्षता घेतली पाहिजे. अबकारी कर, शेती उत्पन्नाखेरीज अन्य उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर, औद्योगिक संघ ( कार्पोरेशन ) व मंडळ्या ( कंपन्या ) वरील कर, वारसा-कर, खाणी व खोदण्याच्या हक्कावरील कर आणि विक्रीकर, हे सर्व कर असे आहेत कीं, त्यांच्या दरामध्यें, आकारणीच्या पद्धतींमध्यें व अंमलबजावणीमध्यें दोन उपप्रांतांत फरक असूं नये. उपप्रांतांना दिलेलीं उत्पन्नाचीं साधनें त्यांच्या गरजा भागविण्यास अपुरीं आहेत असें आढळून आल्यास प्रांतिक स्वरूपाच्या करांतील कांहीं करांचा हिस्सा या उपप्रांतांना देण्यांत येईल.

प्रांताची एकात्मता अबाधित राखून उपप्रांताचें अधिकारक्षेत्र वरीलप्रमाणें जास्तींत जास्त विस्तारतां येईल. परंतु प्रांतामध्यें जेवढे म्हणून राज्यकारभार-विषयक उपविभाग केले असतील त्या प्रत्येकाला हे सर्व अधिकार देणें जरूर आहे असें मुळींच नाहीं. सध्या भावी महाराष्ट्राचे–संयुक्त महाराष्ट्राचे–पुढीलप्रमाणें उपप्रांत होऊं शकतील असें दिसतें. ( १ ) पूर्व महाराष्ट्र ( २ ) पश्चिम महाराष्ट्र ( ३ ) बृहन् मुंबई. इतस्ततः विखुरलेल्या लहान संस्थानांचा कार्यक्षम असा एक संघ करणें शक्य होणार नाही म्हणून अशा लहान लहान संस्थानांना ज्या प्रांतांत तीं आहेत त्यांतच मिळून जावें लागेल. याप्रमाणें दक्षिणेंतील बहुतेक मराठी संस्थानें मुंबई प्रांतांत नुकतींच विलीन झालीं आहेत. संयुक्त महाराष्ट्रांत जर बस्तर संस्थान समाविष्ट झालें तर त्याचाहि एक स्वतंत्र उपप्रांत होऊं शकेल आणि गोमान्तक व त्यालगतचा कोंकणी भाषिकांचा भाग यांचाहि एक लहान उपप्रांत बनवितां येईल. वर वर्णन केलेले उपप्रांताचे संपूर्ण सत्ताधिकार फक्त पूर्व व पश्चिम महाराष्ट्र या दोन मोठ्या घटकांनाच द्यावेत. उत्पन्नाच्या व लोकसंख्येच्या दृष्टीनें लहान असलेल्या इतर उपप्रांतांनीं, वर उपप्रांताच्या अधिकारक्षेत्रांतील विषयांची जी यादी दिली आहे त्यांपैकीं बरेच विषय प्रांतिक सरकारच्या सत्तेकडेच सोंपाविणें सोईस्कर होईल.

मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राच्या सरहद्दीवरील बेळगाव व कारवार जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांत, तसेंच निजामचे राज्यांतील गुलबर्गा व बिदर आदिलबाद या जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांत आणि मध्यप्रांतांतील खांडवा, बैतुल, छिंदवाडा व बालाघाट या जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांत मराठी भाषिकांची बरीच लोकसंख्या असून त्यांचा प्रदेश

मराठीभाषी प्रदेशाशीं सलग आहे. तेव्हां संयुक्त महाराष्ट्राच्या मर्यादा—सरहद्दी ठरवितांना हे बहुसंख्य मराठी वस्तीचे महाराष्ट्राशीं सलग असलेले भाग संयुक्त महाराष्ट्रांत समाविष्ट करणें जरूर आहे. तेव्हां भाषावार प्रांतरचना करावयाची ठरल्यानंतर भाषावार प्रांतांच्या सीमा ठरविण्याचें महत्त्वाचें काम आहे; आणि तें काम कांहीं तत्त्वानुसारच झालें पाहिजे.

या बाबतींत कांहीं थोड्या मूलभूत गोष्टींकडे प्रथम लक्ष देणें जरूर आहे. ज्या क्षेत्रविस्ताराची पुनर्विभागणी होणार तो सर्वच्या सर्व प्रदेश या नवीन घटकांत संपूर्णपणें विभागाला गेला पाहिजे हें अगदीं उघडच आहे. त्यासाठीं, प्रदेश—वांटणीचीं तत्त्वें व पद्धति अशीं आखलीं पाहिजेत कीं, कुठलाहि प्रदेश अथवा लोकवस्ती एकाच वेळीं एकाहून अधिक घटकांत समाविष्ट केली जाणार नाहीं किंवा कुठल्याच घटकांत समाविष्ट न होतां ती तशीच अधांतरी राहणार नाहीं. शिवाय आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे नवीन बनलेल्या प्रत्येक घटकाचें क्षेत्र हें एकत्र व एकाच सलग भूप्रदेशाचें झालें असलें पाहिजे व त्याची सरहद्दहि सलग व अखंडित असली पाहिजे. याचाच अर्थ असा कीं त्या त्या घटकाच्या सरहद्दींनीं वेढलेला प्रदेश हा सर्व त्या त्या घटकाच्याच मालकीचा असला पाहिजे; त्यांत इतर घटकांच्या मालकीचीं बेटें किंवा कप्पे तरंगता कामा नये. आणखी हीहि गोष्ट स्पष्ट आहे कीं, राजकीय एकजिनसीपणाची कोणतीहि कसोटी लावली तरीदेखील अखेर सर्व नव्या घटकांच्या परिसरांत संमिश्र लोकवस्तीचे असे कांहीं प्रदेश उरतीलच. हे लोकवस्तीचे भाग त्या त्या राजकीय घटकांतील अल्पसंख्याकांच्या लोकवस्तीचे भाग म्हणून मानले गेले पाहिजेत. त्यांतील लोकवस्ती परकीय आहे व त्या कारणानें ज्या घटकाच्या चतुःसीमेंत ती वसली आहे त्या घटकाच्या राजकीय अधिपत्याखालीं ती येत नाहीं, असें मुळींच समजलें जाणार नाहीं.

भाषावार प्रांतांच्या सरहद्दी निश्चित ठरवितांना कांहीं ठिकाणीं सार्वमत घ्यावें लागेल. यापेक्षां दुसरी कोणतीहि पद्धत प्रस्तुत बाबतींत अधिक योग्य व सोईस्कर असल्याचें आढळणें संभवनीय नाहीं. परस्परविरोधी पक्षांकडून आपापल्या मागण्यांच्या निर्णयासाठीं १९४१-सालच्या शिरगणतीसारखे पूर्वीच्या मोजदादींचे आधार-पुरावे मान्य केले जाण्याचा संभव फारच थोडा आहे. दुसरें असें कीं, सरहद्दीवरील प्रदेशाच्या लोकसंख्येची विभागणी, तेथें प्रत्यक्ष राहणाऱ्यांच्या इच्छेप्रमाणेंच उत्तम होऊं शकते. अशाप्रकारें सार्वमत घेतांना, ज्या पद्धतीनें गेल्या कांहीं दशकांत युरोप व इतर पाश्चात्य देशांमध्यें सार्वमत घेतलें गेलें, तीच पद्धत आपण अनुसरावी हें चांगलें. प्रथम दोन्ही विरोधी पक्षांना त्यांच्या त्यांच्या मताप्रमाणें त्यांच्या त्यांच्या प्रदेशाच्या सीमा आखण्यास पाचारावें. नंतर एकापेक्षां अधिक प्रांतांच्या चतुःसीमेंत सामील करून घ्यावा अशा ज्या प्रदेशाबद्दल मागण्या होतील तो ' विवाद्य ' अगर ' वादांतील प्रदेश ' म्हणून समजला जाईल. अर्थात् हा प्रदेश सार्वमतानें जी नक्की

सीमा ठरविली जाईल त्या सीमेच्या दोन्ही बाजूंचाच असणार. याच सरहद्दीवरील पट्ट्यांत सार्वमत घेतलें जाईल. जमीन महसूलाचा गांव म्हणजे मुख्य गांव व त्याखालीं कांहीं वाड्या असल्यास तोहि सर्व प्रदेश, हें सार्वमताचा निर्णय ग्रथित करताना व सीमारेषा ओढतांना प्रारंभिक अविभाज्य प्रमाण ( बेसिक युनिट ) धरलें जाईल. सार्वमतानंतर, प्रत्येक घटक प्रांताची सरहद्द सलग व अखंडित असली पाहिजे. या तत्त्वास धरून आणि लोकमतास शक्य तितकें अनुसरून सीमारेषा ओढल्या जातील. म्हणजेच सीमारेषा आंखतांना जास्तींत जास्त मतदारांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला जाईल. या वेळीं हें गृहित धरलें आहे कीं संघराज्याच्या घटनेमध्यें, पुढील अनुभवाच्या अनुषंगानें, प्रांतांच्या सरहद्दीमध्यें वा दर्जामध्यें कांहीं फेरबदल आवश्यक वाटल्यास तो करण्याची सवलत ठेवली जाईल.

जमीन महसूलाचा गांव हें प्रारंभिक अविभाज्य प्रमाण मानून सार्वमत घेण्याची पद्धत ज्या ठिकाणीं सरहद्द अरण्य, अगर ओसाड वाळवंट अशा प्रकारच्या निर्मनुष्य भूभागांतून जात असेल त्या ठिकाणीं निरुपयोगी ठरेल. अशा प्रसंगीं नद्यांचे प्रवाह, जलसंचय इ. भौगोलिक रचना लक्षांत घेऊनच सीमारेषा ठरविल्या जातील. जर अशा निर्जन पट्ट्यांत बहुमोल खनिज व उद्भिज संपत्ति प्रास वा सुप्त असेल तर मात्र सीमानिर्णयाचा प्रश्न फार बिकट होईल. अशा वेळीं त्या प्रदेशाच्या भौगोलिक, समाजशास्त्रीय अशा विविध अंगोपांगांची सूक्ष्मपणें सविस्तर चिकित्सा करूनच सीमांची आंखणी पार पाडावी लागेल. तुर्कस्तान आणि इराण यांच्या दरम्यान मोसल प्रांताची वांटणी करतांना असा प्रसंग आला होता. तें उदाहरण अशा वेळीं उद्बोधक ठरेल.

सार्वमताचे वेळीं मताधिकारी लोक कोण याचा निर्णय करतांना कांहीं प्रश्न उपस्थित होतील. सरहद्दीवरील सार्वमतांत तेथील वास्तव्याबाबतची मतदाराची लायकी ठरवितांना काळजीपूर्वक विचार केला पाहिजे. राजकीय एकात्मतेच्या निकषाप्रमाणें एकादा विभाग अगर लोकवस्ती एका विशिष्ट राजकीय घटकांत स्पष्टपणें मोडत असतांना, ज्यावेळीं त्या घटकापासून फुटून निघण्याचा तो विभाग आग्रह धरीत असेल त्यावेळीं ' रहिवाशी ' शब्दाची व्याख्या फारच दक्षतेनें केली पाहिजे. अशा वेळीं या एकजिनसी राजकीय घटकाचे जे खरेखुरे रहिवाशी असतील व तसें निष्ठापूर्वक मानत असतील त्यांनाच केवळ हा मतदानाचा हक्क आहे असें गृहित धरलें पाहिजे. जे त्या विभागाचे रहिवाशी नाहींत अगर जे तसें समजत नाहींत त्यांना तो हक्क असतां कामा नये. जी लोकसंख्या तेथें स्थायिक नसून उपरी आहे तिला एकात्म असलेला प्रदेश दोन घटकांत विभागावा किंवा काय हें ठरविण्याचा बिलकूल अधिकार नाहीं.

# क्षेत्रविस्तार व लोकसंख्या

संयुक्त महाराष्ट्राचें भूगोलावरील स्थान उत्तर अक्षांश १५ ते २२ यांचे दरम्यान व पूर्व रेखांश ७२॥ ते ८२ चे दरम्यान आहे. पूर्व–पश्चिम कमाल अंतर अंदाजें ६०० मैल असून दक्षिणोत्तर अंतर अंदाजें ४०० मैल आहे. पूर्वेकडून पश्चिमेकडे दक्षिण बाजूनें हें क्षेत्र कमी होत होत दक्षिण टोकाला तें ३०–४० मैल एवढें होतें. पूर्वेकडील किमान दक्षिणोत्तर अंतर अंदाजें १२० मैल होतें. साधारण-पणें हा त्रिकोणाकृति प्रदेश होतो.

याच्या सीमा:—उत्तरेस गुजरात, मध्य हिंदुस्तानांतील संस्थानें, मध्यप्रांतांतील खांडवा, हुशंगाबाद, छिंदवाडा, शिवणी, बालाघाट हे जिल्हे; पूर्वेस रायपूर, बिलासपूर हे मध्यप्रांतांतील जिल्हे, कांकर संस्थान, ओरिसा व मद्रास प्रांताचे जिल्हे; दक्षिणेस अदिलाबाद, करीमनगर, निजामाबाद, बिदर, गुलबर्गा हे निजामचे राज्यांतील जिल्हे व मुंबई प्रांतांतील विजापूर, बेळगांव, धारवाड व कारवार हे कर्नाटकचे जिल्हे आणि पश्चिमेस अरबी समुद्र अशा सीमा होतील. खांडवा, छिंदवाडा, बालाघाट, बिदर, गुलबर्गा, बेळगांव व कारवार ह्या जिल्ह्यांतील कांहीं तालुक्यांत बहुसंख्य मराठी मातृभाषिक आहेत व त्यांचा प्रदेश संयुक्त महाराष्ट्राशीं सलगहि आहे. निश्चित सरहद्दी ठरविण्यांत येतील त्या वेळीं हा भाग संयुक्त महाराष्ट्रांत येईलच. परंतु ह्या जिल्ह्यांतील बहुसंख्य लोक मराठीखेरीज अन्य भाषा बोलणारे असल्यामुळें ते सरहद्दीवरील जिल्हे म्हणून दाखविले आहेत. म्हणून ह्या जिल्ह्यांचा संपूर्ण प्रदेश महाराष्ट्राच्या सीमेपलीकडील असें समजण्याचें कारण नाहीं.

नैसर्गिक सीमा:—उत्तरेस सातपुडा पर्वत आणि तापी व नर्मदा या नद्या; पूर्वेस वैनगंगा व दक्षिणेस पूर्वेकडून पश्चिमेकडे येतांना गोदावरी व कृष्णा या नद्यांचे उत्तर प्रवाह लागतील. दक्षिणेस तुंगभद्रा नदी व पश्चिमेस अरबी समुद्र अशा या प्रदेशाच्या नैसर्गिक सीमा होतील. संयुक्त महाराष्ट्राचें एकंदर क्षेत्र १३३४६६ चौरस मैल आहे. लोकसंख्या २८११७६०५ आहे. पैकीं मराठी भाषिकांची संख्या अंदाजें २१५८५७०० आहे.

ही लोकसंख्या विद्यमान राजकीय विभागांत पुढीलप्रमाणें विभागली गेली आहे.

| | क्षेत्रफळ (चौ. मैल) | एकंदर लोकसंख्या | अंदाजें मराठी मातृभाषिक | मराठी भाषिकांचें लोकसंख्येशीं शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| मुंबई प्रांतातील महाराष्ट्र | ४७२८६ | १२९१३५४४ | १००४५१०० | ७७·८ |
| मध्यप्रांतातील महाराष्ट्र ( महाविदर्भ )... | ३६८६५ | ७०२०६९४ | ५३८८३०० | ७६·७ |
| एकूण प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्र... | ८४१५१ | १९९३४२३८ | १५४३३४०० | ७७·४ |
| मुंबई प्रांतातील मराठी संस्थानें... | ११३१४ | २७२०२०७ | २१२०७०० | ७७·९ |
| निजामच्या राज्यांतील मराठवाडा... | २२७६६ | ४२४९२७२ | ३२९९३०० | ७७·६ |
| गोमंतक | १५३४ | ५८०००० | ५२०००० | ८९·६ |
| बस्तर* | १३७०१ | ६३३८८८ | २१२३०० | ३३·५ |
| एकूण संयुक्त महाराष्ट्र... | १३३४६६ | २८११७६०५ | २१५८५७०० | ७६·८ |

१. सदरहू लोकसंख्येचे आंकडे १९४१च्या शिरगणतीच्या अहवालावरून घेतले आहेत. यामध्यें १९४१ सालचे मराठी मातृभाषिकांचे दिलेले आंकडे अंदाजें काढलेले आहेत. कारण १९४१ सालच्या अहवालांत भाषावार नोंद उपलब्ध नाहीं. त्यामुळें १९३१ ते १९४१ या दहा वर्षांत त्या त्या जिल्ह्यांत एकंदर लोकसंख्येची जेवढी वाढ झाली तेवढीच मराठी भाषिकांची झाली असें धरून हे आंकडे काढले आहेत.

संयुक्त महाराष्ट्राच्या क्षेत्रविस्तारांत मुंबई प्रांतातील मुंबई शहर व उपनगर, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, नाशीक, नगर,

* हलबी भाषा बोलणारांची लोकसंख्या १९३१ च्या शिरगणती अहवालांत १७१२९३ होती. म्हणजे एकंदर लोकसंख्येंत त्यांचें शेंकडा ३३ प्रमाण होतें. १९४१ सालींही अंदाजें इतकेंच असावें. मराठी भाषिक शेंकडा ३३·५ व हलबी बोलणारे शेंकडा ३३ मिळून दोहोंचें प्रमाण लोकसंख्येंत शेंकडा ६६·५ पडतें. इतकें प्रमाण असल्यामुळें व हलबी ही मराठीचीच एक फुटकी तुटकी बोली आहे असा भाषाशास्त्रज्ञांचा अभिप्राय असल्यामुळें हें संस्थान संयुक्त महाराष्ट्रांत घेतलें आहे.

पुणें, सोलापूर, सातारा हे जिल्हे; मध्यप्रांतांतील नागपूर, वर्धा, चांदा, भंडारा व वऱ्हाडचे अकोला, अमरावती, यवतमाळ व बुलढाणा हे जिल्हे; निजामचे राज्यांतील मराठवाडा म्हणजे उस्मानाबाद, बीड, औरंगाबाद, नांदेड व परभणी हे जिल्हे; मुंबई प्रांतांतील कोल्हापूर, सावंतवाडी, सांगली, मिरज ज्युनिअर व सीनियर, कुरुंदवाड ज्युनियर व सीनियर, फलटण, औंध, भोर, जत, जंजिरा, जव्हार, डांग, सुरगाणा, वांसदा व धरमपूर हीं संस्थानें; पोर्तुगीज गोवा व मध्यप्रांतांतील बस्तर संस्थान यांचा समावेश होतो. यांपैकीं हिंदी संघराज्यांतील मुंबई प्रांतांतील महाराष्ट्र, वऱ्हाड मध्यप्रांतांतील मराठी जिल्हे व मुंबई प्रांतांतील सर्व मराठी संस्थानें (आतां विलीन झाल्यामुळें) यांचा प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्र आज तावडतोब होणें शक्य आहे. निजामचे राज्यांतलि मराठवाडा व पोर्तुगिज गोवा यांना संयुक्त महाराष्ट्रांत समाविष्ट करण्याचा प्रश्न थोडा उशीरां सुटण्याचा संभव आहे. बस्तर संस्थानांत मराठी मातृभाषिक शें. ३३.५ च आहेत. परंतु तेथें बोलली जाणारी हलबी भाषा ही मराठीचीच एक फुटकी तुटकी बोली आहे. असें भाषाशास्त्रज्ञांचे मत असल्यामुळें तूर्त हें संस्थान संयुक्त महाराष्ट्रांत धरलें आहे. या हलबी भाषेसंबंधीं पुढें विवेचन येईलच. तेथील लोकांच्या मतानुसारच हें संस्थान संयुक्त महाराष्ट्रांत समाविष्ट करावयाचें कीं नाहीं हें अखेर ठरविण्यांत येईल. मराठवाडा, गोमंतक वगैरेसह सर्व सलग मराठीभाषी प्रदेशाचा जो महाराष्ट्र होईल त्यास संपूर्ण संयुक्त महाराष्ट्र असें म्हटलें आहे.

शिवाय संयुक्त महाराष्ट्राच्या सरहद्दी निश्चित होतील त्यावेळीं सरहद्दिवरील बेळगांव जिल्ह्यांतील संपूर्ण चंदगड महाल, खानापूर व बेळगांव तालुक्यांचा बराचसा भाग, कारवार जिल्ह्यांतील संपूर्ण सुपा पेटा व कारवार, हलियाळ तालुक्यांचा बराचसा भाग, मध्यप्रांतांतील, बऱ्हाणपूर, भैंसदेही, सौसर, वाराशिवणी, मुल्ताई, बालाघाट व बैहार या तहाशिलींचा कांहीं भाग व निजामचें राज्यांतील बिदर व गुलबर्गा जिल्ह्यांतील कांहीं भाग यांचा संयुक्त महाराष्ट्रांत समावेश होणें संभवनीय आहे. हा प्रदेश मिळाला असतां संपूर्ण संयुक्त महाराष्ट्राचें क्षेत्रफळांत सहा ते सात हजार चौरस मैलांची भर पडेल व लोकसंख्या पांच ते सहा लाखांनीं वाढेल. अर्थात् याचबरोबर निश्चित सरहद्दी ठरतांना सोलापूर तालुक्यांतील कांहीं गांवें, तसेंच सांगली, मिरज ( दोन्ही पात्या[1]) कुरुंदवाड ( दोन्ही पात्या ) औंध, जत, कोल्हापूर या संस्थानांतील कांहीं गांवें कर्नाटकांत जाण्याचा संभव आहे. म्हणून सरहद्द कमिशनच्या निर्णयानंतरची ही होणारी आवक जावकआज हिशेबांत न धरतां संपूर्ण संयुक्त महाराष्ट्राचें क्षेत्रफळ व लोकसंख्या दिलीं आहेत.

संयुक्त महाराष्ट्रांत लोकसंख्येची विभागणी कशी झाली आहे हे दर्शविणारे जिल्हावार व संस्थानवार तक्ते पुढें दिले आहेत. १९२१, १९३१ व १९४१ अशा तीन शिरगणती अहवालांचे आंकडे देण्यांत आले आहेत. लोकसंख्येंत वाढ अगर घट

१ कोल्हापूर ,अजून मुंबई प्रांतांत विलीन झालें नसलें तरी लौकरच होण्याचा संभव आहे.

कशी होत गेली हें कळण्यासाठीं मागील २० वर्षांचे आंकडे उपयुक्तच ठरतील. तसेंच सरहद्दीवरील मराठी भाषी भागांचे त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणांत निरनिराळे गट पाडून त्यांचाहि एक तक्ता पुढें देण्यांत आला आहे. ह्या सरहद्दीवरील मराठी भाषिकांच्या प्रदेशासंबंधीं कसा निर्णय घेण्यांत यावा हें प्रास्ताविक भागांत सांगितलेंच आहे. बेळगांव जिल्ह्यांतील चंदगड महाल व कारवार जिल्ह्यांतील सुपा पेटा यांतील मराठी भाषिकांची संख्या एकंदर लोकसंख्येंत अनुक्रमें शें. ९४ व शें. ९० असल्यामुळें व हे भाग संयुक्त महाराष्ट्राशीं सलग असल्यामुळें त्यांचा संयुक्त महाराष्ट्रांत समावेश होणें अवश्य आहे. याखेरीज बाकी वर दिलेले जे सरहद्दीवरील तालुके आहेत त्यांतील सलग असलेलीं बहुसंख्य मराठी भाषिकांच्या वस्तीचीं गांवें संयुक्त महाराष्ट्रांत व बहुसंख्य कानडी अगर हिंदी भाषिकांच्या वस्तीचीं गांवें कर्नाटक अगर महाकोसलमध्यें जातील. प्रत्येक गांवाची भाषावार लोकसंख्या घेऊन व जरूर पडेल त्याप्रमाणें कदाचित् कांहीं विवाद्य बाबतींत सार्वमत घेऊन हा प्रश्न सोडवावा लागेल. सरहद्दीवरील ५० ते ७५ टक्के मराठीभाषी गटांपैकीं जवळ जवळ सर्व प्रदेश संयुक्त महाराष्ट्रांत समाविष्ट होण्याचा संभव आहे. यांतील फारच थोडीं गांवें शेजारच्या प्रांतांत जातील. ४० ते ५० टक्के मराठीभाषी गटांतील निम्यापेक्षां अधिक गांवें संयुक्त महाराष्ट्रांत येण्याचा संभव आहे. २५ ते ४० टक्के मराठीभाषी गटांतील सुमारें एकतृतीयांश गांवें संयुक्त महाराष्ट्रांत येण्याचा संभव आहे. त्याखालील १० ते २५ टक्के मराठीभाषी गटांतील एकादेंदुसरें गांव संयुक्त महाराष्ट्रांत येईल.

बस्तर संस्थान महाराष्ट्रांत धरलें आहे त्याचें कारण तेथें बोलली जाते ती हळबी भाषा मराठींत मोडते असें भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. ग्रिअर्सननें आपल्या अहवालांत (Linguistic Survey of India: Vol. vii P. 330-336) "ती एक मराठीची फुटकीतुटकी बोली आहे, ती हळबा या नांवांच्या तेथें राहणाऱ्या वन्य जातीच्या लोकांची भाषा आहे. भंडारा जिल्ह्यांतील हळबा लोक आतां मराठी बोलूं लागले आहेत. हळबी बोली ही छत्तिसगढी, ओरिया व मराठी यांचें एक विचित्र मिश्रण आहे. भंडारा जिल्ह्यांत मराठीचा तिच्यावर इतका प्रभाव पडला आहे कीं तिला आतां मराठीची बोली म्हणणें योग्य ठरेल," असें म्हटलें आहे. या भाषेची एकंदर मोडणी मराठी-सारखी आहे. लोकसंख्येची वाढ होत गेली तसतशी हळबीखेरीज इतर बोली बोलण्यांतून कमी होऊन हळबी बोलणारे लोक वाढत गेले आहेत. बस्तरखेरीज इतर भागांत जेथें ती बोलली जात होती तेथें ती हळूहळू आतां मराठींत मिसळून जाऊं लागली आहे. आणि कांहीं काळांनीं ती मराठीपासून वेगळी दाखविली न जातां मराठीच्या इतर बोलींप्रमाणें तिची एक बोली म्हणूनच मानली जाईल. या कारणामुळें हें संस्थान महाराष्ट्रांत धरलें आहे. परंतु यासंबंधीं तेथील रहिवाश्यांचें मत घेऊन मग तें महाराष्ट्रांत येतें कीं नाहीं हें ठरवावें लागेल.

कोंकणीसंबंधीं प्रास्ताविक भागांत लिहिलेंच आहे. कोंकणी ही मराठीची एक बोली असल्यामुळें दक्षिण कोंकणांतील कोंकणी भाषिकांची मराठी भाषिकांमध्येंच गणना केली आहे. तसेंच खानदेशांत अहिराणी व भिल्ली–कोंकणी या बोली बोलणारे लोक आहेत. त्याहि मराठीच्याच बोली आहेत. परंतु पुढें जिल्हावार जे लोकसंख्येचे आंकडे दिले आहेत तेथें पश्चिम खानदेशमध्यें मराठी भाषिकांची जी संख्या दाखविली आहे त्यांत अहिराणी व भिल्ली या भाषा बोलणारांची संख्या धरलेली नाहीं. निव्वळ मराठी भाषिकांचीच दिली आहे. परंतु एकंदर लोकसंख्येंतलि मराठी भाषिकांचें शेंकडा प्रमाण काढतांना मराठी भाषिकांबरोबर अहिराणी व भिल्ली भाषिकांची लोकसंख्या धरूनच तें काढलें आहे. धरमपूर, वांसदा, डांग या संस्थानांत भिल्ली–कोंकणी बोलणारांचीच बहुसंख्या आहे. या डोंगरी भागांतील वन्य जातींची ही भाषा आहे. गुजरातशीं हा प्रदेश लागून असल्याकारणानें गुजराती भाषेचेंहि या बोलींत मिश्रण झाल्याचें दिसून येतें. परंतु भिल्ली-कोंकणीची गणना मराठीमध्येंच तिची एक बोली म्हणून भाषाशास्त्रज्ञांनीं केली आहे. हिंदुस्तानच्या भाषाविषयक पाहणीच्या अहवालांत ग्रिअर्सननें अहिराणी, भिल्ली-कोंकणी या बोलींची मराठींतच गणना केली आहे. म्हणून या बोली बोलणाऱ्यांना मराठी भाषिकांमध्येंच धरलें आहे. कदाचित् गुजरातच्या सरहद्दीवरील धरमपूर, वांसदा, डांग या संस्थानांतील ह्या बोली बोलणारांची प्रत्यक्ष इच्छा अगर मत अजमावून त्यांचा प्रदेश संयुक्त महाराष्ट्रांत घेण्याचें ठरवावें लागेल.

संयुक्त महाराष्ट्रांत मराठीसह इतर प्रमुख भाषा बोलणारांची (मातृभाषिकांची) किती लोकसंख्या आहे हें पुढील आंकड्यावरून कळून येईल. १९३१ च्या शिरगणती अहवालाकडून हे आंकडे घेतले आहेत.

(आंकडे हजारांत आहेत.)

| प्रांत | तेलगू | कानडी | गुजराती | राजस्थानी | हिंदी | मराठी |
|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ३९८·३ | ३२०·३ | ५००·० | ३०७·३ | २०७७·२ | १८,०७३·४९ |
| १ मुंबई व उपनगर | १८·९ | १०·३ | २६६·२ | ९·४ | २२३·८ | ७०९·०० |
| २ कोंकण | २·२ | १·६ | ७७·३ | ४·१ | १०२·१ | २८०४·१३ |
| ३ देश | ७७·६ | २३१·७ | ९९·२ | ८५·५ | ५२८·१ | ६६१७·९२ |
| ४ मराठवाडा (मोंगलाई) | १७३·४ | ६९·७ | १९·२ | ३३·९ | ४७९·९ | २९९९·३५ |
| ५ नागपूर व वऱ्हाड | १२६·२ | ७·० | ३८·१ | १७४·४ | ७४३·३ | ४९४३·०९ |

पुढें दिलेल्या तक्त्यांत संयुक्त महाराष्ट्रांतील लोकसंख्येचे जिल्हावार आंकडे दिले आहेत.

| अ. नं. | जिल्ह्याचें नांव | क्षेत्रफळ | १९२१ | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण लोकसंख्या | मराठी |
| १ | मुंबई शहर ... | ३० | ११७५९१४ | ६०४४११ |
| २ | ,, उपनगर ... | १५३ | १५२८४० | १०४४२४ |
| ३ | ठाणे ... | ३५२६ | ७५९९१६ | ६७३४६६ |
| ४ | कुलाबा ... | २२१२ | ५६२९४२ | ५४९५४९ |
| ५ | रत्नागिरी ... | ४०६९ | ११५४२४४ | ११३३०२४ |
| ६ | अहमदनगर ... | ६६४६ | ७३१५५२ | ६५१०२३ |
| ७ | पू. खानदेश ... | ४५९८ | १०३५८३७ | ८३८९०९ |
| ८ | प. ,, ... | ५३२० | ६४१८४७ | १७६६४६ |
| ९ | नाशिक ... | ५९२२ | ८३२५७६ | ७१५४२८ |
| १० | पुणें ... | ५३४७ | १००९०३३ | ९०५९९३ |
| ११ | सातारा ... | ४८९१ | १०२६२५९ | ९७४४०९ |
| १२ | सोलापूर ... | ४५७२ | ७४२०१० | ५८०५५२ |
| | एकूण | ४७२८६ | ९८,६४,९७० | ८०,८६,९६१ |

## नागपूर—वऱ्हाड

| अ. नं. | जिल्ह्याचें नांव | क्षेत्रफळ | १९२१ | |
|---|---|---|---|---|
| | | | एकूण लोकसंख्या | मराठी |
| १ | अमरावती ... | ४७१५ | ८२८३८४ | ६४७४८८ |
| २ | अकोला ... | ४०९३ | ७९८५४४ | ६६२०१६ |
| ३ | बुलढाणा ... | ३७६३ | ६९९४२९ | ५९६४२५ |
| ४ | यवतमाळ ... | ५२३८ | ७४८९५९ | ५११७४८ |
| ५ | वर्धा ... | २४३५ | ४६३६९६ | ३६६७८६ |
| ६ | नागपूर ... | ३८३६ | ७९२५२१ | ६१३७४४ |
| ७ | चांदा ... | ९२०५ | ६६०६३० | ४५७१३५ |
| ८ | भंडारा ... | ३५८० | ७१७७४७ | ५१२२५९ |
| | एकूण... | ३६८६५ | ५७,०९,९१० | ४३,६७,६०१ |
| १ | बस्तर(संस्थान) | १३७०१ | ४६७४०७ | १८२५०४ |

| १९३१ | | १९४१ | | मराठी भाषिकांचे शें. प्रमाण (१९३१) |
|---|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | मराठी | एकूण लोकसंख्या | मराठी (अंदाजें) | |
| ११६१३८३ | ५९३७३८ | १४८९८८३ | ७६०००० | ५१·३ |
| १८३७८३ | ११५४९१ | २५११४७ | १५७१०० | ६४·४ |
| ८३६६२५ | ७२६१३५ | ९३२७३३ | ८०९९०० | ८७·२ |
| ६२८७२१ | ५९८९७७ | ६६८९२२ | ६३५६०० | ९५·८ |
| १३०२५२७ | १२४१३३३ | १३७३४६६ | १३११८०० | ९६·१ |
| ९८८२०६ | ८६९७६४ | ११४२२२९ | १००९२०० | ८८ |
| १२०६०३५ | ९३४९९३ | १३२७७२२ | १०२८७०० | ७७·५ |
| ७७१७९४ | २०८३९१ | ९१२२१४ | २३३४०० | २७मराठी, ३१ मिली २५ अहिराणी |
| १०००७४८ | ८६७४६२ | १११३९०१ | ९६३५०० | ८६·७ |
| ११६९७९८ | १०३५००० | १३५९४०८ | ११०९७०० | ८८·८ |
| ११७९७१२ | ११११००० | १३२७२४९ | १२४४५०० | ९४·५ |
| ८७७५२० | ६८४००० | १०१४६७० | ७८८७०० | ७७·९ |
| ११३०६१५२ | १०,०१,६५० | १२९१३५४४ | १००४५१०० | |

## मराठी जिल्हे

| १९३१ | | १९४१ | | मराठी भाषिकांचें शें. प्रमाण १९३१ |
|---|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | मराठी | एकूण लोकसंख्या | मराठी (अंदाजें) | |
| ९४१६०४ | ७२१५२८ | ९८८५२४ | ७६८६०० | ७६·६ |
| ८७६३६२ | ७०७५४९ | ९०७७४२ | ७३३८०० | ८०·७ |
| ७६६५८४ | ६४७०९८ | ८२०८६२ | ७१०८०० | ८४·४ |
| ८५७२८८ | ५९६१०० | ८८७७३८ | ६२१८०० | ६९·५ |
| ५१६२६६ | ४००१३१ | ५१९३३० | ४०४१०० | ७७·५ |
| ९४०६४९ | ७१२५३३ | १०५९९८९ | ८०५१०० | ७५·८ |
| ७५९६९५ | ५४८०११ | ८७३२८४ | ६३०२०० | ७२·१ |
| ८२४४९६ | ६१०१४० | ९६३२२५ | ७१३९०० | ७४· |
| ६४,८२,३४४ | ४९,४३,०१० | ७०,२०,६९४ | ५३,८८,३०० | ७६·३ |
| ५२४७२१ | १७५४६३ | ६३३८८८ | २१२३०० | ३३·० |

## निजामचे राज्यांतील

| अ. नं. | जिल्ह्यांचें नांव | क्षेत्रफळ | १९२१ एकूण लोकसंख्या | १९२१ मराठी |
|---|---|---|---|---|
| १ | औरंगाबा | ६२१२ | ७१४००८ | ५८७४४० |
| २ | बीड | ४१३२ | ४६७६१६ | ४१५३०७ |
| ३ | नांदेड | ३७७१ | ६७१०११ | ४३४१२९ |
| ४ | परभणी | ५१२५ | ७६५७८७ | ६४२३८६ |
| ५ | उस्मानाबाद | ३५२६ | ६१५२१६ | ५२२०५९ |
| | एकूण... | २२७६६ | ३२,३३,६४६ | २६,०१,३२१ |

## मुंबई प्रांतांतील

| अ. नं. | संस्थानाचें नांव | क्षेत्रफळ | १९३१ लोकसंख्या | १९३१ मराठी |
|---|---|---|---|---|
| १ | वासदा ... | २१२ | ४८,८३९ | २६,७०९ |
| २ | धरमपूर ... | ७१९ | १,१२,०३१ | १,२४५।१,०५,०८७* |
| ३ | जव्हार ... | ३०८ | ५७,२६१ | ५५,९८५ |
| ४ | सुरगाणा ... | १३१ | १५,२४५ | १५,०७३ |
| ५ | डांग ... | ६६७ | ३३,७४८ | ६१३। ३२,३५०* |
| ६ | औंध ... | ४८८ | ७६,५०७ | ६५,४६६ |
| ७ | भोर ... | ९१० | १,४१,५४६ | १,३९,२५२ |
| ८ | जंजिरा ... | ३२६ | ९८,२०६ | ८४,८७४ |
| ९ | जत ... | ९७२ | ९१,०९९ | ४८,४८७ |
| १० | कोल्हापूर ... | ३२१९ | ९,५७,१३७ | ७,६४,२४६ |
| ११ | कुरुंदवाड (थोरली) | २०० | ४४,२०४ | २१,७७५ |
| १२ | ,, (धाकटी) | १२६ | ३९,५८३ | १८,४९६ |
| १३ | मिरज (थोरली) | ३६८ | ९३,९३८ | ५६,३६७ |
| १४ | ,, (धाकटी) | १९४ | ४०,६८४ | २१,३३८ |
| १५ | फलटण ... | ३९१ | ५८,७६१ | ५५,६३२ |
| १६ | सांगली ... | ११४६ | २,५८,४४२ | १,३६,०८४ |
| १७ | सावंतवाडी ... | ९३७ | २,३०,५८९ | २,२५,४८७ |
| | एकूण | ११३१४ | २३९७८२० | १८,७४,५६६ |

* भिल्ली–कोंकणी

## मराठवाडा

| १९३१ | | १९४१ | | मराठी भाषिकांचें शें. प्रमाण |
|---|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | मराठी | एकूण लोकसंख्या (आंकडे हजारांत) | मराठी (अंदाजें) | |
| ९४४७९३ | ७४०६१४ | १०७२ | ८,१४,७०० | ७८·४ |
| ६३३६९० | ५५२६४२ | ७१४ | ६,०७,९०० | ८७·२ |
| ७२२०८१ | ४५०६२१ | ८०२ | ४,९५,७०० | ६२·४ |
| ८५३७६० | ७०८७२० | ९१२ | ७,७९,६०० | ८३·० |
| ६९१०६८ | ५४६७४९ | ७४९ | ६,०१,४०० | ७९·१ |
| ३८,४५,३९२ | २९,९९,३४६ | ४२,४९,२७२ | ३२,९९,३०० | ७८·० |

## मराठी संस्थानें

| १९४१ | | मराठी भाषिकांचें शें. प्रमाण | शेजारच्या प्रमुख भाषिकांचें शेंकडा प्रमाण. |
|---|---|---|---|
| एकूण लोकसंख्या | मराठी (अंदाजें) | | |
| ५४,७३५ | २९,९०० | ५४·७ | ४३.५ गुजराती |
| १,२३,३२६ | १,१६,९०० | ९४·७ | ३·६ गुजराती |
| ६५,१२६ | ६३,८०० | ९८.० | |
| १८,२९२ | १८,१०० | ९८.८ | |
| ४०,४९८ | ३९,६०० | ९८·० | |
| ८८,७२३ | ७५,९०० | ९८·३ | |
| १,५५,९६१ | १,५३,२०० | ८६·४ | |
| १,०३,५५७ | ८९,१०० | ५३·० | |
| १,०७,०३६ | ५७,७०० | ५३·२ | ३९·० कानडी |
| १०,९२,०४६ | ८,७२,००० | ८०·३ | १५·३ ,, |
| ५२,५५२ | २५,९०० | ४९·३ | ४०·१ ,, |
| ४६,६०९ | २१,८०० | ४७·२ | ४०·३ ,, |
| १,०८,५४७ | ६४,९०० | ६०·० | २५·८ ,, |
| ४६,२९५ | २४,३०० | ५२·४ | ३९·८ ,, |
| ७१,४७३ | ६७,९०० | ९४·६ | |
| २,९३,३८१ | १,५३,९०० | ५३·० | ३८·२ ,, |
| २,५२,०५० | २,४५,८०० | ९७·७ | |
| २७२०२०७ | २१२०७०० | | |

शें. ७५ ते १०० मराठीभाषिक लोकसंख्या असलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या मुख्य प्रदेशांच्या लोकसंख्येचे तक्ते मार्गे दिलेच आहेत. सरहद्दीवरील शेंकडा ७५ ते १०० मराठी भाषिकांच्या राहिलेल्या प्रदेशांतील लोकसंख्येचे तक्ते पुढें दिले आहेत. तसेंच त्याखालील प्रमाणाचें, सरहद्दीवरील मराठीभाषिकांचें निरनिराळे गट पाडून त्यांची लोकसंख्या दिली आहे.

| तालुका अगर संस्थान | क्षेत्रफळ (चौ. मै.) | लोकसंख्या | मराठी मातृभाषिकांचें शेंकडा प्रमाण | इतर प्रमुख भाषिकांचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| गोमंतक | १५३४ | ५८०००० | ८९.६ कोंकणी. | |
| चंदगड | १७५ | ४०४५१ | ९४.०, २.०कों. | ३.० कानडी |
| सुपा | ७३४ | १४८१२ | १२.१, ७८.०कों. | ५.० कानडी |
| एकूण | २४४३ | ६३५२६३ | | |
| **शेंकडा ५० ते ७५ मराठी भाषिक** | | | | |
| वांसदा | २१२ | ५४,३७५ | ५४.७ | ४३.५ गुजराती |
| डहाणू | ६४२ | १,९४,०१२ | ६३.३ | १८.३ गुजराती |
| सोलापूर (तालुका) | ४५८ | १,८५,३७८ | ५२.४ | २४.२ कानडी |
| खानापूर | ६३३ | ७९,९४० | ५७.३ | ३२.४ कानडी |
| भैंसदेही | १३४० | १,०४,४३५ | २१.८, ३२.गों | २१.४ हिंदी |
| सौंसर | १११४ | १,७३,१४९ | ४८.०, २८.गों | १३.० हिंदी |
| गोंदिया | ११०५ | ३,६१,६१७ | ५८.५ | ३०.० हिंदी |
| नांदेड ( जिल्हा ) | ३७७१ | ८,०३,००० | ६२.४ | १६.७ तेलगू |
| बस्तर | १३७०१ | ६,३३,८८८ | ३३.०, ३२.० हळबी | ५.० हिंदी, ९.० ओरिया |
| जत | ९७२ | १,०७,०३६ | ५३.२ | ३९.० कानडी |
| मिरज (थो. पाती) | ३६८ | १,०८,५४७ | ६०.० | २५.८ कानडी |
| मिरज(धाकटी पाती) | १९४ | ४६,२९५ | ५२.४ | ३९.८ कानडी |
| सांगली | ११४६ | २,९३,३८१ | ५३.० | ३८.२ कानडी |
| हलियाळ | ३२३ | २८,२०४ | ५३.०, २.५ कोंकणी | २९.२ कानडी |
| कारवार (तालुका) | २८३ | ६८,३७६ | ३.०, ६९.७ कोंकणी | २१.६ कानडी |
| एकूण | २६२६२ | ३२४१६३३ | | |

| तालुका अगर संस्थान | क्षेत्रफळ (चौं. मै.) | लोकसंख्या | मराठी मातृ-भाषिकांचें शेंकडा प्रमाण | इतर प्रमुख भाषिकांचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| शेंकडा ४० ते ५० मराठी भाषिक | | | | |
| बेळगांव ( तालुका) | ४७० | १,५८,२२९ | ४५·७ | ३६·५ कानडी |
| चिकोडी | ४८९ | २,२१,४५१ | ४२·० | ४९·६ कानडी |
| कुरुंदवाड ( थो. ) | २०० | ५२,५५२ | ४९·३ | ४०·१ कानडी |
| कुरुंदवाड ( धा. ) | १२६ | ४६,६०९ | ४७·२ | ४०·३ कानडी |
| बऱ्हाणपूर | ११३८ | १,१०,२९७ | ४३·० | ३३·० हिंदी |
| बिदर | ६२७ | १,१६,५८१ | ४२·१ | ३५·४ कानडी |
| उदगीर | ६८४ | १,१४,३४७ | ३९·४ | ३९·५ तेलगू |
| अहमदपूर | ६८० | १,२५,८०७ | ४०·१ | २५·८ कानडी |
| निलंगा | ६५१ | १,००,२५४ | ४३·५ | २२·८ कानडी |
| मोइनाबाद | २९० | ७३,७९८ | ४५·६ | ४२·२ कानडी |
| नारायणखेड | २२१ | ५४,६७७ | ४५·६ | ३७·३ तेलगू |
| एकूण | ५५७६ | ११,७४,६०२ | | |
| शेंकडा २५ ते ४० मराठी भाषिक | | | | |
| अक्कलकोट | ४७३ | १,०३,९०३ | ३०·० | ५४·० कानडी |
| कुमठा | २२५ | ७१,७४५ | २८·२ कोंकणी | ६६·९ कानडी |
| होनावर | २९१ | ६६,९८० | ३८·९ कोंकणी | ५७·८ कानडी |
| यल्लापूर | ५०२ | १५,२२७ | ३५·८ कोंकणी | ५२·५ कानडी |
| अंकोला | ३५५ | ४२,२१३ | २७·९ कोंकणी | ६८·३ कानडी |
| मुलताई | ९७२ | १,८३,४९६ | ३४·७ | ४६·० हिंदी |
| बालाघाट | ६५४ | १,२८,५३६ | ३३·० | ५५·८ हिंदी |
| वाराशिवणी | ९१६ | ३,०६,६४४ | ३३·० | ५३·० हिंदी |
| गुल्बर्गा | ८०७ | २,२०,९५७ | २५·० | ४१·० कानडी |
| शहाबाद | २५६ | ३२,५५५ | २६·० | ३६·६ कानडी |
| तांडूर | २११ | ३६,१६७ | २८·९ | ३०·८ कानडी |
| बशिराबाद | १२१ | २७,७९१ | ३४·९ | ३३·४ कानडी |
| जनवाडा | ४४० | ६५,६९१ | ३०·२ | ३३·० कानडी |

| तालुका अगर संस्थान | क्षेत्रफळ (चौ. मै.) | लोकसंख्या | मराठी मातृ-भाषिकांचें शेंकडा प्रमाण | इतर प्रमुख भाषिकांचें शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| गोरवाडी | २५० | ३९,१२८ | २५.६ | शेंकडा ३० कानडी व शेंकडा १५ ते २० तेलगू |
| जहिराबाद | २०७ | ३४,०३५ | २७.४ | |
| प्रतापपूर | २२२ | ५२,०१५ | २९.१ | |
| हसनाबाद | १०९ | २३,०५८ | ३७.२ | |
| चिंचोली | १९२ | २६,०३४ | २८.१ | |
| मुरग ( देवणी ) | १०० | २६,६२६ | २५.२ | |
| यल्लाडप | २६३ | २३,४८१ | २७.६ | ५९.८ तेलगू |
| राजुरा | ८२३ | ६२,४६२ | ३४.० | ४२.८ तेलगू |
| एकूण | ८३८९ | १५५८७४४ | | |
| | | **शेंकडा १० ते २५ मराठी भाषिक** | | |
| अथणी | ७४६ | १,६४,१०४ | १७.५ | ७१.४ कानडी |
| जमखंडी | ५२२ | १,२६,२७२ | १३.० | ७५.० कानडी |
| बेतुल | १५९८ | १,५०,४११ | १२.७ | ३६.५ हिंदी |
| बेहार | २८५ | १६,५२८ | ६.०,१९.गों | ६२.८ हिंदी |
| अदिलाबाद (राजुरा व यल्लाडप तहसिलीखेरीज सर्व जिल्हा) | ६२०८ | ७,२५,००० | २०.० | ६०.० तेलगू |
| भालकी | ९२ | १८,५६४ | १४.६ | शेंकडा ५० ते ५५ कानडी |
| चिंचोली | ८२३ | ८३,४५१ | १७.६ | |
| कोडगल | ६२२ | १,३३,३०४ | ११.३ | |
| अंडोला | ७०९ | ८१,१६७ | १४.३ | |
| शोरापूर | ५२७ | १,००,६७७ | ११.१ | |
| कल्याणी | २७२ | ४३,५४७ | १८.५ | |
| चितापूर | ३६० | ६०,९०० | १४.८ | |
| आळंद | ४०२ | ५०,७२३ | ११.० | |
| अफझलपूर | ३७२ | ३८,५२३ | २४.० | |
| एकूण | १३५३८ | १७,९३,१७१ | | |

| प्रांत | लोकसंख्येचें दाटपण (दर चौ. मैलामागें) | हजार पुरुषांशीं स्त्रियांचें प्रमाण | नागर लोकसंख्या | नागर लोकसंख्येची शेकडेवारी |
|---|---|---|---|---|
| * महाराष्ट्र | २०३ | ९४६ | ४३,८२,४६८ | १९·१ |
| (१) मुंबई व उपनगर | ७५३३ | ५७६ | १२७२५८७ | ९५·० |
| (२) कोंकण | २८५ | १०४७ | २२८४१५ | ७·६ |
| (३) देश | १९५ | ९६४ | १४५६७४० | १७·६ |
| (४) मोंगलाई (मराठवाडा) | १६९ | ९५७ | ३८००५५ | ९·९ |
| (५) नागपूर व वऱ्हाड | १७५ | ९६९ | १०४४६७१ | १६·१ |

## * हजारीं शिक्षितांचें प्रमाण

| प्रांत | पुरुष | स्त्रिया | एकूण शिक्षित |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र ... | १५०·८ | २३·३२ | ८९·२ |
| १ मुंबई व उपनगर ... | ३१३·५ | १६८·५ | २६२·३ |
| २ कोंकण ... | १४९·३ | १९·६० | ८२·९ |
| ३ देश ... | १५७·८ | १९·५४ | ९०·४ |
| ४ मोंगलाई (मराठवाडा)... | ७४·० | ९·५८ | ४२·९ |
| ५ नागपूर व वऱ्हाड ... | १४२·० | १४·६० | ७९·७ |

## * महाराष्ट्राबाहेरील मराठी मातृभाषा असणारी लोकसंख्या

| प्रांत | संख्या (हजारीं) | प्रांत | संख्या (हजारीं) |
|---|---|---|---|
| १ मद्रास | २३१ | ९ छात्तिसगड | २८ |
| २ म्हैसूर | १०८ | १० ग्वाल्हेर | २२ |
| ३ मोंगलाई ( तेलंगण व कानडी भाग ) | ४६० | ११ सिंध | १८ |
| ४ मध्य हिंदुस्थानांतील संस्थानें | ५५ | १२ हिंदी मध्यप्रांत | ३०१ |
| ५ गुजरात व काठेवाड | १५ | १३ कूर्ग | ३·९ |
| ६ बडोदें | ३६ | १४ संयुक्त प्रांत | ४·४ |
| ७ धारवाड | ४६ | १५ बंगाल | ३·२ |
| ८ मद्रास संस्थानें | ४८ | एकूण | १४,८० |

* १९३१ च्या खिरगणती अहवालाच्या आधारें.

## महाराष्ट्रांतील कांहीं प्रमुख जाती ( १९३१ ) आंकडे हजारीं

| प्रांत | हिंदु | एकूण प्रमुख जाती | ब्राह्मण | सोनार | शिंपी | कोळी | लिंगायत | मराठा | मराठा कुणबी | माळी | सुतार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | २०३७१.७ | १४५२६.५ | ८२३.२ | २१९.९ | ११४.४ | ३०८.८ | ४०८.१ | ५०७२.९ | १७४७.६ | ७१४.७ | १९०·२ |
| १ मुंबई व उपनगर | ९११.७ | ५७७.९ | ८८.७ | १३.८ | ९.३ | २०·९ | ०.५ | ३१५.२ | २.३ | ४ ३ | ४·२ |
| २ कोंकण | २७७९.९ | १४५०.२ | १२९·९ | २९.४ | ५.८ | ७०·२ | ७.९ | ६६२.९ | २१९.३ | १५.९ | ३५·८ |
| ३ देश | ७५८९.३ | ६०३७.१ | २९०.६ | ७३.४ | ५७·५ | १३८.२ | १८४.४ | २६५३.७ | ३२०.१ | २७६.८ | ६६·४ |
| ४ मोंगलाई ( मराठवाडा ) | ३३१९.४ | २७२९.३ | १४१.५ | ३४.९ | १३.५ | ४०.१ | २१५.३ | ११९०.५ | ५४.९ | ८८.८ | १५·६ |
| ५ नागपूर व वऱ्हाड | ५७७९.२ | ३७३२.० | १७२·६ | ६८·४ | २५.३ | ३९.४ | — | २५०·६ | ११५१.२ | ३२८.९ | ६८.२ |

| प्रांत | साळी | तेली | धनगर | भिल्ल | कोळी महादेव | वंजारी | मांग | चांभार | महार | कोष्टी | माडीग | धेड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महाराष्ट्र | ९९·७ | ४४४·५ | ५२२·२ | ३८८·४ | १०९·८ | २१३·० | २६५·८ | २५०·८ | ११९४·० | ९९·५ | २४७·९ | ३९०·६ |
| १ मुंबई व उपनगर | ४·५ | २·९ | २·० | ०·१ | ०·१ | ०·९ | ५·७ | २५·० | ७७·५ | ... | ... | ... |
| २ कोंकण | २·९ | २५·९ | २२·४ | ०·३ | ७·२ | ०·४ | ०·५ | २७·७ | १८२·३ | ... | ... | ... |
| ३ देश | ५१·३ | ६६·१ | ३१७·२ | ३६७·९ | १०२·५ | १३२·० | १६५·४ | १३५·० | ६३८·६ | ... | ... | ... |
| ४ मोंगलाई (मराठवाडा) | ४१·० | ३२·१ | १८०·६ | १५·० | ... | २७·० | माडीग या | जातींमध्ये समावेश | धेडमध्ये | ... | २४७·९ | ३९०·६ |
| ५ वऱ्हाड व नागपूर | कोष्टीमध्ये | ३१७·५ | ... | ५·१ | ... | ४९·१ | ९४·२ | ६३·१ | ९९८·९ | ९९·५ | ... | ... |

# संयुक्त महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न

संयुक्त महाराष्ट्र हा हिंदी संघराज्यांतील एक स्वतंत्र घटक (प्रांत) म्हणून निर्माण केल्यास संयुक्त महाराष्ट्राच्या सरकारची आर्थिक स्थिति कशी असेल याचाहि येथें विचार करणें जरूर आहे. भाषावार प्रांतरचना करावयाची ठरल्यास जे नवीन भाषावार प्रांत होणार ते आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असणें जरूर आहे. तसेंच त्या प्रांतांच्या सरकारी जमाखर्चाचीहि तोंडमिळवणी होणें अवश्य आहे. या नवीन भाषावार प्रांतांच्या राज्यकारभाराचा आर्थिक बोजा संघराज्य सरकारवर पडतां कामा नये. तसेंच आपल्या प्रांताची सर्वांगीण उन्नति करण्याइतकें त्या प्रांतिक सरकारचें अर्थबल असणेंहि अवश्य आहे. आणि या दृष्टीनें संयुक्त महाराष्ट्र सरकारच्या आर्थिक स्थितीची माहिती येथें दिली आहे. संयुक्त महाराष्ट्राचा प्रदेश आज निरनिराळ्या राजकीय विभागांत वांटला गेला असल्यामुळें भावी संयुक्त महाराष्ट्र सरकारच्या उत्पन्नाची माहिती एकत्र मिळणें कठीण आहे. परंतु ज्या राजकीय विभागांत आज संयुक्त महाराष्ट्र वांटला गेला आहे त्यांतील मराठी भाषिकांच्या जिल्ह्यांचें उत्पन्न वेगळें काढणें शक्य आहे. अशा रीतीनें सर्व मराठी भाषिक प्रदेशाचें आजचें सरकारी उत्पन्न एकत्र केलें असतां भावी संयुक्त महाराष्ट्र सरकारच्या वार्षिक उत्पन्नाचा अंदाज काढतां येईल. या रीतीनें येथें असें उत्पन्न काढण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारी प्रत्येक खात्याचे राज्यकारभारविषयक अहवाल (Administration Reports) दर वर्षी प्रसिद्ध होत असतात. त्यांमधून प्रत्येक खात्याच्या जिल्हावार उत्पन्नाचे आंकडे मिळूं शकतात. युद्धपूर्व तीन वर्षांच्या उत्पन्नाचे आंकडे अशा रीतीनें प्रसिद्ध झालेल्या सरकारी अहवालावरून मिळवितां आले. परंतु युद्धोत्तर उत्पन्नाचे आंकडे जमविणें कठीण झालें. कारण १९४१ सालापासून कागदाच्या टंचाईमुळें सरकारनें प्रत्येक खात्याचे वार्षिक अहवाल प्रसिद्ध करणें बंद केलें. सरकारचें युद्धपूर्व उत्पन्न व युद्धोत्तर उत्पन्न यामध्यें खूपच फरक पडलेला आहे. तेव्हां युद्धपूर्व कालाची उत्पन्नाची माहिती भावी संयुक्त महाराष्ट्र सरकारच्या संभाव्य उत्पन्नाचा अंदाज करण्याचे कामीं फारशी उपयोगी पडणारी नाहीं. तरीपण माहितीसाठीं व तुलनेसाठीं युध्दपूर्व तीन वर्षांच्या उत्पन्नाचे आंकडे जमा केले आहेत. युध्दोत्तर उत्पन्नाचे आंकडे मुंबई व मध्यप्रांताच्या सरकारांच्या परवानगीनें त्यांचे

मध्यवर्ती कचेऱ्यांतून ( Secretariat ) गोळा केले आहेत. इ. स. १९४३ ते इ. स. १९४६ या तीन वर्षांच्या उत्पन्नाचे आंकडे घेऊन त्यावरून संयुक्त महाराष्ट्राच्या संभाव्य सरकारी उत्पन्नाचा अंदाज करण्यांत आला आहे. मुंबई व मध्यप्रांतांतलि मराठी संस्थानांच्या उत्पन्नाचे आंकडे त्या त्या संस्थानाच्या अलीकडील राज्यकारभार–विषयक अहवालावरून घेतले आहेत. कांहीं संस्थानांच्या सरकाराकडून अधिकृतरीत्या हे उत्पन्नाचे आंकडे मिळाले आहेत. निजामचे राज्यांतील मराठवाड्याच्या सरकारी उत्पन्नाचे आंकडे मिळविणे तेथील सध्याच्या अशांततेच्या परिस्थितीमुळें शक्य झालें नाहीं. तेव्हां निजाम सरकारच्या अलीकडील एकंदर वार्षिक उत्पन्नाचा अंदाजें कांहीं हिस्सा मराठवाड्याचें सरकारी उत्पन्न म्हणून हिशेबांत घ्यावा लागला. हा हिस्सा अंदाजें एक तृतीयांश धरलेला आहे. युध्दपूर्व कालांतील निजाम सरकारच्या कांहीं अहवालावरून मराठवाड्याच्या उत्पन्नाचे जेवढे आंकडे मिळूं शकले तेवढे माहितीसाठीं म्हणून पुढें देण्यांत येतील. परंतु आजच्या उत्पन्नाचा अंदाज करण्याचे दृष्टीनें ते उपयोगी पडण्यासारखे नाहींत. गोमंतकाच्या सरकारी उत्पन्नाची माहिती टाईम्स ऑफ इंडियाच्या इअरबुकमधून घेतली आहे.

सविस्तर माहितीसाठीं मुंबई व मध्यप्रांतांतील १९४३ ते १९४६ या तीन वर्षांतलि मराठी जिल्ह्यांच्या सरकारी उत्पन्नाचे ( प्रमुख बाबींच्या उत्पन्नाचे ) जिल्हावार आंकडे या प्रकरणाच्या शेवटीं देण्यांत आले आहेत. युध्दपूर्व १९३६ ते १९३९ या तीन वर्षांतील उत्पन्नाचेहि जेवढे मिळाले तेवढे आंकडे माहितीसाठीं व तुलनेसाठीं म्हणून दिले आहेत. याप्रमाणें ज्या संस्थानांच्या उत्पन्नाची तपशीलवार माहिती मिळाली त्यांचेहि आंकडे तेथें दिले आहेत.

१९४३ ते १९४६ या तीन वर्षांच्या उत्पन्नाच्या आंकड्यांवरून संयुक्त महाराष्ट्र सरकारच्या वार्षिक उत्पन्नाचा अंदाज पुढीलप्रमाणें करतां येईल. तो करतांना मुंबई व मध्यप्रांतांतील मराठी जिल्ह्यांच्या उत्पन्नाचा एकत्र हिशेब करून येणारें उत्पन्न तें प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्राचें वार्षिक उत्पन्न व मुंबई प्रांतांतील मराठी संस्थानें, निजामच्या राज्यांतील मराठवाडा, गोमंतक व बस्तर यांचें उत्पन्न त्यांत मिळवून होणारें एकंदर उत्पन्न तें संपूर्ण संयुक्त महाराष्ट्राचें वार्षिक उत्पन्न अशी सोयीसाठीं उत्पन्नाची फोड केली आहे.

## मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न
### ( मुंबई शहर व उपनगर आणि मराठी दहा जिल्हे )

| उत्पन्नाची बाब | १९४३–४४ | १९४४–४५ | १९४५–४६ |
|---|---|---|---|
| १ जमीन महसूल | २,००,०८९८,१ | २,३५,३५,३८२ | २,१९,५३,९१७ |
| २ अबकारी | २,८२,८६,८९५ | ४,७३,६२,०७८ | ६,८०,९४,१२६ |
| ३ स्टॅम्प्स | १,९५,४९,९३० | २,१४,५९,५३३ | २,०३,८१,०४३ |
| ४ रजिस्ट्रेशन | १७,२९,१६६ | १७,७७,६२० | १६,४०,६४२ |
| ५ जंगल | १,०३,८२,३५० | १,९७,५३,४४० | १,२०,२५,३५१ |
| ६ मोटार कर | ४०,३०,२२३ | ४४,५९,५५१ | ४९,७७,५९६ |
| ७ इतर कर | २,९६,३२,२३९ | ३,७९,५४,५७४ | ३,५५,७१,७४९ |
| ८ पाटबंधारे | २२,४१,४६२ | ५८,३९,०६१ | ६०,२६,७८८ |
| एकूण | ११,५८,६१,३४६ | १६,२१,४१,२४९ | १७,०६,७१,२१२ |

या उत्पन्नाची तीन वर्षांची सरासरी काढली असतां प्रत्येक बाबीचें सरासरी उत्पन्न पुढीलप्रमाणें येईल.

(१) जमीन महसूल २,१८,४२,७६० (२) अबकारी ४,७९,१४,२६६ (३) स्टॅम्प्स २,०४,६३,९०२ (४) रजिस्ट्रेशन १७,१५,८१३ (५) जंगल १,४०,५३,७१४ (६) मोटार कर ४४,८९,१५७ (७) इतर कर ३,४३,८६,१८७ (८) पाटबंधारे ४७,०२,४३७ एकूण १४,९५,५७,९३६

या प्रमुख बाबींच्या उत्पन्नांत प्रांतांत वसूल होणाऱ्या प्राप्तीवरील कराच्या उत्पन्नापैकीं जो हिस्सा मध्यवर्ती सरकारकडून मिळतो तो मिळवणें अवश्य आहे. हा हिस्सा म्हणजे Taxes on income other than Corporation tax ही उत्पन्नाची बाब होय. परंतु सबंध मुंबई प्रांतासाठीं हा हिस्सा मिळतो. तेव्हां त्यांतील मुंबई शहर व मराठी जिल्हे यांच्या वांट्यास येणारा हिस्सा अंदाजानें काढून तो हिशेबांत घ्यावा लागेल. १९४३ ते १९४६ या तीन वर्षांत मध्यवर्ती सरकारकडून सबंध मुंबई प्रांतास हा हिस्सा पुढीलप्रमाणें मिळाला आहे.

| उत्पन्नाची बाब | १९४३–४४ | १९४४–४५ | १९४५–४६ |
|---|---|---|---|
| प्राप्तीवरील कराचा हिस्सा | ३,९०,००,००० | ५,३१,२०,००० | ५,७५,००,००० |

सरासरी—४,९८,७३,३३३

संयुक्त महाराष्ट्राची शेती व पिकें यासंबंधींहि येथें माहिती देणें जरूर आहे. शेती, हवामान व पाऊसपाणी या दृष्टीनें महाराष्ट्राचे तीन विभाग पडतात. एक समुद्रालगतचा कोंकण भाग, दुसरा घाटमाथ्याचा भाग म्हणजे सह्याद्रि पर्वताच्या देशाकडील उतरणीचा भाग व तिसरा देश—देशावरील सपाटीचा भाग. अंदाजें ३० ते ४० मैल रुंदीची सह्याद्रीच्या पश्चिम भागाची कोंकणपट्टी, २५ ते ३० रुंदीचा घाटमाथा व त्या पलीकडील देशाची सपाट जमीन असे हे नैसर्गिक विभाग पडतात. कोंकणांत पावसाचें प्रमाण जास्त असतें, घाटमाथ्यावर मध्यम व नियमित, देशावर कमी व अनियमित असतें. कोंकणांतील पावसाचें सरासरी वार्षिक मान ८० ते १२० इंच असतें. घाटमाथ्यावर हें प्रमाण ३० ते ४० इंच असतें व देशावर १५ ते ३० इंच असतें. कोंकण व घाटमाथा हे दोन भाग शेतीच्या दृष्टीनें दुष्काळ न पाडणारे आहेत. घाटमाथ्यावरील पावसाचें प्रमाण नियमित असल्यामुळें हा भाग पिकांच्या दृष्टीनें चांगला समजला जातो. घाटमाथ्यापेक्षां देशावरील जमीन चांगली असली तरी पावसाच्या अनियमितपणामुळें पिकांची निश्चिति सांगतां येत नाहीं. कोंकण भागांत पाऊस जास्त असल्यामुळें तेथें सहसा दुष्काळाचा प्रश्न नाहीं. झालाच तर अतिवृष्टीमुळें दुष्काळ होण्याचा संभव असतो. कोंकणची बहुतेक जमीन हलकी व पिकाच्या जमिनीचें क्षेत्रहि थोडें असतें. समुद्रालगतचा कांहीं सपाटीचा भाग व नद्यांच्या खोऱ्यांतील दोन्ही बाजूंच्या सपाटीचा भाग एवढेंच खरें पिकाचें क्षेत्र. बाकीचा भाग सबंध डोंगराळ व हलक्या जमिनींचा असून त्यांत वरकस पिकें होतात. घाटमाथ्यावरील जमीन तितकीशी सकस नसली तरी पावसाच्या नियमितपणामुळें सर्व तऱ्हेची जिराईत व बागायत पिकें काढतां येतात. घाटमाथ्यावरील पट्ट्यांत बागायत जमिनीचें क्षेत्रहि जास्त असतें. पाण्याची सहसा टंचाई भासत नाहीं. कोंकणांत पावसाळ्यांत जरी खूप पाणी असलें तरी उन्हाळ्यांत कांहीं भागांत पाण्याची फारच दुर्मिळता होते. देशावरील शेतजमीन बहुतेक काळीं व पिकाच्या दृष्टीनें चांगली; परंतु निसर्गाच्या लहरीवर पिकांचें भवितव्य अवलंबून असतें. पाऊस नियमित पडल्यास या भागांत पीक उत्तम होतें. या भागांत बागायत जमिनींचें प्रमाण थोडें असतें. या भागांत लहानमोठ्या पाटबंधाऱ्यांनीं अगर विहिरींनीं जर शेतीला लागणाऱ्या पाण्याची निश्चितता निर्माण केली गेली तर हा देशाचा भाग घाटमाथ्यापेक्षां कितीतरी सुबत्तेचा होईल. कारण घाटमाथ्यापेक्षां या भागांतील शेतजमिनीचा दर्जा चांगला आहे. देशावरील कांहीं भाग मुरमाड व डोंगराळ जमिनीचा असून पिकांचे दृष्टीनें कमी दर्जाचा आहे.

महाराष्ट्राची बहुतेक जमीन ट्रॅप जातीच्या (काळा पाषाण) खडकापासून—उष्णता पाऊस, हवा यानें धुपून—झालेली आहे. कोंकणातील जमिनींत लोखंडाच्या ( लॅटराईट —जांभा दगड) मातींचें मिश्रण असतें. देशावरील जमिनींपैकीं खानदेश व वऱ्हाडची जमीन काळी असून खोल असते. काळी कापसाची जमीन असें या जमिनीस म्हणतात. हिची खोली सर्वसाधारणपणें ३ ते ४ फूट असते. इतर भागाच्या जमिनीचे उत्तर दक्षिण असे तीन पट्टे पडतात. यांतील पहिला पट्टा सह्याद्री पर्वताच्या अगदीं लगतच्या उंचावरील जमिनीचा पट्टा.हा भाग बहुतेक डोंगराळ असून यांतील जमिनीची खोली अगदीं थोडी असते. या भागांत पाऊस खूप पडतो व तांदूळ व इतर वरकस धान्यें या जमिनींत काढतात. दुसरा पट्टा म्हणजे ज्यास घाटमाथा म्हणतात तो होय. हा भाग कमी डोंगराळ असून येथील पावसाचें मान नियमित व पुरेसें असतें. या पट्टयांतील जमीन विशेष खोल नसते. परंतु पावसाच्या नियमितपणामुळें चांगली पिकें निघतात. तसेंच खरीप आणि रब्बीचीं बागायत पिकेंही या भागांत निघतात. तिसरा पट्टा पूर्वेकडील सपाटीचा. यामध्यें पाऊस निश्चित व अनियमित पडतो. या भागांतील जमीन काळी व खोल असते व त्यांत ओल साठवून ठेवण्याची शक्ति असते. पाऊस चांगला व वेळेवर पडला तर या जमिनींतून उत्तम पीक येतें. नाशिक जिल्ह्यांतील गहूं पिकणारी जमीन, कोपरगांव ( नगर ) कडील गहूं पिकणारी जमीन व अहमदनगर व सोलापूर जिल्ह्यांतील रब्बी जोंधळा पिकणारी जमीन याच सदरांत येते.

या तिन्ही प्रकारच्या जमिनी एकाच ट्रॅप खडकापासून झालेल्या असून हा जो फरक निर्माण होतो तो त्या खडकाचा धुपून धुपून होणाऱ्या मातीचा दर्जा व तिचें एकत्र साठणें ह्यामुळें होतो. घाटाजवळ ही जमीन उथळ असते व तिच्यांत काळेपणा फारसा आलेला नसतो व घाटापासून पूर्वेकडे जसेंजसें जावें तशी जमिनीची खोली वाढत जाते व ती काळीही बनत जाते. खानदेशांतील काळी जमीन—विशेषतः तापीकाठची, बरीच खोल असून ( अंदाजें १५ ते २० फुटांपर्यंत ) तिच्यामध्यें ओलावा साठवून ठेवण्याची शक्ति चांगली असते. आणि या जमिनींत कापूस, गहूं, ज्वारी यांची उत्कृष्ट पिकें येतात. ह्यांत खरीप व रब्बी पिकें चांगलीं येतात. तापीप्रमाणेंच नर्मदा, गोदावरी व कृष्णा यांच्या खोऱ्यामधूनही अशीच खोल काळी जमीन असून पुष्कळ ठिकाणीं ही जमिनीची खोली २० फुटापर्यंत आहे. या जमिनीमध्यें गाळ—रेती बरीच असते. ह्या जमिनींत उत्तम पिकें येतात. सर्वसाधारणपणें खानदेशांतील व वऱ्हाडांतील काळ्या जमिनीची खोली ३ ते ४ फूटापर्यंत असते. मराठवाड्यांतील औरंगाबाद व परभणी जिल्ह्यांतील जमीनही अशीच आहे. अहमदनगर, सोलापूर, नाशिकचा पूर्वभाग, सातारा दक्षिणभाग, पुणें जिल्ह्याचा सोलापूर जिल्ह्यालगतचा भाग यांतील काळ्या जमिनीची खोली दीड ते दोन

फुटापर्यंत असतें. सातारा जिल्ह्याचा पूर्वभाग, पुणें जिल्ह्याचा पूर्वभाग, सोलापूर व अहमदनगर या जिल्ह्यांचा पश्चिमेकडील कांहीं भाग यांमधील जमीन मुरमाड असून उथळ आहे. पिकाचे दृष्टीनें विशेष चांगली नाहीं. काळ्या कापसाच्या जमिनींत कांहीं ठिकाणीं चुनखडी मिसळलेली असते. ज्या काळ्या जमिनीच्या वरच्या थराखालीं चुनखडीचा थर असतो ती जमीन खालील ट्रॅप खडकापर्यंत ओलावा पोंचवूं शकते व त्यामुळें ती धुपण्यास मदत होते. काळी चिकणमातीची (Regur) जमीन बागायतांना उपयोगी नसते. हिच्यामध्यें ओलावा सांठवण्याचें सामर्थ्य पुष्कळ असतें. अशा जमिनीस उष्णतेनें खूप भेगाही पडतात. ही काळी जमीन जेथें फार खोल नाहीं व त्यांत चुनखड वगैरे मिश्रित आहे तेथें ती बागायतालाहि उपयोगी पडते. कारण खालून पाण्याचा निचरा होण्याची सोय असते. कोंकणांतील जमिनी, विशेषतः ठाणें–कुलाबा जिल्ह्यांतील जमिनी या ट्रॅप खडकापासूनच झालेल्या आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांतील व सावंतवाडीकडील जमिनींत लोखंडाची माती (Laterite) मिसळलेली असते. कोंकणातल्या जमिनी खोल नसतात. मातीचा पातळ थर असून ती सछिद्र (porous) असतं. तिची खोली अर्धा ते एक फूट असते. पुष्कळ ठिकाणीं ½ फूट किंवा त्याहूनाहि कमी खोलीची जमीन दिसून येते. विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यांत ती आढळते. तेथें जी कांहीं थोडीफार खोलीची जमीन आहे व जेथें चांगलें भात पिकतें तीं नदीकांठची खोऱ्यांतील व समुद्रालगतच्या सपाटीवरील तेवढीच आहे. ठाणें आणि कुलाबा जिल्ह्यांत चांगल्या भात–शेतीची जमीन आहे. डोंगराळ व उंचावरील वरकस जमिनींतून वरकस पिकें (नाचणी, वरी इत्यादि) निघतात. भाजीपाला, बगीच्या व फळफळावळ वगैरे बागायत पिकांना उपयोगी पडणारी बरीच जमीन कोंकणांत आहे. कोंकणांतील विशेषतः रत्नागिरी जिल्ह्यांतील डोंगराळ जमिनींत उत्तम कलमी आंब्याची खूप लागवड झाली असून कोंकणचें तें एक पैसा देणारें व्यापारी पीक झालें आहे. समुद्रकिनाऱ्यालगतच्या भागांत बागायती फळफळावळाच्या लागवडीची बरीच जमीन आहे.

महाराष्ट्रांतील या जमिनीचें रासायनिक पृथक्करण केलें असतां त्यामध्यें सिलिका, हॉर्नब्लेंड, लोह, कॅलशम् (चुनखड) व सेंद्रिय द्रव्यें आढळून येतात. सेंद्रिय द्रव्यांच्या प्रमाणावर जमिनीची सुपिकता अवलंबून असते. सर्वसाधारणपणें जमिनीचे जे तीन वर्ग केले आहेत त्यांपैकीं काळ्या चिकण जमिनींत ७० टक्के सिल्ट (गाळ रेती) व क्ले (चिकणमाती) असते व ३० टक्के भाग रेवेचा (सँड) असतो. काळ्या जमिनींत ह्या दोहींचें प्रमाण ५०।५० टक्के असतें. हलक्या मुरमाड जमिनींत हें प्रमाण ३० टक्के सिल्ट व क्ले आणि ७० टक्के रेव असें असतें.

खानदेश व वऱ्हाडमधील काळ्या जमिनींचें रासायनिक पृथक्करण केलें असतां त्यांतील द्रव्यांचें पुढीलप्रमाणें शेंकडा प्रमाण आढळतें.

| | काळी जमीन | | काळी कापसाची जमीन | |
|---|---|---|---|---|
| | वरची जमीन | खालची जमीन (sub-soil) | वरची जमीन | खालची जमीन (sub-soil) |
| ओलावा | ७·७५ | ८·१० | ८·७२ | ९·१४ |
| भाजल्यानें नाश | ९·१६ | ९·१८ | ९·२० | १०·०० |
| सिलिका व न विरघळ-णारी सिलिकेट्स् | ६४·०० | ६२·६४ | ६०·१४ | ६०·३४ |

चुनखड, मॅग्नेशिया, पोटॅश, फॉस्फोरिक ॲसिड, कार्बन डायऑक्साईड व नायट्रोजन इ. सर्व मिळून ५ ते ६ टक्के असतात.

देशावरील काळ्या जमिनींत ( Deccan Trap soil ) सिलिका व सिलिकेट्स् ६३·८ असतात व भाजल्यानें नाश १९·२ टक्के होतो. मध्यम जातीच्या काळ्या जमिनींत ५८·४० सिलिका, लोह व अल्युमिनम् १८·४० व चुनखड ४ टक्के असते.

खानदेश जिल्ह्यांतलि जमिनींत नायट्रोजनचें भरपूर, चुनखडीचें चांगलें व फॉस्फेरिक ॲसिड व पोटॅश यांचें मध्यम प्रमाण असतें. दक्षिणेकडील काळ्या जमिनींत नायट्रोजनचें मध्यम, चुनखडीचें चांगलें व फॉस्फेरिक ॲसिड व पोटॅशचें मध्यम प्रमाण असतें. मुरमाड जमिनींत नायट्रोजनचें मध्यम, फॉस्फेरिक ॲसिड व पोटॅशचें चांगलें व चुनखडीचें भरपूर प्रमाण असतें.

धुळें व जळगांवकडील जमिनीचें रासायनिक पृथक्करण पुढीलप्रमाणें—

| | धुळें | जळगांव |
|---|---|---|
| क्ले (चिकणमाती) व बारिक रेती (सिल्ट) | ४५ | ४९ |
| बारिक रेती | ४·५६ | ३·९९ |
| मध्यम रेती | ६·१५ | ६·३४ |
| जाड रेती | १२·८४ | १०·७६ |
| बारीक रेव (सँड) | २६·५२ | २५·६१ |
| जाड रेव | ४·४७ | ६·१५ |

पुणें जिल्ह्यांतलि व सोलापूर भागांतलि काळी जमीन व मुरमाड जमीन यांचें रासायनिक पृथक्करण पुढीलप्रमाणें—

| | काळी | मध्यम काळी | मुरमाड |
|---|---|---|---|
| चिकणमाती व बारीक रेव | ४·८ | १७·९४ | ३·११ |
| बारीक रेती | ६१·२ | ९·९ | ३·०७ |
| मध्यम रेती | १०·७ | ११·१७ | ४·२१ |
| जाड रेती | ८·४ | १३·७५ | ११·३५ |
| बारीक रेव | ८·२ | ४३·८२ | ६०·७७ |
| जाड रेव | ६·७ | ४·२३ | १७·४८ |

नागपूर यांच्याकडील जमीनहि ट्रॅप खडकापासून झालेली आहे. वर्धा–नागपूरकडील काळी चिकण ( Regur ) जमीन प्रसिध्द आहे. वऱ्हाडची जमीन खानदेशप्रमाणेंच असून मराठवाडयाची जमीन खानदेश, नगर, सोलापूरप्रमाणें आहे. वऱ्हाडमध्यें पूर्णा नदीच्या खोऱ्यांत उत्तम काळी कापसाची जमीन आहे. सातपुडयाच्या दक्षिणबाजूच्या उतारावरील नागपूर भागांत उत्तम काळी कापसाची जमीन असून त्यांत कापूस, ज्वारी, गहूं हरभरा, तूर, जवस इ. पिकें होतात. भंडारा जिल्ह्यांत उत्तम भातशेतीची जमीन आहे. चांदा जिल्ह्यांतही भातशेतीची बरींच जमीन आहे. चांदा जिल्ह्यामध्यें तसेंच बस्तर संस्थानांत बरेंच जंगल आहे. या जंगलातून लाखेचें उत्पन्न होतें. वऱ्हाडची जमीन तर कापसाची म्हणून प्रसिद्धच आहे. त्यांत कापूस, ज्वारी, गहूं, हरभरा, बाजरी, तूर, कडधान्यें, भुईमुग, मिरची इ. प्रमुख पिकें होतात. वऱ्हाडमध्यें बागायत जमीन फारच थोडी आहे. वऱ्हाडमध्यें पाण्याची फारच टंचाई असते. मराठवाडयामध्यें लगतच्या मुंबई व मध्यप्रांताच्या मराठी जिल्ह्यांतील जमिनींत निघणारीं बहुतेक सर्व पिकें होतात. उस्मानाबादमध्यें ज्वारी, हरभरा, कापूस, भुईमुग, तूर, गहूं इत्यादि पिकें होतात. बीड जिल्ह्यांतहि अहमदनगरप्रमाणें ज्वारी चांगली पिकते. बाजरी, कापूस, गहूं, हरभरा वगैरे धान्येंहि पिकतात. अहमदनगर व सोलापूरप्रमाणेंच बीड व उस्मानाबाद जिल्हे थोडेफार दुष्काळी आहेत. औरंगाबाद, नांदेड, परभणी या जिल्ह्यांतलि जमीन खानदेशसारखी असून तींत कापूस, ज्वारी, बाजरी, गहूं. भुईमुग, हरभरा, तूर इ. प्रमुख पिकें होतात. गोदावरीचे खोऱ्यांतलि जमीन अत्यंत सुपीक आहे. मराठवाड्यांत पिकणारीं अन्नधान्यें मराठवाड्याच्या गरजेपेक्षा जास्त असल्यामुळें अन्नधान्याचे दृष्टीनें हा भाग समृद्ध आहे. )

कोंकणापैकीं ठाणें जिल्ह्यांत निम्मी जमीन जंगल आहे. यांतील थोडी काळी जमीन भातशेतीची आहे व तांबडी वरकस जमीन आहे. कुलाबा जिल्ह्यामध्यें गाळवट काळी जमीन असून भातशेतीला ती उत्तम आहे. इतर तांबड जमिनीमध्यें भात व कडधान्यें होतात. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील समुद्रकिनाऱ्याच्या भागांतील जमिनी फळबागायतांना उपयुक्त आहे.

पुणें, सातारा, नाशिक या जिल्ह्यांतील २५।३० मैलांचा जो घाटमाथ्याचा पट्टा आहे त्यांतील जमीन, हवापाणी हीं चांगलीं आहेत. या भागांत सहसा दुष्काळ पडत नाहीं. या भागांत बागायतासाठीं विहिरीहि बऱ्याच आहेत. या भागामध्यें ज्वारी, बाजरी, गहूं, तूर, हरभरा, कडधान्यें, भुइमूग, ऊंस, बटाटे, व इतर फळफळावळ इ० पिकें होतात. पुणें, सातारा व नाशिक या जिल्ह्यांतलि सह्याद्रीच्या पायथ्यालगतच्या मावळ भागांत चांगल्या भातशेतीची जमीन आहे. पांढरट काळवट रंगाच्या गाळवट जमिनींत चांगलें भात होतें.

तिसरा देशावरील जमिनीचा जो पट्टा आहे त्यामध्यें अहमदनगर, सोलापूर व सातारा जिल्ह्याचा पूर्वभाग हे दुष्काळी भाग समजले गेले आहेत. सातारा जिल्ह्यांतील पूर्वभागाची जमीन मुरमाड आहे. अहमदनगर व सोलापूर या जिल्ह्यांमधील काळ्या जमिनींत पाऊस वेळेवर चांगला पडला तर उत्तम पीक येतें. त्यामध्यें, रब्बी ज्वारी, बाजरी, गहूं, कापूस, तंबाकू, मिरची भुईमुग, तूर हरभरा इ. पिकें होतात. पाटाच्या पाण्यामुळें या भागांत अलीकडे ऊंसाचीही खूप लागवड झाली आहे.

नाशिकचा पश्चिम भाग व दोन्ही खानदेश यामध्यें गहूं, बाजरी, खरीप ज्वारी, कापूस, तीळ, भुईमूग, ऊंस, केळीं इत्यादि पिकें होतात. ह्या भागांतही सहसा दुष्काळ पडत नाहीं.

सातारा जिल्ह्याचा दक्षिण भाग व कोल्हापूर संस्थानचा पूर्व भाग यांमध्यें चांगली काळी जमीन असून तींत ज्वारी, हरभरा, गहूं, कापूस, तंबाकू, मिरची भुईमुग, ऊंस, इत्यादि पिकें होतात. कोल्हापूरच्या पश्चिम भागांत चांगली भात-शेतीची जमीन आहे. ह्या भागांत सहसा दुष्काळ पडत नाहीं.

प्रत्येक जिल्ह्याचें पाऊसपाणी, हवामान वगैरे दाखविणारे स्वतंत्र तक्ते पाऊसपाणी व हवामान या प्रकरणांत शेवटीं दिले आहेत.

शेतकी खात्याच्या अहवालाप्रमाणें खालीं दिलेल्या वर्षांत संयुक्त महाराष्ट्रांत एकंदर पिकाखालील जमीन पुढीलप्रमाणें होती.

| | एकर | पैकीं बागायत एकर |
|---|---|---|
| मुंबईप्रांत–महाराष्ट्र (१९४४–४५) | १,६७,४८,६९२ | ८,१८,५८९ |
| महाविदर्भ (१९४५–४६) | १,०७,३७,३५९ | ६,१६,२०४ |

त्यापैकीं अन्नधान्याच्या पिकाखालीं मुंबईप्रांत–महाराष्ट्रांत १,३६,०३,७२९ एकर जमीन होती. व महाविदर्भांत ही जमीन ७३,१८,७७३ एकर होती. कापूस, तंबाकू, भुईमूग वगैरे गळिताचीं धान्यें, चारा इत्यादि बिनअन्नाच्या पिकांखालीं मुंबईप्रांत–महाराष्ट्रांत ३७,९४,६८१ एकर जमीन होती व महाविदर्भांत ३८,४०,६०६ एकर होती. या जमिनींत त्यावर्षी मुंबईप्रांत–महाराष्ट्रांत २५,२८,८४८ टन अन्नधान्य पिकलें असा शेतकी खात्याचा अंदाज आहे. महाविदर्भांत त्या वर्षी हें अन्नधान्य अंदाजें १६,१६,५०० टन पिकलें असावें.

हे पिकांच्या क्षेत्राचे व उत्पन्नाचे आंकडे जरी १९४४–४५ व १९४५–४६ या दोन विशिष्ट सालांतील असले तरी त्यावरून नेहमींच्या शेतींच्या क्षेत्राची व त्यांतील उत्पन्नाची कल्पना करतां येते. निरनिराळ्या वर्षांचे अहवाल पाहिले तर त्यामध्यें पिकांच्या एकंदर क्षेत्रांत अर्धा टक्का अगर एक टक्का वाढ अगर घट

झालेली असते. अर्थात् कांहीं विशिष्ट कारणामुळें एकाद्या पिकाच्या क्षेत्रांत खूप वाढ होते तशीच एकाद्याची घट होते. याप्रमाणें अलीकडे दहा पंधरा वर्षांत ऊसाचें क्षेत्र बरेंच वाढलें आहे व कापूस—तंबाकू वगैरे बिनअन्नधान्याच्या पिकांचें क्षेत्र कमी झालें आहे. त्याबरोबरच अलीकडे लागवडीस उपयोगी अशी बरीच पडीक जमीन व जंगलाचा कांहीं भाग यामध्यें पिकांची लागवड होऊं लागल्यामुळें एकंदर पिकाखालील जमिनीचें क्षेत्रहि वाढलें आहे.

मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राच्या व महाविदर्भाच्या शेतीसंबंधीं व उत्पन्नासंबंधीं सविस्तर जिल्हावार व पीकवार माहिती देणारे तक्ते पुढें जोडलेच आहेत. मुंबई प्रांतांतील महाराष्ट्राची ही माहिती १९४४–४५ सालांतील असून ती सरकारी शेतकी खात्याच्या अहवालावरून (season and crop report) घेतली आहे. महाविदर्भाची ही माहिती १९४५–४६ सालची असून तीहि सरकारी शेतकी खात्याच्या अहवालावरून घेतली आहे.

मराठवाडा व इतर संस्थानांसंबंधींची याबाबत मिळालेली माहितीही पुढें दिली आहे. मराठवाड्याची माहिती १९३६ सालांतील आहे. निजाम सरकारनें प्रसिद्ध केलेल्या प्रत्येक जिल्ह्याच्या अहवालावरून ती घेतली आहे. त्या वर्षी मराठवाड्यांत एकंदर पिकाखालीं १,११,७५,१९८ एकर जमीन होती. आजच्या पिकाचा अंदाज करण्यासाठीं ही माहिती खात्रीनें उपयोगी पडण्यासारखी आहे कारण जमिनीच्या पेराऊ क्षेत्रांत व एकंदर पिकांत विशेष असे फरक झालेले नाहींत.

मुंबई प्रांतांतील महाराष्ट्र हा अन्नधान्याचे दृष्टीनें तुटीचा प्रांत आहे. त्यांत उत्पन्न होणारें धान्य त्यास पुरेसें नाहीं परंतु मराठवाड्यासारखा अन्नधान्याचे दृष्टीनें समृद्ध असलेला प्रदेश संयुक्त महाराष्ट्रांत आल्यानंतर तो खात्रीनें तुटीचा रहाणार नाहीं. एवढेंच नव्हे तर महाविदर्भ हा अन्नधान्याचे दृष्टीनें समृद्धीचा (Surplus) प्रांत असल्यामुळें महाविदर्भ व मुंबई—महाराष्ट्र यांचा मिळून जरी प्रारंभिक संयुक्त महाराष्ट्र असा प्रांत तावडतोब बनविला तरी देखील तो तुटीचा होणार नाहीं. आणि मराठवाडा त्यांत आल्यानंतर तर तो तुटीचा प्रांत रहाणारच नाहीं. महाराष्ट्राची जमीन संयुक्त प्रांत, पंजाबसारखी गाळवट व वर्षांतून दोन पिकें देणारी नसली तरी पिकाचे दृष्टीनें ती खात्रीनें निकृष्ट दर्जाची नाहीं. आज महाराष्ट्रांतील शेतकऱ्याला निसर्गावर अवलंबून रहावें लागतें. ठिकठिकाणीं नद्यांना लहान लहान पाटबंधारे बांधून अगर विहिरी खणून पाण्याची सोय केल्यास महाराष्ट्र अन्नधान्याचे दृष्टीनें कितीतरी समृध्द होणें शक्य आहे. कोयना नदीच्या धरणाची योजना आंखलीच आहे. त्याखालीं महाराष्ट्रांतील पुष्कळच जमीन भिजेल. मग सातारा जिल्ह्याचा पूर्वभाग व सोलापूर जिल्हा हे खात्रीनें दुष्काळी भाग राहणार नाहींत. कोंकणांत व घाटांत पावसाळ्यांत खूप पाऊस पडतो—परंतु उन्हाळ्यांत पाण्याची फार टंचाई असते. पाण्याच्या अभावामुळें बागायत शेती पिकवितां येत नाहीं. या डोंगर भागांतील ठिकठिकाणच्या खोलगट भागांत लहान लहान बंधारे बांधून पावसा-

ल्यात पाणी अडवून ठेविलें तर त्याचा पुढें पिकांना उपयोग होईल. तें पाणी त्या डोंगर भागांतून जमिनीपर्यंत आणतां जरी आलें नाहीं तरी त्या पाण्यामुळें आजुबाजूच्या प्रदेशांत विहिरी खणल्यास त्यांस पाण्याचे चांगले पाझर येतील. विहिरींचें पाणी त्यामुळें सतत राहील व बागायत पिकें काढतां येतील. तसेंच ठिकठिकाणीं असलेल्या लहान लहान नद्या, ओढे यांना लहान लहान धरणें बांधूनहि त्यांचा उपयोग शेतीकडे करतां येईल. निरनिराळीं रासायनिक खतें वापरून पिकांचें उत्पादन वाढविणें शक्य आहे.

कोरडवाहू जमिनींत पाऊस कमी असला तरी कशीं पिकें काढतां येतील याचे सरकारनें प्रयोग चालविले आहेत आणि ते बरेच यशस्वीही होत आले आहेत. जमिनींना बांध घालून त्यांत पाणी साठू देणें व ती ओल पुढें टिकवून त्याचा पिकांस चांगला उपयोग होतो. अशा रीतीनें निरनिराळे शास्त्रीय प्रयोग करून चांगलीं पिकें काढणें शक्य आहे. ऊंसाचे बाबतींत तर महाराष्ट्राचा क्रम बिहार संयुक्त प्रांताच्या खालोखाल येईल. आजहि या दोन प्रांतांपेक्षां महाराष्ट्रांतलि ऊंसाचे क्षेत्र कमी असलें तरी ऊंसाच्या क्षेत्राच्या तुलनेनें त्यांत निर्माण होणाऱ्या ऊंसाचें व साखरेचें प्रमाण महाराष्ट्रांत जास्त आहे. महाराष्ट्र स्वतःची गरज भागवून इतर प्रांतांना आजही साखर पुरवीत आहे. ऊंसाच्या शेतींत नवीन शास्त्रीय शोध व साधनें उपयोगांत आणून त्याचें उत्पादन आणखी किती तरी वाढणें शक्य आहे. कापसाच्या बाबतींतहि निरनिराळे शास्त्रीय प्रयोग करून कापसाचा धागा ( लांबी ) सुधारणें व त्याचें एकंदर उत्पादनहि वाढविणें शक्य आहे. नवीन लांब धाग्याच्या कापसाची (जयवंत, जरीला वगैरे) अलीकडे महाराष्ट्रांत बरीच लागवड होऊं लागली आहे. फळबागायताचें उत्पन्नहि आजच्यापेक्षां किती तरी वाढवितां येईल. निरनिराळ्या मालकांचे जमिनीचे लहान लहान तुकडे एकत्र करून त्या मोठ्या क्षेत्राची यांत्रिक सहाय्यानें मेहनत मशागत केल्यास पिकांचें उत्पादन आजच्यापेक्षां किती-तरी वाढेल. तसेंच आज शेतीला जोडून करतां येण्यासारखे दुय्यम धंदे शेतकऱ्यास उपलब्ध नाहींत. ते त्यास मिळाल्यास त्याची आर्थिक स्थिति सुधारून त्याचा परिणाम शेती सुधारण्याकडेहि होईल. वऱ्हाड खानदेशचा भाग व दक्षिणेंतील कृष्णाकांठचा भाग दूधदुभत्याचे दृष्टीनें चांगला आहे. दुभत्या जनावरांची जात सुधारून व दुधाळ जनावरांची निपज वाढवून या भागांतील दुधाचें उत्पादन सध्यापेक्षां किती तरी पटीनें वाढविणें शक्य आहे. तसेंच ठिकठिकाणीं पाटबंधारे झाल्यास ओल्या चाऱ्याची मुबलकता निर्माण होईल, महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं दूधदुभतें मुबलक होईल. सह्याद्रीच्या घाटांत धरणें बांधून त्यांचें पाणी शेतीसाठीं सबंध महाराष्ट्रांत खेळविणें शक्य आहे व त्यावर निर्माण होणारी वीजहि महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतून खेळवितां येईल. त्याचे सहाय्यानें लहान लहान उद्योगधंदे खेड्यापाड्यांतून चालू करून महाराष्ट्राचें नंदनवन करतां येणार नाहीं काय!

## संयुक्त महाराष्ट्रांतील जमिनीचें जिल्हावार क्षेत्र

( आंकडे एकरांचे ) [ मुंबई–महाराष्ट्र १९४४–४५ चे म. महाविदर्भ १९४५–४६ चे ]

| नं. | जिल्हे | जिल्ह्यांतील जमिनींचें एकूण क्षेत्र | लागवडीखालील जमिनींचें एकूण क्षेत्र | लागवडीखालीं नसलेल्या जमिनींचें एकूण क्षेत्र | पैकीं जंगल |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदेश | २४,८०,८५० | १७,४६,९०४ | १७,३३,९४६ | १,४०,१७२ |
| २ | पू. खानदेश | २९,०८,७०७ | २०,७३,३२७ | ८,३५,३८० | ४,०९,९४१ |
| ३ | नाशिक | ३७,७१,५२९ | २५,४३,०६४ | १२,२८,४६५ | ७,८५,७१६ |
| ४ | अहमदनगर | ४२,४१,९९९ | ३२,७१,७४० | ९,७०,२५९ | ४,७१,२०२ |
| ५ | पुणें | ३४,२७,६७४ | २५,८०,८९८ | ८,४६,७७६ | ३,७४,३४६ |
| ६ | सोलापूर | २९,२४,१४५ | २५,७५,७५१ | ३,४८,३९४ | ६६,२५२ |
| ७ | सातारा | ३१,३४,५४३ | २३,४०,९३० | ७,९३,६१३ | ४,४१,७०७ |
| | एकूण–देश | २,३८,८९,४४७ | १,७१.२२,६१४ | ६७,५६,८३३ | २६,८९,५२३ |
| १ | ठाणें | २१,९४,३९९ | १०,१४,२८२ | ११,८०,११७ | ८,३०,६९६ |
| २ | मुंबई उपनगर | ९१,११४ | ४७,४९१ | ४३,६२३ | २,५४५ |
| ३ | कुलाबा | १३,८५,६६२ | ८,०१,३८२ | ५,८४,२८० | ३,३०,२०६ |
| ४ | रत्नागिरी | २५,६४,३६१ | १८,१८,८४५ | ७,४५,५१६ | १२,१७५ |
| | एकूण-कोंकण | ६२,३५,५३६ | ३६,८२,००० | २५,५३,५३६ | ११,७५,६१६ |
| | एकूण-मुंबई प्रांत महाराष्ट्र | ३,०१,२४,९८३ | २,०८,१४,६१४ | ९३,१०,३६९ | ४८,६५,१३९ |
| १ | वर्धा | १५,५३,६८१ | १०,२०,५४४ | ५,३३,१३७ | ९२,७५३ |
| २ | नागपूर | २४,४२,८४९ | १३,३०,६८० | ११,१२,१६९ | ३,००,२६० |
| ३ | चांदा | ५९,७९,४७५ | ११,७०,१५१ | ४८,०९,३२४ | १३,९२,००६ |
| ४ | भंडारा | २२,८३,३८३ | ९,१६,००२ | १३,६७,३८१ | ६,७६,६३५ |
| | एकूण म. म. प्रांत | २२ ५९,३८८ | ४४,३७,३७७ | ७८,२२,०११ | २४,६१,६५४ |
| १ | अकोला | २६,२१,४२३ | २२,०३,१०४ | ४,१८,३१९ | २,०६,७१९ |
| २ | उमरावती | ३०,०९,८६० | १८,५४,२०८ | ११,५५,६५२ | ८,९६,०९५ |
| ३ | लढाणा | २४,१३,९८९ | १९,५२,७९१ | ४,६१,१९८ | २,७८,१०३ |
| ४ | यवतमाळ | ३३,४०,७२९ | २३,३३,७७८ | १०,०६,९५१ | ७,५३,७१४ |
| | एकूण वऱ्हाड | १,१३,८६,००१ | ८३,४३,८८१ | ३०,४२,१२० | २१,३४,६३१ |
| | एकूण महाविदर्भ | २,३६,४५,३८९ | १,२७,८१,२५८ | १,०८,६४,१३१ | ४५,९६,२८५ |

| | | तांदूळ | | गहूं | |
|---|---|---|---|---|---|
| नं. | जिल्हे | एकूण एकर | पैकीं बागायत | एकूण एकर | पैकीं बागायत |
| १ | प. खानदेश | ५३५८० | २७३४ | १७६६१६ | २०५८२ |
| २ | पू. खानदेश | ५२६४ | २४६३ | १००५४५ | २०९०१ |
| ३ | नाशिक | ६६९३४ | ३९७४ | २३५५६३ | २९१७८ |
| ४ | अहमदनगर | १८८४९ | २४८६ | १४८०८२ | २६७२४ |
| ५ | पुणें | ६४३३६ | ५७५० | ४७८०७ | १८४३७ |
| ६ | सोलापूर | १३६१३ | ५२५५ | ३५७३८ | २०८४० |
| ७ | सातारा | ६५००२ | २१३५३ | ४२२०८ | २२५३४ |
| | एकूण–देश | २,९०,५७८ | ४४,०६५ | ७८७०५९ | १,५९,१९६ |
| १ | ठाणें | ३४०६४९ | ... | ९१ | ... |
| २ | मुंबई उपनगर | १०४६९ | ... | .... | ... |
| ३ | कुलाबा | २७१९१० | ६७ | ५ | ५ |
| ४ | रत्नागिरी | २१७०१७ | ४५०३ | ... | ... |
| | एकूण–कोंकण | ८,४०,०४५ | ४८,६३५ | ९६ | ५ |
| | एकूण–मुंबई प्रांत महाराष्ट्र | ११,३०,६२३ | ९२,७०० | ७,८७,१५५ | १,५९,२०१ |
| १ | वर्धा | ९७०० | ... | ९३४९७ | ४७२ |
| २ | नागपूर | ४५२९६ | २२२७५ | १४५६७८ | ३,४४९ |
| ३ | चांदा | ३६९३३९ | २०११५१ | ७७२८९ | ७८ |
| ४ | भंडारा | ५६६५९९ | २७४६५३ | ७४५७६ | १२३ |
| | एकूण-म. म. प्रांत | ९,९०,९३४ | ४,९८,८७९ | ३,९१,०४० | ४१२२ |
| १ | अकोला | १६४७५ | १ | १२५८८९ | ८० |
| २ | उमरावती | १२७८९ | ... | ९६४७४ | २०१ |
| ३ | बुलढाणा | ५३१६ | ... | १०७२२३ | ३९५२ |
| ४ | यवतमाळ | २८५९६ | ११७ | ५७४०२ | ७१ |
| | एकूण–वऱ्हाड | ६३,१७६ | ११८ | ३,८६,९८८ | ४,३०४ |
| | एकूण–महाविदर्भ | १०,५४,११० | ४,९८,९९७ | ७,७८,०२८ | ८,४२६ |

| बार्ली सातू | | ज्वारी | | | |
|---|---|---|---|---|---|
| एकूण एकर | पैकी बागायत | एकूण एकर | खरीप | रब्बी | बागायत |
| ... | ... | ३५५९६१ | १६५४३० | १९०५३१ | २९ |
| ... | ... | ४६८७३८ | ४३६८७९ | ३१८६९ | ५५ |
| ... | ... | १११५४८ | २२८४८ | ८८७०० | ... |
| १०४ | २४ | ११७७०८६ | ... | ११७७०८६ | ६४७५४ |
| ८१९ | २३४ | ७३७६९२ | १७१६ | ७३५९७६ | ७४१७९ |
| ८४२ | ३१२ | १४४०९२२ | ... | १४४०९२२ | ११०१३३ |
| १८२९ | ८१६ | ५१७१४१ | २७३६३३ | २७३५०८ | ३३८९२ |
| ३,६०४ | १,३८६ | ४८,२९,०८८ | ९,००,५०६ | ३९,३८,५८२ | २८३०४२ |
| ... | ... | ६३५ | ... | ६३५ | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ६३५ | ... | ६३५ | ... |
| ३,६०४ | १,३८६ | ४८,२९,७२३ | ९,००,५०६ | ३९,२९,२१७ | २,८३,०४२ |
| गहूं व हरभरा | | | | | ज्वारी व तूर |
| ३०९ | | ३३१३८२ | ३२८४२६ | २९५६ | ६११७९ |
| ३५६ | | ३७७२३७ | २४५०८० | १३२१५७ | २६२३६९ |
| ४४३ | | ३२५२०२ | ३४०११ | २९११९१ | १३९३९ |
| ७७० | | ८५९८६ | १९५८ | ८४०२८ | १४२३५ |
| १८७८ | | १११९८०७ | ६०९४७५ | ५१०३३२ | ३५१७२ |
| ... | | ६२६५०२ | ६२६५०२ | | |
| ... | | ५५७४५८ | ५५७४५८ | | |
| ... | | ५४६४०७ | ५३९५०४ | ६९०३ | |
| ... | | ६४१२२३ | ६४१२२३ | | |
| ... | | २३७१५९० | २३६४६८७ | ६९०३ | |
| १८७८ | | ३४,९१,३९७ | २९,७४,१६२ | ५,१७,२३५ | ३,५१,७२ |

[ मुंबई–महाराष्ट्र १९४४–४५ चें

| नं. | जिल्हे | बाजरी एकुण एकर | बाजरी पैकीं बागायत | रागी (नाचणी) एकुण एकर | कोद्रू एकुण एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदश | ३१०८२६ | ९ | १९२९६ | १४५४९ |
| २ | पू. खानदेश | ३२४७३३ | ... | १६ | ... |
| ३ | नाशिक | ७४९८०८ | ... | ७६३८२ | ३१५ |
| ४ | अहमदनगर | ८९८०५० | १२१०१ | १९५५० | ... |
| ५ | पुणें | ५९२६२८ | २५८५९ | २६८६७ | ५३ |
| ६ | सोलापूर | २७८५४८ | १३५१५ | ... | १६ |
| ७ | सातारा | ४०१७३६ | ९२५७ | ३८६९८ | ६४१ |
| | एकुण–देश | ३५,५६,३२९ | ६१,०४१ | १,८०,८०९ | १५,५७७ |
| १ | ठाणें | ... | ... | ४१३७२ | २८७७ |
| २ | मुंबई उपनगर | ... | ... | ... | ... |
| ३ | कुलाबा | ... | ... | ३६१२१ | २४४० |
| ४ | रत्नागिरी | ... | ... | १३१७४७ | ५९५५१ |
| | एकुण–कोंकण | ... | ... | २०९२४० | ६४८६८ |
| | एकुण–मुंबई प्रांत महाराष्ट्र | ३५,३६,२२९ | ६१,०४१ | ३,९०,०४९ | ८०,४४५ |
| | | | | कोंदन व कुटकी | मसूर |
| १ | वर्धा | १६९ | | ३ | २८२ |
| २ | नागपूर | ५८९ | | ६२३ | १६३१ |
| ३ | चांदा | ११ | | ४९९४ | ४६० |
| ४ | भंडारा | १ | | ७१८७ | ७४७ |
| | एकुण–म. म. प्रांत | ७७० | | १२८०७ | ३१२० |
| १ | अकोला | १९८९२ | | १६३९ | ५०७३ |
| २ | उमरावती | १७०९७ | | ९६८१ | २६७० |
| ३ | बुलढाणा | २८९२४ | | १७ | १४२७ |
| ४ | यवतमाळ | २२४१७ | | २३५ | १९६ |
| | एकुण–वऱ्हाड | ८८,३३० | | ११,५७२ | ९३६६ |
| | एकुण–महाविदर्भ | ८९,१०० | | २४,३७९ | १२,४८६ |

[ महाविदर्भ १९४५–४६ चें ]

| मका एकूण एकर | मका बागायत | इ. हलकी धान्यें एकूण एकर | तूर एकूण एकर | हरभरा एकूण एकर | इतर कडधान्यें एकूण एकर |
|---|---|---|---|---|---|
| ४८८० | १८६ | ४१७२० | १६१४० | ५९८७४ | २०४७८२ |
| २१४७ | ८० | २७४६ | २३०३१ | २०५९९ | ४९५५३३ |
| २०२३ | ३८४ | ४०५३४ | १५१३९ | ६९०५३ | २१४५०४ |
| १७७१ | १२७२ | ४२५२१ | ३३४२८ | ६९२०३ | २४६७७६ |
| १३८९ | १३३५ | १६८५३ | २००६६ | ५४३४२ | ११९८७३ |
| १२१५४ | ११४०४ | ५९४५ | ५२७६३ | ३८२१४ | ९९०४६ |
| ८२५३ | २९७० | ४२३५१ | ३४६७२ | ६६६२२ | १७०४०६ |
| ३२,५७७ | १७,६३१ | १,९२,६७० | १,९५,२८९ | ३,७७,९०७ | १५,४६,९२० |
| ३० | ..... | १५३०२ | ५८१५ | २००१ | १६५७१ |
| ... | ..... | ..... | ... | ... | ... |
| ... | ... | १६०६३ | २५११ | ९३४ | २०१४९ |
| ... | ... | ४०५६६ | ११८० | ४३ | ४१४०९ |
| ३० | ... | ७१,९६१ | ९,५०६ | २,९७८ | ७८,१२५ |
| ३२,६०० | १७,६३१ | २,६४,६३१ | २,०४,७९५ | ३,८०,८८५ | १६,२५,०४५ |
| | मटकी उडीद मूग | लाख (तिवडा) | | | वाटाणा |
| | १००६७ | ३६८० | ६५४ | १२७४६ | १०१५ |
| | ८९७६ | ३८९२५ | ५०५४८ | २२४८१ | २४९५ |
| | २५००४ | ७३४२० | ४४६७ | २५६७६ | २९०४ |
| | ७५६१० | १२००२५ | ७७२३ | २२३११ | ११६६ |
| | ११९६५७ | २३६०५० | ६३३९२ | ८३२१४ | ७५८० |
| | ८६९१३ | १००४७ | ६९२०४ | ३६५२२ | ११०९ |
| | ५३३१८ | ३३४७ | ७९३२६ | २०४५८ | ३६२ |
| | ८३२८९ | २५१६ | ५१७४९ | ३१२६६ | १२१८ |
| | ८८०३५ | ३२२१ | ९४८१० | २५२०० | १०८३ |
| | ३,११,६३५ | १९,१३१ | २,९५,०८९ | १,१३,४४६ | ४,५७२ |
| | ४,३१,२९२ | २,५५,१८१ | ३,५८,४८१ | १,९६,६६० | १२,१५२ |

[ मुंबई-महाराष्ट्र १९४४-४५ चें

| नं. | जिल्हे | कंस — एकूण एकर | कंस — बागायत | कंस — इतर | मिरची, धने इ. एकूण एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | . खानदेश | २२४८ | २२४८ | ४१ | १०७६३ |
| २ | पू. खानदेश | ७४५ | ७४५ | १२ | १२८३४ |
| ३ | नाशिक | १४५८१ | १४५८० | ... | ४८३८ |
| ४ | अहमदनगर | ४१०९० | ४१०३६ | ... | ५४५० |
| ५ | पुणें | १५९३३ | १५९२४ | ... | ७३०९ |
| ६ | सोलापूर | ९१५२ | ९१५२ | ... | ७८१८ |
| ७ | सातारा | ८१७२ | ८१७२ | ६ | २६४३० |
| | एकूण-देश | ९१,९२१ | ९१,८५७ | ५९ | ७५,४५२ |
| १ | १ ठाणें | १६८ | १६८ | ... | १८५५ |
| २ | मुंबई-उपनगर | ... | ... | ... | १२ |
| ३ | कुलाबा | ५८ | ५८ | ८ | ६५० |
| ४ | रत्नागिरी | ४७४ | ४७२ | ... | १४७१ |
| | एकूण-कोंकण | ७०० | ६९८ | ८ | ३,९८८ |
| | एकूण-मुंबई प्रां. महाराष्ट्र | ९२,६२१ | ९२,५५५ | ६७ | ७९,४४० |
| १ | वर्धा | १५६ | १५६ | ... | ५२३९ |
| २ | नागपूर | ३२४ | ३२२ | २ | १६७९७ |
| ३ | चांदा | ३२७९ | ३२७९ | ... | १२२६७ |
| ४ | भंडारा | ३६९५ | ३६९५ | ... | ८१८८ |
| | एकूण-म.म.प्रांत | ७४५४ | ७४५२ | २ | ४२४९१ |
| १ | अकोला | ४४४ | ४४४ | ... | ६९९३ |
| २ | उमरावती | २७५ | २७५ | ... | ११४९० |
| ३ | बुलढाणा | १०९३ | १०९३ | ... | ७३११ |
| ४ | यवतमाळ | ४८४ | ४८४ | ... | ७६७७ |
| | एकूण वऱ्हाड | २२९६ | २२९६ | ... | ३३४७१ |
| | एकूण-महाविदर्भ | ९,७५० | ९,७४८ | २ | ७५,९६२ |

व महाविदर्भ १९४५–४६ चें ]

| फळें व भाजीपाला इत्यादि एकूण एकर | इतर अन्नपिकें एकूण एकर | भुईमूग एकूण एकर | तीळ एकर | एरंडी एकर | जवस एकर |
|---|---|---|---|---|---|
| ५६१२ | ६ | २०००२४ | १७७३ | ८३२६ | १०६९७ |
| १८८९३ | १९८ | ३४७२६१ | ६११८ | ११० | ७५० |
| १९६५६ | ३२० | १४२९५९ | ४७४८ | ४३९ | ४११६ |
| १७०९७ | ... | ४३६२० | ११६९३ | २०७ | ५३८३ |
| ३१०५९ | १८ | २४९९९ | १७८४ | ७ | ४८१ |
| ४७८१ | १३९ | ९०९०० | ७१७० | ७४४ | ३२४६ |
| १३८८८ | ६४८ | १७४७४२ | ३३६ | ९५ | १२८६ |
| १,१०,९८६ | १,३२९ | १०,२४,५०५ | ३३,७०२ | १०,००८ | २६,०३९ |
| ६९५७ | ... | १८ | १०२१ | १८२ | ... |
| २३२२ | ... | ... | ... | ... | ... |
| ३०५४ | ... | ... | २४५२ | २३ | ... |
| ११०९१ | ... | १२५ | २४२ | ... | ... |
| २३,४२४ | ... | १४३ | ३७१५ | २०५ | ... |
| १,३४,४१० | १,३२९ | १०,२४,६४८ | ३७,४१७ | १०,२१३ | २६,०३९ |
| | | | तीळ | रामतीळ जमी | |
| ५३४३ | २४६ | ... | ७६४६ | ... | २९६९४ |
| २९७१५ | ६१ | | १५९२८ | २१४ | ६१५९२ |
| २५१७ | ३३१ | ... | ३५३८६ | २ | ७६८५६ |
| ४४११ | ४१६ | | १००२ | ८ | ८०६६३ |
| ४१९८६ | १०५४ | ... | ५९९६२ | २२४ | २४८०५ |
| ४१४३ | १०२ | | ६७४९ | २८४० | ६८१४ |
| ७६७९ | २४५ | ... | ९७५३ | ३२६ | ८९१७ |
| ४७१४ | ... | | ५८५१ | ३६१६९ | ५५८९ |
| ३८४८ | २९७ | ... | २५९७२ | ९४८ | १७७६२ |
| २०३८४ | ६४४ | | ४८३२५ | ४०२८३ | ३९०८२ |
| ६२,३७० | १६९८ | | १,०८,२८७ | ४०,५०७ | २,८७,८८७ |

| नं. | जिल्हे | मोहरी एकर | नारळ एकर | इतर गळिताचीं धान्यें एकर | कापूस एकूण एकर |
|---|---|---|---|---|---|
| | | | ... | | |
| १ | प. खानदेश | ७३१ | ... | ७५२७ | १२८३७६ |
| २ | पू. खानदेश | १७५ | ... | १०२३ | १५४७१८ |
| ३ | नाशिक | १४७१ | ... | ४५५१५ | २४४७८ |
| ४ | अहमदनगर | १३९ | ... | १३१५५३ | १२१०५ |
| ५ | पुणें | ४५ | ... | ९०२१५ | ३८ |
| ६ | सोलापूर | ... | ... | ८८२४३ | ६०७ |
| ७ | सातारा | ... | ७ | २५३०६ | २१९१ |
| | एकूण—देश | २,५६१ | ७ | ३,८९,३८२ | ३,२२,५१३ |
| १ | ठाणें | १ | ३२१ | ४४७९ | ... |
| २ | मुंबई—उपनगर | ... | ५९० | ... | ... |
| ३ | कुलाबा | ... | १६१४ | ९९६ | ... |
| ४ | रत्नागिरी | ... | १०४२३ | १३२५२ | ... |
| | एकूण—कोंकण | १ | १२,९४८ | १८,७२७ | ... |
| | एकूण-मुंबई प्रांत महाराष्ट्र | २,५६२ | १२,९५५ | ४,०८,१०९ | ३,२२,५१३ |
| १ | वर्धा | | | १३४०६ | ३१४०४१ |
| २ | नागपूर | | | ११२६४ | १४१३१८ |
| ३ | चांदा | | | ४६०९ | ४२८९२ |
| ४ | भंडारा | | | ३२९६ | ६ |
| | एकूण-म.म. प्रांत | | | ३२५७५ | ४९८२५७ |
| १ | अंकोला | | | १५२१९२ | ६२००२१ |
| २ | उमरावती | | | ७५३८५ | ६०७८६० |
| ३ | बुलढाणा | | | १४२२८२ | ४८४४६५ |
| ४ | यवतमाळ | | | ९०१३५ | ५८५६३५ |
| | एकूण—वऱ्हाड | | | ४५९९९४ | २२९७९८१ |
| | एकूण—महाविदर्भ | | | ४,९२,५६९ | २७,९६,२३८ |

[... महाविदर्भ १९४५–४६ चें ]

| ... घाण्याचीं पिकें एकर | तंबाखू एकर | इतर औषधी द्रव्यें व अमली पदार्थ–एकर | चाऱ्याच्या जमिनींचें क्षेत्र एकर | कॅनॉलखालीं भिजणारी जमीन–एकर | विहिरींवर भिजणारी जमीन–एकर |
|---|---|---|---|---|---|
| ४४४५ | १०२ | ६०० | २०१६७ | १४३१४ | २४४९२ |
| २२९८ | ५७९ | २९४ | ५३०४ | २८३४ | ३८७०२ |
| २७९५ | ३६ | ६१० | ४२६६८४ | ३१८८३ | ३३९६० |
| ४८०७ | ११८७ | ५६६ | ८४२२७ | ७६८०८ | ९९२१६ |
| ८३५ | ३१५ | ४७० | ३९१०३३ | ९३४३३ | ७७८१७ |
| ६७१४ | २८३ | ३०० | १२८२२८ | ७५५६४ | १०५६९९ |
| ३०२३ | १४१५४ | ८६५ | ४७५०५४ | ४९५२४ | ६०३२८ |
| २४९१७ | १७४५६ | ३७३५ | १५३०६९७ | ३,५०,२६० | ४,४०,२१४ |
| १७६७ | ... | ... | ११८८५७ | ... | ६८२१ |
| ... | ... | ६०४ | १४३९८ | ... | ५३४ |
| ११७ | ... | ४५५ | ३९४२१ | ... | ८५१ |
| ३५२३ | ... | २९५९ | १०५६९० | ४९५८ | ४७२६ |
| ५४८७ | ... | ४०१८ | ३५८३६६ | ४९५८ | १२९३२ |
| ३०,४०४ | १७,४५६ | ७,७५३ | १८,८९,०६३ | ३,५५,३१८ | ४,५३,१४६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | अंबाडी | तंबाखूसह | |
| ... | ४२३० | १४८ | २२५०८ |
| ... | ४५५९ | ८६७ | २६४२० |
| १७ | ९७१ | ३८८ | ५६४५ |
| ४८८ | १३६० | ५९ | ८८३८ |
| ५०५ | १११२० | १४६२ | ६३४११ |
| ५६२४ | २८९० | ३०२ | ६२ |
| ४६९९ | ४२२४ | २१८० | १८७ |
| ४८०८ | ५२३२ | २१९२ | ७१ |
| ६१५३ | ६०२२ | ४४८ | १९ |
| २१२८४ | १८३६८ | ५१२२ | ३३९ |
| २१,७८९ | २९,४८८ | ६,५८४ | ६३,७५० |

मुंबई प्रांतातील महाराष्ट्रांत बागायताखालीं जें ८,१९,५८९ एकर क्षेत्र आहे त्यापैकीं विहिरी व पाटाखालीं भिजणाऱ्या जमिनींचें क्षेत्र वर दिलें आहे. उरलेलें क्षेत्र तळीं व अन्य प्रकारानें भिजतें.

निजामचे राज्यांतील मराठवाड्यांत बागायताखालीं असलेल्या एकंदर २,२६,११५ एकर क्षेत्रापैकीं कॅनॉलखालीं १००१ एकर, विहिरीखालीं २,०७,९७७ एकर, तळीं व अन्य रीतीनें मिळून १५,७०३ एकर, याप्रमाणें जमीन भिजतें.

[ मुंबई महाराष्ट्र १९४४–४५ चें

आकडे एकराचें

| अनु. क्रं. | जिल्हे | तांदूळ, गहूं, वगैरे प्रमुख धान्याचें एकूण क्षेत्र | जोंधळा बाजरी व इतर वरकस धान्याचें एकूण क्षेत्र | तूर, हरभरा व इतर कडधान्याचें एकूण क्षेत्र | किरकोळ इ. धान्यें व कडधान्याचें एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदेश | २३०११६ | ७४७१९२ | २८०७९६ | १६३१ |
| २ | पू. खानदेश | १०८६०९ | ७९८३८० | ५३९२१३ | ४३७७ |
| ३ | नाशिक | ३०२४९७ | ९८०६१० | २९८६९६ | १६५०९ |
| ४ | अहमदनगर | १६७०३५ | २१३८९८१ | ३४९४०७ | १४२०८ |
| ५ | पुणें | ११२९६२ | १३७५४८२ | १९०२८१ | २१०६३ |
| ६ | सोलापूर | ५०११३ | १७३७५८५ | १९००२३ | ८९४४ |
| ७ | सातारा | १०९७४९ | १०३८८२० | २७१७०० | १२९४६ |
| | एकूण–देश | १०,८१,२४१ | ८८,१७,०५० | २१,२०,११६ | ७९,६७८ |
| १ | ठाणें | ३४०७४० | ६०२१६ | २४३८७ | ... |
| २ | मुंबई उपनगर | १०४६९ | ... | ... | ... |
| ३ | कुलाबा | २७१९१५ | ५४६२४ | २३५९४ | ... |
| ४ | रत्नागिरी | २१७०१७ | २३१८६४ | ४२६२८ | १९२० |
| | एकूण-कोंकण | ८,४०,१४१ | ३,४६,७०४ | ९०,५०९ | १,९२० |
| | एकूण–मुंबई प्रांत महाराष्ट्र | १९,२१,३८२ | ९१,६३,७५४ | २२,१०,६२५ | ८१,५९८ |
| १ | वर्धा | १०३५०६ | ३९२७३१ | २८४४४ | १७५७ |
| २ | नागपूर | १९१३३० | ६४०८१८ | १२५०५६ | ६९०९ |
| ३ | चांदा | ४४७०७१ | ३४४१४६ | १३१९३१ | ३०८६१ |
| ४ | भंडारा | ६४१९४५ | १०७४०९ | २२७५८२ | २६२९६ |
| | एकूण म. म. प्रांत | १३,८३,८५२ | १४,८५,१०४ | ५,१३,०१३ | ६५,८२३ |
| १ | अकोला | १४२३६४ | ६४८०३३ | २०९७४८ | ३७५४ |
| २ | उमरावती | १०९२६३ | ५८४२३६ | १५९४८१ | ६८६४ |
| ३ | बुल्ढाणा | ११२५३९ | ५७५३४८ | १७१४६५ | २८१०१ |
| ४ | यवतमाळ | ८५९९८ | ६६३८७५ | २१२५४५ | ७१९७ |
| | एकूण-वऱ्हाड | ४,५०,१६४ | २४,७१,४९२ | ७,५३,२३९ | ४५,९१६ |
| | एकूण महाविदर्भ | १८,३४,०१६ | ३९,५६,५९६ | १२,६६,२५२ | १,११,७३९ |

व महाविदर्भ १९४५-४६ चें ]

आंकडे एकरांचे

| *एकूण अन्नाच्या पिकांचें क्षेत्र | गळिताच्या धान्याचें एकूण क्षेत्र | कापूस वगैरे धाग्याच्या पिकांचें एकूण क्षेत्र | तंबाकू व इतर औषधी पिकांचें एकूण क्षेत्र | चाऱ्याच्या पिकांचें एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १२७६८५४ | २२९०७८ | १३२८२१ | ७०२ | २०१६७ |
| १४७८८८४ | ३५५५९७ | १५७०१६ | ८७३ | ५३०४ |
| १६२११९८ | १९०३२८ | २७२७३ | ६७६ | ४२६६८४ |
| २७११०७० | १९२५९५ | १६९१२ | २५५३ | ८४२२७ |
| १७३३०४४ | ११७५३१ | ८७३ | ७८५ | ३९१०३३ |
| १९९९६९१ | १९०३०३ | ७३२१ | ५८३ | १२८२२८ |
| १४६९४१३ | २०१७७२ | ५२१४ | १५०१९ | ४७५०५४ |
| १,२२,९८,१५४ | १४,८६,२०४ | ३,४७,४३० | २११९१ | १५३०६९७ |
| ४३४३२३ | ६०२२ | १७६७ | ६०४ | १९८८५७ |
| १२८०३ | ५९० | ... | ... | १४३९८ |
| ३५३९०३ | ५०८७ | १९७ | ४५५ | ३१४२१ |
| ५०४५४६ | २४०४२ | ३५२३ | २९५९ | १०५६९० |
| १३०५५७५ | ३५,७४१ | ५४८७ | ४०१८ | ३५८३६६ |
| | | | | |
| १,३६,०३,७२९ | १५,२१,९४५ | ३,५२,९१७ | २५२०९ | १८,८९,०६३ |
| | | | | |
| ५३७८२२ | ४३८४६ | ३१८२७१ | १४८ | २२५०८ |
| १०१०९८० | ८८९९८ | १४५८७७ | ८६७ | २६४२० |
| ९७२४०३ | ११६८५३ | ४३८८० | ३८८ | ५६४५ |
| १०१९९४२ | ८४९६९ | १८५४ | ५९ | ८८३८ |
| ३५४११६७ | ३,३४,६६६ | ५०९८८२ | १४६२ | ६३४११ |
| | | | | |
| १०१५५८१ | १६८५९५ | ६२८५३५ | ३०२ | ६२ |
| ८७९५३३ | ९४३८१ | ६१६७८३ | २१८० | १८७ |
| ९००५७१ | १८९८९१ | ४९४५०५ | २१९२ | ७१ |
| ९८१९२१ | १३४८१७ | ५९७८१० | ४४८ | १९ |
| ३७७७६०६ | ५,८७,६८४ | २३३७६३३ | ५१२२ | ३३९ |
| | | | | |
| ७३,१८,७७३ | ९,२२,३५० | २८,४७,५१५ | ६,५८४ | ६३,७५० |

*यांत ऊंस, मिरची, फळ बागायत इ.चें क्षेत्र अंतर्भूतआहे.

# संयुक्त महाराष्ट्रांतील निरनिराळ्या

[ मुंबई महाराष्ट्र १९४४–४५ चें

आंकडे–एकरांचे

| अं. क्र. | जिल्हे | इतर किरकोळ बिन अन्नपिकांचें क्षेत्र | एकूण बिन अन्नपिकांचें क्षेत्र | एकूण पिकांचें क्षेत्र | दुबार पिकणाऱ्या जमिनीचें एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदेश | १५ | ३८२७८३ | १६५९६३७ | ६१५९३ |
| २ | पू. खानदेश | ११३८ | ५२००३४ | १९९८९१८ | ४८०८२ |
| ३ | नाशिक | ... | ६५३९६१ | २२७५१५९ | ७५३२४ |
| ४ | अहमदनगर | ५२ | २९६३३९ | ३०१५४०९ | ७९७८४ |
| ५ | पुणें | ३१२७ | ५१३३४९ | २२४६३९३ | १५८५८३ |
| ६ | सोलापूर | ६२ | ३२६४९७ | २३२६१८८ | ४४०४७ |
| ७ | सातारा | ६२४ | ६९७६८३ | २१६७०९६ | १२२७५८ |
| | एकूण देश | ५०१८ | ३३,९०,६४६ | १,५६,८८,८०० | ५,९०,१५१ |
| १ | ठाणें | ३४८ | २०७५९८ | ६४१९२१ | ६२९३ |
| २ | मुंबई-उपनगर | ६३ | १५०५१ | २७८५४ | १४७ |
| ३ | कुलाबा | १२ | ४५१७२ | ३९९०७५ | २०६९२ |
| ४ | रत्नागिरी | ... | १३६२१४ | ६४०७६० | ३२४३५ |
| | एकूण-कोंकण | ४२४ | ४०४०३५ | १७०९६१० | ५९५६७ |
| | एकूण–मुंबई प्रांत महाराष्ट्र | ५,४४१ | ३७,९४,६८१ | १,७३,९८,४१० | ६,४९,७१८ |
| १ | वर्धा | ३१ | ३८४८०४ | ९५२१०२ | ९०५३ |
| २ | नागपूर | ८७ | २६२२४९ | १२५०८११ | १७५८६ |
| ३ | चांदा | ३३ | १६६७९९ | ११३८९०८ | ८८४४३ |
| ४ | भंडारा | १२ | ९५७३२ | ११९२२३७६ | २६४१९४ |
| | एकूण-म. म. प्रांत | १६३ | ९०९५८४ | ४४६४१९७ | ३७९२७६ |
| १ | अकोला | ६८ | ७९७५६२ | १८१३१४३ | १२५२४ |
| २ | उमरावती | १६५ | ७१३६९६ | १५९३५९३ | ६६८३ |
| ३ | बुल्ढाणा | १० | ६८६६६९ | १५८७२४१ | २०९५४ |
| ४ | यवतमाळ | १ | ७३३०९५ | १७१५३८६ | १६७५४ |
| | एकूण-वऱ्हाड | २४४ | २९३१०२२ | ६७०९३६३ | ५६९१५ |
| | एकूण महाविदर्भ | ४०७ | ३८,४०,६०६ | १,११,७३,५६० | ४,३६,१९१ |

व महाविदर्भ १९४५-४६ चें ]

आंकडे-एकरांचे

| एकूण बागायत क्षेत्र | एकूण सर्व पिकांच्या जमिनींचें क्षेत्र | चालू पड जमिनींचें क्षेत्र | चालू पडखेरीज अन्य पड जमिनींचें क्षेत्र |
|---|---|---|---|
| ३९१७८ | १५९८०४४ | १४८८६[illegible] | ९७६३१ |
| ४२८२७ | १९५०८३६ | १२२४९१ | ४६१८८ |
| ७२६३७ | २१९९८३५ | ३४३२२९ | ४२६०० |
| १७६०२४ | २९३५२२५ | ३३६११५ | २७७७४ |
| १७६४०९ | २०८७८३० | ४९३०६८ | १४००२ |
| १८१३९८ | २२८२१४१ | २९३६१० | १०५९५ |
| १११५७४ | २०४४३३८ | २९६५९२ | २५२७४ |
| ७,९८,९७७ | १,५०,९८,६४९ | २०,३३,९६५ | २,६४,०६४ |
| ७०९५ | ६३५६२८ | ३७८६५४ | ५७९०४ |
| ५३४ | २७७०७ | १९७८४ | १५५१३ |
| १७०१ | ३७८३८३ | ४२२९९९ | २१२१८ |
| ११२८२ | ६०८३२५ | १२१०५२० | ९३०२ |
| २०,६१२ | १६,४०,०४३ | २०,३१,९५७ | १,०३,९३७ |
| | | | |
| ८,१९,५८९ | १,६७,३८,६९२ | ४०,६५,९२२ | ३,६८,००१ |
| | | | |
| ९११२ | ९४३०४९ | ७७४९५ | १५६९६१ |
| ५७६१२ | १२३३२२५ | ९७४५५ | २९०९६६ |
| २१०३५९ | १०५०४६५ | ११९६८६ | २६२०७३ |
| २८६११० | ८५८१८२ | ५७८३० | १२९८९८ |
| ५,६३,१९३ | ४०,८४,९२१ | ३,५२,४६६ | ८,३९,८९८ |
| | | | |
| ६१४६ | १८००६१९ | ३८२४४८ | २७४११ |
| १०८३८ | १५८६९१० | २५१५७४ | ४०५४९ |
| १४३८४ | १५६६२८७ | ३४६१९९ | ४६८७६ |
| ५५२८ | १६९८६३२ | ५८८६०० | ४९९३८ |
| ३६,८९६ | ६६,५२,४४८ | १५,६८,८२१ | १,६४,७७४ |
| | | | |
| ६,००,०८९ | १,०७,३७,३६९ | १९,२१,२८७ | १०,०४,६७२ |

| नं. | जिल्हे | तांदूळ | गहूं | सातू | ज्वारी (खरीप) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदेश | ११४८७ | ३७६६४ | ... | ३९८८० |
| २ | पू. खानदेश | २६५६ | २२१४५ | ... | १३६१७ |
| ३ | नाशिक | २४३६४ | ३४०८७ | ... | ३५३६ |
| ४ | अहमदनगर | ७३८९ | २९५२० | ३० | ... |
| ५ | पुणें | २३६४७ | ७४८० | २०४ | ७६६ |
| ६ | सोलापूर | ३४३८ | ८२४९ | २४४ | ... |
| ७ | सातारा | २२५५६ | १०८७३ | ३८० | ५१८९९ |
| | एकूण—देश | १,०३,५३७ | १,५०,०१८ | ८५८ | १,८९,६९८ |
| १ | ठाणें | १५२०७६ | १५ | ... | ... |
| २ | मुंबई—उपनगर | ५६०८ | ... | ... | ... |
| ३ | कुलाबा | १३९०८८ | १ | ... | ... |
| ४ | रत्नागिरी | ७२८६४ | ... | ... | ... |
| | एकूण—कोंकण | ३,६९,६३६ | १६ | ... | ... |
| | एकूण-मुं.प्रां.महाराष्ट्र | ४,७३,१७३ | १,५०,०३४ | ८५८ | १,८९,६९८ |

| नं. | जिल्हे | इतर हलकीं धान्यें | तूर | हरभरा | इतर कडधान्यें |
|---|---|---|---|---|---|
| १ | पू. खानदेश | १११९१ | ५७६४ | ११३९३ | ४२१०३ |
| २ | प. खानदेश | ६६२ | ७४१९ | ३६६८ | ६९२५३ |
| ३ | नाशिक | ८८६७ | ३७८५ | १०८६४ | २९०१५ |
| ४ | अहमदनगर | १०३९७ | ९५५१ | ११७४९ | ३६९६० |
| ५ | पुणें | ४११३ | ५२०४ | ९३८८ | १५६४१ |
| ६ | सोलापूर | १३०२ | ११३७५ | ५१५५ | १५४७७ |
| ७ | सातारा | १०४३३ | ९९०६ | ९७१६ | २६२४४ |
| | एकूण—देश | ४६,९६५ | ५३,००४ | ६१,९३३ | २,३४,६९३ |
| १ | ठाणें | ५९७६ | ७२० | २९८ | २१७० |
| २ | मुंबई—उपनगर | ... | ... | ... | ... |
| ३ | कुलाबा | ६८१२ | ३८३ | ११९ | ३२८५ |
| ४ | रत्नागिरी | १४९४१ | २०८ | ५ | ४६९८ |
| | एकूण—कोंकण | २७७२९ | १३११ | ४२२ | १०१५३ |
| | एकूण-मुं.प्रां.महाराष्ट्र | ७४,६९४ | ६६,०१५ | ६२,३५५ | २,४४,८४६ |

## अन्नधान्यांचें जिल्हावार उत्पन्न

मुंबई–महाराष्ट्र १९४४–४५ चें ]

आंकडे–टनांचे

| ज्वारी (रब्बी) | बाजरी | रागी (नाचणी) | मका | कोद्रू |
|---|---|---|---|---|
| ३६६८२ | ४६२५५ | ६४६१ | १३०२ | ४८७१ |
| ५४४७ | २७५४४ | ३ | ५०५ | ... |
| १३७२७ | ७०२९५ | ३५८०२ | ५१४ | ७४ |
| १३४००५ | ९१६२९ | ६५४६ | ६९५ | १ |
| १०१४६६ | ५२८०० | ६२९७ | २०५ | १४ |
| १७०४६३ | १४१०८ | ... | ३२३३ | ४ |
| ३७५३० | ४३२९१ | १०३६४ | २००८ | १७१ |
| ४,९९,३२० | ३,४५,९२२ | ६५,४७३ | ८,४६२ | ५,१३५ |
| ९६ | ... | ११८५८ | ४ | ५४८ |
| ... | ... | ... | ... | ... |
| ... | ... | ११८२५ | ... | ६५४ |
| ... | ... | ३२३४९ | ... | १४८४३ |
| ९६ | ... | ५६,०३२ | ४ | १६०४५ |
| ४,९९,४१६ | ३,४५,९२२ | १,२१,५०५ | ८,४६६ | २१,१८० |

| बटाटे | एकूण प्रमुख अन्नधान्यें | एकूण जोंधळा बाजरी वगैरे वरकस धान्यें | एकूण तूर हरभरा व कडधान्य | एकूण अन्नधान्यें |
|---|---|---|---|---|
| ... | ५७१५१ | १४६६४२ | ५९२६० | २६३०५३ |
| ... | २४८०१ | १२७७७८ | ८०३४० | २३२९१९ |
| ४७८७ | २८४५१ | १३२८१५ | ४३६६४ | २३४९३० |
| २३६६ | २६९३९ | २४३२७३ | ५८२६० | ३३८४७२ |
| २१५९८ | ३१३३१ | १६५६६१ | ३०२३३ | २२७२२५ |
| ३ | ११९३१ | १८९११० | ३२९०७ | २३३०४८ |
| ५०३७ | ३३८०९ | १५५६९६ | ४५,८६६ | २३५३७१ |
| २३,२२१ | २,५४,४१३ | ११,६०,९७५ | ३,४९,६३० | १७,६५,०१८ |
| ९ | १५२०९१ | १८४८२ | ३१८८ | १७३७६१ |
| ... | ५६०८ | ... | ... | ५६०८ |
| ... | १३८०८९ | १९२९१ | ३७८७ | १६२१६७ |
| ... | ७२८६४ | ६२१३३ | ४९११ | १३९९०८ |
| ९ | ३६८६५२ | ९९९०६ | १०८८६ | ४८१४४४ |
| २३,२३० | ६,२३,०६५ | १२,६०,८८१ | ३,६०,५१६ | २२,४६,४६२ |

१९४३–४४ या सालांत मुंबई–महाराष्ट्रांतील देश व कोंकण यामध्यें निरनिराळ्या अन्न-धान्याचें किती टन उत्पन्न झालें व त्या पिकांखालीं किती एकर जमीन होती हें माहिती-साठीं खालीं दिलें आहे. १९४३-.४४ व १९४४–४५ या दोन वर्षांतिल महाराष्ट्रांतिल अन्नपिकांखालील क्षेत्र व त्यांचें उत्पन्न यांच्या माहितविरून महाराष्ट्राच्या शेतीची व अन्न-धान्य परिस्थितीची एकंदर कल्पना येईल.

| अ. नं. | नांव | देश | | कोंकण | |
|---|---|---|---|---|---|
| | | एकर | टन | एकर | टन |
| १ | तांदूळ | २९१९९२ | १०८०१९ | ८३५३३९ | ४०९५६४ |
| २ | गहूं | ६४६९८६ | १३७२२० | १०१ | २३ |
| ३ | सातू | ४३४७ | १०४० | ... | |
| ४ | ज्वारी (खरीप) | ९५१९४२ | २३६३३४ | १६ | २ |
| ५ | ज्वारी (रब्बी) | ३६१०१४७ | ४९२७७७ | ६११ | १०२ |
| ६ | बाजरी | ३८२५०७८ | ४४५६२९ | ... | ... |
| ७ | रागी (नाचणी) | १८२१४४ | ६७०७२ | २३१४९६ | ७०३७१ |
| ८ | मका | ३१७८४ | ७६९८ | ५ | १ |
| ९ | कोद्रू | १६५०७ | ४९३१ | ६०८०९ | १८१४६ |
| १० | इ. हलकीं धान्यें | १६७७०१ | ४५१६५ | ७०६९५ | २९८८९ |
| ११ | तूर | २२९०३२ | ६७६७३ | ९३९२ | १३९९ |
| १२ | हरभरा | २९८८९५ | ५४४५८ | २६५९ | ४२६ |
| १३ | इ. कडधान्यें | १३३४५९७ | २१८६५५ | ८०६९८ | १२२५४ |
| १४ | बटाटे | १०००१ | १६६४३ | ३७ | २६ |
| १ | एकूण प्रमुख अन्नधान्यें | ९४३३२५ | २४६२७९ | ८३५४४० | ४०९५८७ |
| २ | एकूण जोंधळा बाजरी वगैरे वरकस धान्यें | ८७८५३०३ | १२९९६०६ | ३६३६३२ | ११८५११ |
| ३ | एकूण तूर, हरभरा व कडधान्यें | १८६२५२४ | ३४०७८६ | ९२७४१ | १४०७९ |
| ४ | एकूण अन्नधान्यें | १,१५,९१,१५२ | १८,८६,६७१ | १२,९१,८२१ | ५,४२,०७७ |

संयुक्त महाराष्ट्रांतील प्रमुख पिकांच्या दर एकरीं सरासरी उत्पन्नाच प्रमाण ( पौंडामध्यें) पुढें दिलें आहे. हे आंकडे त्या त्या पिकांच्या उत्पन्नाचे त्या त्या जिल्ह्यातलि स्टँडर्ड (प्रमाण) म्हणून समजले जातात व या स्टँडर्डप्रमाणें वार्षिक पिकांची आणेवारी ठरविण्यांत येते.

| नं. | जिल्हे | भात | गहूं | | ज्वारी | | बाजरी | नाचणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बागायत | जिरायत | बागायत | जिरायत | | |
| १ | प. खानदेश | १०८० | १२८० | ६०० | ... | ७२० | ५०० | ९०० |
| २ | पू. खानदेश | १०८० | १२८० | ६०० | ... | ७२० | ३८० | ९९० |
| ३ | नाशिक | १०८० | १३२० | ४६० | १४०० | ५२० | ३६० | ८५० |
| ४ | अहमदनगर | १०४० | ११८० | ५०० | १५०० | ४०० | ३४० | ९०० |
| ५ | पुणें | ११२० | १०८० | ३५० | १५०० | ५०० | ३४० | ९०० |
| ६ | सोलापूर | ९०० | १०८० | ४०० | १५०० | ५८० | ३२० | |
| ७ | सातारा | ११२० | १३५० | ४८० | १५०० | ७२० | ३६० | ९०० |

कोंकणांत ठाणें कुलाबा जिल्ह्यांत भाताचें एकरीं प्रमाण १२०० पौंड व रत्नागिरींत १०२० पौंड आहे. नाचणीचें एकरीं प्रमाण ठाणें ७७० पौंड, कुलाबा ८०० पौंड व रत्नागिरी ६८० पौंड आहे. इतर धान्यापैकीं बागायत हरभऱ्याचें प्रमाण नगरखेरीज सर्व जिल्ह्यांत एकरीं १२०० पौंड आहे. नगर जिल्ह्यांत एकरीं ११०० पौंड आहे. जिरा-यत हरभऱ्याचें एकरीं प्रमाण दोन्ही खानदेशांत ५०० पौंड असून ठाणें ४०० पौंड, कुलाबा, अहमदनगर व सातारा ३८० पौंड, सोलापूर ३६० पौंड, नाशिक ३५० पौंड व रत्नागिरी ३२० पौंड याप्रमाणें आहे. ऊंसाचे उत्पन्न कुलाबा व रत्नागिरी जिल्ह्यामध्यें एकरीं ४ हजार पौंड, पुणें जिल्ह्यांत एकरीं ८ हजार पौंड व इतर सर्व जिल्ह्यांत एकरीं ७ हजार पौंड आहे. जवस सर्व जिल्ह्यांत एकरीं ३६० पौंड, तीळ ४०० पौंड, बागायत भुईमूग २५०० पौंड, जिरायत भुईमूग ठाणें, कुलाबा १२५० पौंड व इतर जिल्हे १००० पौंड, कापूस (वठलेला) दोन्ही खानदेश ११० पौंड, नाशिक १०० पौंड व इतर सर्व जिल्हे ९० पौंड, असें प्रमाण आहे.

महाविदर्भात भाताचें एकरीं प्रमाण वऱ्हाडचे जिल्हे व वर्धा यामध्यें ४३५ पौंड व नागपूर, चांदा, भंडारा यामध्यें बागायत ९९० पौंड व जिरायत ६५० पौंड; बागायत गहूं १००० पौंड व जिरायत गहूं ५०० पौंड , जिरायत ज्वारी वऱ्हाडांत व वर्धा जिल्ह्यांत एकरीं ७०० पौंड व नागपूर ६०० पौंड, भंडारा ४५० व चांदा ६५० पौंड, असें प्रमाण आहे. कापसाचें (वठलेला) प्रमाण अकोला—उमरावती १०७ पौंड, वर्धा, नागपूर, यवतमाळ, बुल्ढाणा १०० पौंड, चांदा ९० पौंड व भंडारा ५० पौंड आहे. हरभऱ्याचें प्रमाण वऱ्हाडच्या जिल्ह्यांत व चांदा जिल्ह्यांत एकरीं ५५० पौंड, भंडारा ४६० पौंड, वर्धा—नागपूर ५८० पौंड याप्रमाणें आहे. जवस वऱ्हाडमध्यें एकरीं ३३० पौंड, वर्धा ३०७ पौंड, नागपूर २८०, चांदा २५० व भंडारा २०० पौंड; तीळ चांदा २०० पौंड, बाकी सर्व जिल्ह्यांत एकरीं ३०० पौंड, ऊंस चांदा ४५०० पौंड, बाकी सर्व जिल्ह्यांत एकरीं ३००० पौंड याप्रमाणें आहे.

[ १९३६ चे अहवालावरून

| नं. | जिल्हे | जिल्ह्याचें एकूण क्षेत्र एकर | लागवडीखालीं नसलेलें क्षेत्र एकर | जंगल एकर | लागवडीयोग्य पड एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | २२४९५२१ | २६००० | ... | ७०५१० |
| २ | नांदेड | २३३३८२० | २६९०८८ | १६६४१७ | १५८१५ |
| ३ | परभणी | ३००७८६८ | २३९००० | १४०६६५ | ३६००० |
| ४ | बीड | २२९८६७२ | १५९३०० | ११५०७० | २६०४ |
| ५ | औरंगाबाद | ३४२३०१८ | २६०४०० | २९२८८४ | २२१३ |
| | एकूण | १,३३,१२,८९९ | ९,४७,७८८ | ७,१५,०३६ | १,२७,०४२ |

| नं. | जिल्हे | तांदूळ एकर | गहूं एकर | बार्ली एकर | ज्वारी एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | २५२९० | १३७३४४ | ६०२ | ९६१८०४ |
| २ | नांदेड | २४१४५ | १८५८१६ | २८३१ | ५१२५२८ |
| ३ | परभणी | २०७६२ | २२३६९९ | १९८९ | ७३२२८५ |
| ४ | बीड | १३६३२ | १३८८६२ | ८९७६ | ४७२०२६ |
| ५ | औरंगाबाद | २२८६ | ३१९०५३ | २७८१ | ८१९१४५ |
| | एकूण | ८६,११५ | १०,०४,७७४ | १७,१७९ | ३४,९७,७८८ |

| नं. | जिल्हे | मिरची, घने इ. एकर | ऊंस एकर | फळें-भाजीपाला एकर | इतर अन्न-पिकें एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | २४६५० | ७८१७ | ४१७०७ | ३८३५२ |
| २ | नांदेड | ३५२५६ | ९४६ | २४८०६ | ३९६९० |
| ३ | परभणी | ५१३४० | १४४३ | २९३२२ | १९४३२ |
| ४ | बीड | २२३१० | ४९७२ | ३५७४५ | १७३४४ |
| ५ | औरंगाबाद | २५१२२ | २६७० | २८२११ | २०८४८ |
| | एकूण | १,५८,६७८ | १७,८४८ | १,५९,७९१ | १,३५,६६६ |

| नं. | जिल्हे | इतर गळिताचीं धान्यें एकर | एकूण गळिताचीं धान्यें | कापूस एकर | अंबाडी एकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | १०३११७ | ३६०७५० | ११७९९९ | १९४९ |
| २ | नांदेड | ३६०११ | १०७९२६ | ४६७६१४ | ५८४४ |
| ३ | परभणी | ३६३०८ | ११६४५२ | ६७१४८७ | ६५९२ |
| ४ | बीड | ६९२४५ | २८११३९ | ४५६८२१ | ७८९९ |
| ५ | औरंगाबाद | ९९५६८ | २४९७२३ | ६६५८०४ | ४९३२ |
| | एकूण | ३,४४,२४९ | ११,१५,९९० | २३,७९,७२५ | २७,२१६ |

१९३६ चे अहवालावरून ]

| चालू पड एकर | पेरलेलें एकूण क्षेत्र-एकर | दुबार पेरलेलें क्षेत्र-एकर | एकूण पिकांचे क्षेत्र एकर | एकूण बागायत क्षेत्र-एकर |
|---|---|---|---|---|
| २७२८४ | २१२५७२७ | १०५८४ | २१३६३१३ | २९२६२ |
| १५६८७३ | १७२५६२७ | १३७१५ | १७३९३४२ | २९२६० |
| १३७१७४ | २४५५०२९ | १४८१२ | २४६९८४१ | ४२७३१ |
| ७१५०१ | १९५४१९७ | १३३९६ | १९६९५९३ | ५२७४९ |
| ३०२३७ | २८३७२८४ | २४८२७ | २८६२१११ | ७२११३ |
| ४,२३,०६९ | १,१०,९७.८६४ | ७७,३३४ | १,११,७७,२०० | २,२६,११५ |

| बाजरी एकर | नाचणी एकर | मका एकर | इतर धान्यें व कडधान्यें एकर | हरभरा एकर |
|---|---|---|---|---|
| ८३५४९ | ७६ | १७२८२ | १५७८५५ | २६१८८ |
| २२५७७ | ... | २५७३५ | १२६४७५ | ९०७४५ |
| ४५७५२ | ... | २८२०१ | ३६०७६१ | १२८३९२ |
| १४२२६८ | ... | ८६४१ | २२४०६२ | ८९९८९ |
| ३४७७७ | ... | १४०४१ | १८४९१० | १४०५३१ |
| ३,२८,९२३ | ७६ | ९३.९०० | १०,५४,०६३ | ४,७५,८४५ |

| एकूण अन्न-पिकें एकर | जवस एकर | तीळ एकर | मोहरी एकर | भुईमुग एकर | एरंडी एकर |
|---|---|---|---|---|---|
| १५२२५१६ | ४६१२६ | ११३०४ | ११२० | १९६२७७ | २८०६ |
| १०९१५५० | २८१०७ | १३३०४ | २५५९ | १७३३१ | १०६१४ |
| १६४३३७८ | ५६३६१ | ५,३७६ | ६७६ | १६१७५ | १५५६ |
| ११७८८२७ | ६१४०२ | ९१४९ | २३५० | १३२५९१ | ६३०२ |
| १५९४३७५ | ६६८१२ | २३२४७ | २१४४ | ५३०२८ | ४९२४ |
| ७०,३०,६४६ | २,५८.८०८ | ६२,३८० | ८,८४९ | ४,१५,४०२ | २६,२०२ |

| एकूण धान्याचें पीक | तंबाखू एकर | चाऱ्याची एकर जमीन | इतर बिन अन्न पिकांची जमीन | एकूण बिनअन्न पिकांचें क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| ११९९४८ | ३६९६ | २०११० | ९२८८ | ५१३७९२ |
| ४७३४५८ | ४६५८ | ५३८७४ | ५७८८ | ६४५७०४ |
| ६७८०७९ | ४२८५ | २०५४५ | ७२३२ | ८२६५९३ |
| ४६४७२० | ३९६१ | २५००८ | १८९३८ | ७९३७६६ |
| ६७०७३६ | २८४६ | २६७०० | २५१० | ९५२५९५ |
| २४,०६,९४१ | १९,४४६ | १,४६,२३७ | ४३,७५६ | ३७,३२,३७० |

[ १९३६ चे ] [ आंकडे—टनांचे ]

| नं. | जिल्हे | तांदूळ | गहूं | ज्वारी | ऊंस | जवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | ५०६४ | १५६६१ | ९८३०० | ९४२१ | ३९०१ |
| २ | नांदेड | ७६४२ | १९०३३ | ७७८१६ | १३७५ | २५८७ |
| ३ | परभणी | ५०७५ | २७५६४ | ११७५९७ | २२२१ | ६४४७ |
| ४ | बीड | ४३५४ | १७६५० | ७४१०६ | ७५१३ | ४८७० |
| ५ | औरंगाबाद | ८४० | ४१५०१ | १३९११४ | ४०५२ | ५७६८ |
| | एकूण | २२,९७५ | १,२१,४०९ | ५,०७,०१३ | २४,५८२ | २३,५७३ |

| नं. | जिल्हे | ताळि | मोहरी | भुईमूग | एरंडी | इतर गळिताचीं धान्यें | तंबाखू | कापूस-गठ्ठे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उस्मानाबाद | ९५६ | ८४ | ४२८१४ | १४६ | ५४१३ | ६२० | ६६३६४ |
| २ | नांदेड | ८६१ | ... | ५५४७ | ७७७ | ८९० | १७८३ | ५२२४२ |
| ३ | परभणी | ५२० | ३७ | ५२१२ | ९० | २१४७ | ९४६ | ११४७२९ |
| ४ | बीड | १०१४ | १२३ | ४१८३० | ३७० | ८९७ | ७८४ | ४६८९९ |
| ५ | औरंगाबाद | २५२७ | ८० | १६४९० | १८७ | २९४० | ६६१ | १४७४५३ |
| | एकूण | ५८७८ | ३२४ | १,११,८९३ | १,५७० | १२,२८७ | ४,७९४ | ४,२७,६८७ |

**कोल्हापूर** संस्थानांतील १९४४—४५सालांतलि प्रमुख पिकांचें उत्पादन पुढीलप्रमाणें झालें आहे.

( आंकडे मणाचे आहेत )

भात—१६,३२,१६३; खरीप ज्वारी—११,८३,८५८; बाजरी—४५,२८९; तूर—८३,०९१; गहूं—२०,४३७ नाचणी—२,५०,२२२; हरभरा—२२,६६२; भुईमूग—६,४५,४६९; मका—२४,१७४; मिरची—५०,६५८; तंबाखू—१,०१,९०५; उडीद—२५,०१०; कापूस—३७,०५४; रब्बी ज्वारी—७८,०९३; गूळ—६२,८७,५८६; हळद—२७,६५९;कांदे—१३,७२७; वाटाणा—२०,८९४; मसूर—१,३७५; हुलगे—१३,१३९;राळे—१७,३५८;

**सांगली** संस्थानांतील१९४६—४७ सालांतील प्रमुख पिकांचें क्षेत्र पुढीलप्रमाणें आहे.

( आंकडे एकरांचे )

ज्वारी—२,११,४००; बाजरी—४७,४००; गहूं—२३,७००; भात—१०,०००; मका—१,६००; हरभरा—१९,४००; तूर—१२,८००; भुईमूग—२७,६०० करडा—१३,३००; कापूस—५६,३००; तंबाखू—६,९००; ऊंस—२,२०० हळद—१,९००

# संयुक्त महाराष्ट्रांतील उद्योगधंदे

संयुक्त महाराष्ट्राची औद्योगिक व धंदेविषयक सद्यःस्थिती व भावी कालांत त्यांची होऊं शकणारी वाढ यांचीहि थोडीफार माहिती या ठिकाणीं देणें जरूर आहे. संयुक्त महाराष्ट्र शेतीच्या दृष्टीनें म्हणजे अन्नधान्यानें स्वयंपूर्ण असून त्याचें अन्नधान्याचें उत्पादन आणखी किती वाढणें शक्य आहे याचा विचार मागील प्रकरणांत केलाच आहे. औद्योगिक दृष्ट्या महाराष्ट्राची इतर प्रांतांशीं तुलना केली तर तो त्यांचेपेक्षां समृद्ध असल्याचें दिसून येईल. संयुक्त महाराष्ट्रांतील मुंबई शहर औद्योगिक उत्पादनाचे दृष्टीनें हिंदुस्थानांत सर्वांच्या आघाडीवर असल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राचा नवीन प्रांत बनवितांना त्याच्या औद्योगिक भवितव्याची वस्तुतः काळजी वाटण्याचें कांहींच कारण नाहीं.

उद्योगधंद्यास लागणाऱ्या खनिज संपत्तीच्या दृष्टीनें महाराष्ट्र समृद्ध नाहीं. त्याची ही गरज बाहेरूनच भागविली जाणें जरूर आहे. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या भूगर्भाची जर नीट पहाणी केली तर कांहीं खनिज संपत्ति उपलब्ध होणें शक्य आहे. सातारा जिल्ह्यांतील सह्याद्रीच्या भागांत कांहीं ठिकाणीं लोखंड सांपडतें आणि पूर्वी या लोखंडाच्या मातीपासून त्या भागांत लोखंड बनवून त्याचे तवे वगैरे जिन्नस करीत असत. ठाणें जिल्ह्यांत व कोल्हापूर संस्थानांत ॲल्युमिनियमचा सांठा विपुल आहे. ठाणें जिल्ह्यांतील तुंगार टेकडींत सांपडणारें ॲल्युमिनियम ( बॉक्साईट ) चा व्यापारी दृष्टीनें पुष्कळ उपयोग करतां येण्यासारखा आहे. तसेंच सातारा, रत्नागिरी व कोल्हापूर—बेळगांवचा कांहीं भाग यामध्यें कांहीं मॅंगॅनीजहि सांपडतें. परंतु त्याचा व्यापारी दृष्ट्या फारसा उपयोग होईल अशी परिस्थिति नाहीं. महाविदर्भांत चांदा व यवतमाळ जिल्ह्यांतील वर्धा खोऱ्यांत दगडी कोळसा खूप असून ४०० कोटी टन कोळसा तेथून निघण्याची शक्यता आहे असें तज्ज्ञांचें मत आहे. सध्यांहि या भागांत कोळशाचें उत्पादन होत असतें. १९४० सालीं या खाणींतून १८ लक्ष टन कोळसा काढण्यांत आला. तसेंच चांदा जिल्ह्यांतील लोहारा टेकडींत लोखंडाची माती पुष्कळ असून त्यापासून कितीतरी टन लोखंड निघणें शक्य आहे. आगरी लोक यापासून जुन्या पद्धतीनें लोखंड काढून त्याच्या व्यवहारोपयोगी वस्तू बनवितात. भंडारा व नागपूर जिल्ह्यांत मॅंगॅनीज पुष्कळ असून तें जगांतील चांगल्या समजल्या जाणाऱ्या जातीचें आहे. त्याचें १९४० सालीं ६ लाख टन उत्पादन झालें. कच्चा माल म्हणून मॅंगॅनीज मोठ्या प्रमाणांत येथून परदेशीं रवाना होतें. वैहारमध्यें ॲल्युमिनियम सांपडतें. बुलढाणा जिल्ह्यांतील लोणार तळ्यांतून सोड्याची खूप निर्मिती होणें शक्य आहे. आजहि एक व्यापारी कंपनी त्यापासून सोडा बनवीत आहे. मुंबई प्रांतांतील महाराष्ट्रापेक्षां महाविदर्भ खनिज संपत्तीचे दृष्टीनें सधन आहे. जेथें ही

खनिज संपत्ति सांपडते त्या भागाची नीट पहाणी करून त्याचे व्यापारी दृष्ट्या मोठ्या प्रमाणावर उत्पादन होणें शक्य आहे.

संयुक्त महाराष्ट्रांत उद्योगधंद्यास लागणारी वीज मुबलक रीतीनें मिळूं शकेल इतकी नैसर्गिक परिस्थिति अनुकूल आहे. आजहि या निसर्गस्थितीचा फायदा घेऊन कितीतरी वीज निर्माण केली जात आहे. नवीन होणाऱ्या कोयनेच्या धरणापासून कितीतरी वीज निर्माण होणें शक्य आहे. तसेंच सातारा जिल्ह्यांत उरमोडीचें धरणापासून, महाबळेश्वराजवळ वेण्णेच धरणापासून, नाशिक जिल्ह्यांत वैतरणा नदीपासून व भंडारदरा धरणापासून उद्योगधंद्यास लागणारी वीज निर्माण होणें शक्य आहे. तसेंच महाविदर्भांत नागपूर जिल्ह्यांत तोटला डोहापासून, यवतमाळ जिल्ह्यांत पैनगंगेपासून व बस्तर संस्थानांत इंद्रावती नदीच्या चित्रकोट धबधब्यापासून खूप वीज निर्माण होऊन त्याचा उद्योगधंद्यासाठीं उपयोग करतां येण्यासारखा आहे.

संयुक्त महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंदा म्हणजे कापसाचें सूत व कापड यांच्या गिरण्यांचा म्हणतां येईल. १९४४ सालीं मुंबईप्रांत-महाराष्ट्रांत कापसाचें सूत व कापडगिरण्या व कापड विणण्याचे लहानमोठे कारखाने मिळून त्यांची संख्या व त्यांतील मजुरांची संख्या पुढीलप्रमाणें होती.

| ठिकाण | कापसाच्या सूताच्या व कापडाच्या गिरण्या व कारखाने | मजूर संख्या | रेशमी, लोकरी, कापडाच्या गिरण्या होजियरी कारखाने | मजूर संख्या |
|---|---|---|---|---|
| मुंबई शहर | ८१+५ | २,०२,७०६ | ६१ | १०,४९८ |
| ठाणें जिल्हा | ११+३ | ६५३ | ६ | ३,६४१ |
| मुंबई–उपनगर | ६+१ | १०,५४० | ४ | ९५३ |
| पूर्व खानदेश जि. | ५ | ६,२०४ | ... | ... |
| प. खानदेश जि. | १ | २,३१९ | ... | ... |
| नाशिक जिल्हा | २०+८ | ८४३ | ... | ... |
| पुणें जिल्हा | ३+१३ | १,६०६ | ३ | २२० |
| सोलापूर जिल्हा | १२+४१२ | ३०,९१५ | ... | ... |
| अहमदनगर ,, | २+७ | १५५ | ३ | २२ |
| सातारा जिल्हा | २ | ७१ | १ | ३३ |
| एकूण | १४३+४४९ | २,५६,०१२ | ७८ | १५३६७ |

[ +चिन्हापुढील आंकडे फॅक्टरी ॲक्टाच्या विभाग ५ ( १ ) व ( २ ) खालीं नोंदलेले लहान कारखाने आहेत. ]

मुंबईप्रांत—महाराष्ट्र, दाक्षिण मराठी संस्थानें व महाविदर्भ यांमधील सुताऱ्या व कापडाच्या मोठ्या गिरण्याव त्यांतील चात्यांची व मागांची संख्या पुढें दिली आहे.

| ठिकाण | गिरण्यांची संख्या | चात्या | सरासरी दररोज चालणाऱ्या चात्या | माग | सरासरी दररोज चालणारे माग |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई शहर | ६५ | २८०३४०६ | २५८६८५० | ६६१६४ | ६५३९६ |
| सोलापूर [सोलापूर५व बार्शी* ३] | ८ | ३०२७०४ | २७८७८७ | ७०१५ | ६७९९ |
| पूर्व खानदेश [चाळिसगांव१ जळगांव२ अमळनेर१] | ४ | १०५७४० | १०२९३७ | २५२३ | २४३० |
| पुणें | १ | १६७३२ | १५७०१ | ५८२ | ४२६ |
| धुळें(प.खानदेश) | १ | ४६१३६ | | १०५८ | |
| भिवंडी (ठाणें) | १ | ... | | २४६ | |
| माधवनगर (मिरज ज्यु.) | १ | ६००० | | ... | |
| मिरज | १ | २३३५६ | | ५४६ | |
| मोर | २* | ४९१२ | | ३१ | |
| सांगली | २ | १३१०८ | | ३८२ | |
| कोल्हापूर | १ | २५७८० | | ६०२ | |
| इचलकरंजी | २ | ... | | १४३ | |
| टिकेकरवाडी (सोलापूर) | १ | ... | | ५१ | |
| **महाविदर्भ** | | | | | |
| नागपूर | २ | १६७५९६ | | ३११८ | |
| पुलगांव | १ | १७७९२ | | ३३९ | |
| हिंगणघाट | ३ | ७५५३० | | १२७३ | |
| बडनेरा | १ | २१३८४ | | ३६९ | |
| अकोला | १ | १३०९६ | | २९२ | |
| एलिचपूर (उमरावती) | १ | १२०९२ | | ३४३ | |
| **मराठवाडा** | | | | | |
| औरंगाबाद | १ | १८३१६ | | २७१ | |
| एकूण | १०० | ३८,२३,६७० | | ८५२४८ | |

* बार्शीपैकी दोन गिरण्या व मोरपैकी १ गिरणी [illegible]

या मोठ्या गिरण्यांखेरीज बाकीचे इतर लहान कारखाने असून त्यांमध्यें बहुतेक विणण्याचें काम होतें.

१९४५ व १९४६ सालीं हिंदुस्थानांत निर्माण झालेल्या सुताचे व कापडाचे आंकडे व मुंबई शहरांत निर्माण झालेल्या सूताचे व कापडाचे आंकडे खालीं दिले आहेत. त्यावरून हिंदुस्थानांत निर्माण होणाऱ्या एकंदर कापडापैकीं व सुतापैकीं एकटें मुंबई शहर किती सूत व कापड निर्माण करतें तें कळून येईल.

| | १९४६ | १९४५ |
|---|---|---|
| मुंबई शहर— | १३५३० लक्ष वार कापड | १६०९२ लक्ष वार कापड |
| | ४०९० लक्ष पौंड सूत | ५०७२ लक्ष पौंड सूत |
| हिंदुस्थान— | ४००२७ लक्ष वार कापड | ४६३९५ लक्ष वार कापड |
| | १३९६४ लक्ष पौंड सूत | १६४३४ लक्ष पौंड सूत |

मुंबई शहरांतील गिरण्यामधील चात्यांच्या व मागांच्या संख्येशीं संयुक्त महाराष्ट्रांतील जिल्ह्यांमधून असलेल्या गिरण्यांतील चात्यांचें व मागांचें प्रमाण अनुक्रमें ३६·४ व २८·८ असें पडतें. यावरून या गिरण्यामध्यें किती सूत व कापड निर्माण होत असावें याचा आपणास अंदाज करतां येईल. १९४६ सालांतील मुंबई शहराचा सूतनिर्मितीचा जो आंकडा आहे त्याचे ३६·४ टक्के सूत महाराष्ट्रांतील या गिरण्यांमधून निघालें असें धरण्यास कांहींच हरकत नाहीं. मुंबईबाहेरील गिरण्या मुंबईपेक्षा जाड नंबराचें सूत काढतात. सुताचा आंकडा वजनांत असल्यामुळें या प्रमाणापेक्षा आणखी ४।५ टक्क्यांनीं महाराष्ट्राचा हा आंकडा वाढण्याचा संभव आहे. दररोज सरासरी चालू असणाऱ्या चात्यांचें व मागांचें प्रमाण ( गिरणींतील एकंदर चात्यांशीं व मागांशीं दोन्ही ठिकाणीं सारखेंच आहे असें गृहित धरलें आहे.

मुंबई शहराच्या ४० टक्के सूत संयुक्त महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतील गिरण्यांमधून निर्माण झालें असें धरलें तर १९४६ मध्यें तें १९३६ लक्ष पौंड झालें असावें असा अंदाज करतां येईल. याच पद्धतीनें कापडाच्या निर्मितीचा हिशेब करून मुंबई शहराच्या ३० टक्के कापड संयुक्त महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतील गिरण्यांमधून निर्माण झालें असें धरलें तर १९४६ मध्यें तें ४०५९ लक्ष वार झालें असावें असा अंदाज करतां येईल. यावरून हें दिसून येईल कीं हिंदुस्थानांतील गिरण्यांतून निर्माण होणाऱ्या एकंदर सुतापैकीं व कापडापैकीं ४१ टक्के सूत व ४४ टक्के कापड संयुक्त महाराष्ट्रांतील ( अर्थात मुंबई शहरासह ) गिरण्यांमधून निर्माण होतें.

रेशमि व कृत्रिम रेशमि विणण्याच्या मुंबई शहरामध्यें २६ गिरण्या व कारखाने असून त्यांमध्यें ३०१९ माग आहेत. तसेंच ठाणें जिल्ह्यांत भिवंडी येथें एक रेशमि विणणारी गिरणी असून त्यांत ५० माग आहेत. सांगली येथील गजानन मिलमध्यें रेशीम विणणारे ७३ माग आहेत.

लोकरीच्या ५ गिरण्या मुंबई शहरात असून त्यांत लोकरी चात्या ७५६० व १९४ पॉवरचे माग आहेत. ठाण्याला एक लोकरीची गिरणी असून त्यांत २८८० लोकरी चात्या व २९६ पॉवरचे माग आहेत.

या गिरण्यांपेक्षां आणखी पुष्कळ रेशमाच्या व लोकरीच्या गिरण्या संयुक्त महाराष्ट्रांत सुरू करणें शक्य आहे. या कारखान्यास लागणारी वीज मिळूं शकेल अशा ठिकाणीं उदाहरणार्थ कोयनेच्या धरणाजवळ अगर कल्याण-जवळ अशा गिरण्या सुरू करणें शक्य आहे.

सूत व सुताचे कापड याबाबत गिरण्यांची जी आंकडेवार माहिती वर दिली आहे त्यावरून संयुक्त महाराष्ट्र कापडाच्या धंद्याचे बाबतींत सर्वांत आघाडीवरील प्रांत आहे हें दिसून येईल. प्रांताच्या गरजेपेक्षां कितीतरी अधिक कापडाचा माल येथें निर्माण होतो. कापडाचे बाबतींत हिंदुस्थानांतील बऱ्याच प्रांतांना महाराष्ट्रावर अवलंबून रहावें लागत आहे. म्हणून इतर कांहीं धंद्यांचे दृष्टीनें महाराष्ट्र जरी मागासलेला आहे असें दिसलें तरी या सुताच्या व कापडाच्या धंद्याच्या व्यापामुळें ती सर्व उणीव भरून निघण्यासारखी आहे.

या धंद्याला लागणाऱ्या जिनसांपैकीं स्टार्च (खळीसाठीं), बॉबिन्स व धोटे यांचे कारखाने महाराष्ट्रांत काढणें शक्य आहे. महाराष्ट्रांतील ज्वारीचा स्टार्च तयार करण्यासाठीं उपयोग होईल व महाराष्ट्राच्या जंगलांतील बांबू व इतर लाकडापासून धोटे व बॉबिन्स तयार करतां येतील.

या मोठ्या गिरण्याखेरीज खेडोपाडीं असलेल्या हातमागावर महाराष्ट्रांत पुष्कळच कापड विणलें जातें. महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांत वीज गेल्यास पुष्कळ ठिकाणीं विजेच्या शक्तीवर चालणारे माग सुरूं होतील.

सध्यां मुंबई प्रांत–महाराष्ट्रांत होजिअरीचे(पायमोजे, फॉक्स वगैरे विणण्याचे) कारखाने मुंबई शहर धरून ९ आहेत. ह्या कारखान्यांची ह्यापेक्षां अधिक वाढ होणें शक्य आहे. घरांतून फावल्या वेळांत करतां येण्यासारखा हा धंदा आहे. या दृष्टीनें याची वाढ केल्यास तो एक जोडधंदा म्हणून पुष्कळ लोकांना विशेषतः बायकांना करतां येईल.

सध्यांच्या गिरण्यांतील धुणें, रंगविणें व छापणें या विभागांची खूपच वाढ करतां येणें शक्य आहे. तसेंच कल्याण–अंबरनाथ या भागांत ह्यांचें स्वतंत्र कार-खानेहि काढणें शक्य आहे. लोकांचे रहाणींचें मान वाढत जाईल तसतसा गिर-ण्यांच्या या विभागांचा विस्तार वाढणें अवश्य आहे.

संयुक्त महाराष्ट्रांतील कापसाचा धागा सुधारून व इतर शास्त्रीय पद्धतीनें आजच्यापेक्षां बारीक नंबरचें सूत महाराष्ट्रांतील गिरण्यांतून काढणें शक्य आहे. मुंबई शहराखेरिज आणखी पुढील ठिकाणीं सुताच्या व कापडाच्या गिरण्या

काढणें शक्य आहे…पूर्व खानदेशामध्यें जामनेर व एरंडोल, पश्चिम खानदेशामध्यें नंदुरबार व दोंडाईचे, सातारा जिल्ह्यांत कराड, नाशिक जिल्ह्यांत मालेगांव व अहमदनगर जिल्ह्यांत राहुरी. महाविदर्भ हा कापसाचा भाग असल्यामुळें तेथें आणखी कितीतरी सुताच्या व कापडाच्या गिरण्या काढणें शक्य आहे.

कापसाच्या हंगामांत चालणाऱ्या सरकी काढण्याच्या व कापूस दाबण्याच्या गिरण्या (जिन व प्रेस) महाराष्ट्रांत पूर्वखानदेश १०७, पश्चिम खानदेश ६३, नाशिक १६, सोलापूर १७, अहमदनगर २८, याप्रमाणें १९४४ सालीं होत्या व त्या सर्वांतून मिळून काम करणारांची संख्या १२७०४ होती. महाविदर्भांत १९३८ सालीं ३६३ जिन व प्रेस होते. पूर्वी कापसाच्या तेजीच्या काळांत याच्या दुप्पट संख्या होती. गेल्या दहा वर्षांत त्यांची वाढ न होतां जास्त धान्य पिकविण्याच्या सरकारी धोरणामुळें कदाचित् ती कमीच झाली असण्याचा संभव आहे.

इंजिनिअरिंग (यंत्रोद्योग) या सदराखालीं येणाऱ्या धंद्यामध्यें म्हणजे मोटार गाड्या दुरुस्त करणें व त्यांचे सांठे बांधणें, वाजि निर्माण करणारे कारखाने, विजेच्या यंत्रांचे कारखाने, गिरण्यासाठीं लागणाऱ्या व इतर सर्वसामान्य यंत्रांचे कारखाने; जहाजें बांधणें, ट्रंका, कुलुपें, काच्या करणें, ट्राम्सचे कारखाने, रॉकेलचे डबे भरणें व बंद करणें इ. धंद्यांचा समावेश होतो. इ. स. १९४४मध्यें या सर्व धंद्यांचे मुंबई-प्रांत महाराष्ट्रांत मुंबईसह एकंदर लहानमोठे मिळून ४४३ कारखाने होते व त्यांत काम करणारांची संख्या २७८५३ होती. पैकीं मुंबई शहरांत हे कारखाने ३५२ असून त्यांत काम करणारांची संख्या २०९३४ होती.

मुंबई शहरांतच हे कारखाने प्रामुख्यानें आहेत. मुंबईखेरीज इतर जिल्ह्यांमध्यें किर्लोस्करवाडी येथें व सातारा कूपर इंजिनिअरिंग वर्क्समध्यें शेतीचीं नांगर, मोट, चरक वगैरे उपकरणें तयार होतात. किर्लोस्करवाडीच्या कारखान्यांत पंप, खाटा, ऊंस फोडण्याचीं यंत्रें, साखर तयार करण्याचीं यंत्रें इ. तयार होतें. युद्धकालांत इलेक्ट्रिक मोटार्स, एंजिनें, लेथ वगैरे यंत्रें किर्लोस्करवाडीस तयार होत होतीं. आतां त्यांनां त्यांचेसाठीं दुसरा कारखाना काढला आहे. कूपर इंजिनिअरिंगमध्यें ऑइल इंजिन्स व इतर यंत्रें (लेथ, ड्रिल, कापणारीं यंत्रें वगैरे) व त्यांचे सुटे भाग तयार होतात. किर्लोस्करांनीं आतां पुण्याजवळ ऑईल इंजिन्स, इतर यंत्रें व यंत्रांचे भाग तयार करण्यासाठीं स्वतंत्र कारखाना काढण्याचें ठरविलें आहे. कापडाच्या व सुताच्या गिरण्यांची कांहीं यंत्रसामुग्री कूपर इंजिनिअरिंगमध्यें तयार होते. भिवंडी (ठाणें जिल्ह्यांत) दांडेकरांचा भात सडण्याचीं यंत्रें तयार करणारा मोठा कारखाना आहे. इतरही आणखी लहानमोठीं यंत्रें तयार करणारे कारखाने मुंबईखेरीज सांगली, कराड, पाचोरा वगैरे ठिकाणीं आहेत. भिवंडीच्या दांडेकरांच्या कारखान्यांत १०० टन दररोज ऊंस गाळणारे क्रशर्स तयार होतात.

या धंद्याची (यंत्रोद्योगाची) महाराष्ट्रांत पुष्कळ वाढ होणें शक्य आहे. मोठमोठीं यंत्रें अजून परदेशाहून अगर अन्य प्रांतांतून (टाटा आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स टाटानगरकडून) घ्यावीं लागतात. या धंद्यास लागणारा कोळसा व लोखंड हीं दोन्हीं महाराष्ट्रांत नसल्यामुळें त्यांची वाढ मोठ्या प्रमाणावर येथें होणें कठीण आहे. तरीपण महाविदर्भांत जेथें थोडेंफार लोखंड व कोळसा सांपडतो तेथें या धंद्याची थोडफार उभारणी करणें शक्य आहे. तसेंच महाराष्ट्रांत जेथें विजेची शक्ति भरपूर वापरावयास मिळेल अशा ठिकाणींहि या धंद्याची उभारणी करणें शक्य आहे. या धंद्यास लागणारा कच्चा माल बाहेरून आणला तरी विजेच्या सहाय्यानें त्यापासून मोठमोठीं यंत्रें तयार करणें शक्य आहे. या दृष्टीनें कल्याण–अंबरनाथ हा भाग या धंद्यांचे वाढीस उपयुक्त आहे. तसेंच कोयनेचें धरण झाल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यांतील चिपळूणजवळहि या धंद्याची उभारणी करणें शक्य आहे. ऑईल इंजिन्स, यंत्रांचे भाग, यंत्रोपकरणें (मशीन टूल्स), सायकली, शेतकीचीं अवजारें, घड्याळें यांचे कारखाने पुण्यास काढणें शक्य आहे. विजेच्या मोटार्स, विजेचे पंखे, रिफ्रिजरेटर, मोठीं यंत्रें, बॉक्साईटपासून अल्युमिनियम तयार करणें इत्यादींचे कारखाने कल्याण–अंबरनाथ भागामध्यें काढणें शक्य आहे. कोयनेचें धरण झाल्यानंतर चिपळूण येथें ॲल्युमिनियमचा कारखाना काढणें सुलभ होईल. पुणें व नाशिक येथें तांबें व पितळ यांचे पत्रे तयार करण्याचे कारखाने काढणें शक्य आहे. तसेंच तांब्या–पितळेचीं भांडीं तयार करणाऱ्या गिरण्याहि येथें काढणें शक्य आहे. सध्यां पुण्यास भांड्यांची एक गिरणी चालू आहे.

धातूंचे व ओतीव कामाचे कारखाने मुंबई–महाराष्ट्रांत १९४४ सालीं लहान मोठे मिळून ४५ होते व त्यांत काम करणारांची संख्या ४५२७ होती. पैकीं मुंबई शहरांत हे कारखाने ४० असून त्यांतील कामगारसंख्या ३६१६ होती. मोठमोठ्या लोखंडी यंत्रांच्या ओतकामाच्या शिक्षणाची व्यवस्था सरकारनें करणें जरूर आहे. तसें झाल्यास ह्या कारखान्यांची मुंबई शहर व कल्याण–अंबरनाथ भागांत वाढ होणें शक्य आहे.

सूत व कापड याचे खालोखाल महाराष्ट्रांतील दुसरा महत्त्वाचा धंदा म्हणजे साखरेचा होय. हे कारखाने हंगामी कारखाने या सदराखालीं येतात. कारण ते ऊंसाच्या हंगामापुरते चालतात. मुंबई–महाराष्ट्रांत (संस्थानें सोडून) १९४४ सालीं साखरेचे १० कारखाने होते व त्यांत ५८८१ लोक काम करीत होते. याखेरीज दक्षिणी संस्थानांत ४ कारखाने आहेत. या एकंदर चौदा कारखान्यांत निर्माण होणाऱ्या साखरेचा अंदाज प्रत्येक कारखान्यांत दररोज किती टन ऊंस गाळला जातो (म्हणजे तो गाळण्याइतकी यंत्रसामुग्री आहे) यावरून करतां येणें शक्य आहे. त्यासाठीं त्याची माहिती पुढें दिली आहे.

| | कारखाना | | दररोज ऊंस गाळण्याची शक्ति |
|---|---|---|---|
| १ | सासवड माळी— | अकलूज | ४५० ते ५०० टन |
| २ | बृहन्महाराष्ट्र— | श्रीपूर | ३०० ते ३५० टन |
| ३ | वालचंद नगर— | कळंब | १२०० टन |
| ४ | रावळगांव— | | ७०० टन |
| ५ | बेलापूर शु. कं. | हरिगांव | १००० " |
| ६ | महाराष्ट्र— | बेलापूर | १००० ते १२०० टन |
| ७ | बेलवंडी | — | २५० ते ३०० टन |
| ८ | सोमय्या— | कोपरगांव | ७०० ते ७५० टन |
| ९ | गोदावरी— | कान्हेगांव | ७५० ते ८०० " |
| १० | चांगदेव— | पुणतांबा | ३५० टन |
| ११ | कोल्हापूर— | | ५०० " |
| १२ | फलटण— | | ६२५ ते ६५० टन |
| १३ | कृष्णा शुगर वर्क्स— | कित्तूर | २०० " |
| १४ | उगार— | | ५०० " |

सर्वसाधारणपणें हे कारखाने वर्षांतून सरासरी ४ महिने चालतात. जेवढा ऊंस गाळला जातो त्याचे एक दशांश साखर निर्माण होतें असा अंदाज करण्यास कांहींच हरकत नाहीं. या सर्व कारखान्यांतून मिळून अंदाजें दररोज ७ ते ८ हजार पोतीं साखर तयार होतें. महाराष्ट्रांत कोयना धरण झाल्यावर अगर इतर ठिकाणीं ऊंसाची लागवड करून साखरेचे कारखाने वाढविणें शक्य आहे.

साखर तयार होतांना जी काकवी निघते त्यापासून पॉवर अल्कोहोल तयार करण्याचे कारखाने या साखरेच्या कारखान्यांच्या क्षेत्रांत अगर जवळपास काढणें शक्य आहे. बेलापूरला पॉवर अल्कोहोलचा कारखाना सुरू करण्याची सरकारची योजनाहि आहे.

यंत्रांच्या सहाय्यानें गूळ तयार करण्याचे कारखानेहि अलीकडे महाराष्ट्रांत निघाले असून १९४४ सालीं त्यांची संख्या लहानमोठे कारखाने मिळून २७६ होती व त्यांत काम करणाऱ्या लोकांची संख्या ६४८१ होती.

खाद्यपेयें व तंबाखू इ. सदराखालीं येणाऱ्या उद्योगधंद्यांमध्यें पावाच, बिस्किटांचे व मिठाईचे कारखाने, कॉफीचे कारखाने, दुधाच्या डेअऱ्या, पिठाच्या गिरण्या, फळें व अन्नाचे टिकाऊ डबे करणें, बर्फ व सोडावॉटर, तांदूळ सडण्याच्या गिरण्या, सिगरेट व विडी यांचे कारखाने इत्यादि धंद्यांचा समावेश होतो. या सर्व उद्योगधंद्यांचे १९४४ सालीं मुंबईप्रांत-महाराष्ट्रांत ३०२ लहान-मोठे कारखाने होते आणि त्यांत २०,०६६ कामगार काम करीत होते. पैकीं मुंबई शहरांत यांचे १०२ कारखाने होते व कामगारांची संख्या ६,३३७ होती.

मुंबईप्रांत–महाराष्ट्रांत फळें व भाजीपाला यांचे हवाबंद डबे तयार करण्याचे कारखाने बरेच वाढणें शक्य आहे. नाशिक, पुणें व रत्नागिरी या भागांत हे सुरू करतां येतील. रत्नागिरींत उत्तम कलमी आंब्यांचे डबे अशा रीतीनें तयार करतां येतील. तसेंच जळगांव, राहुरी या भागांतील मोसंबी इ. फळें यांचे रस काढून ते टिकाऊ करून ठेवतां येतील. तसेंच वऱ्हाड व नागपूर भागांत संत्र्यांचे रस, मार्मालेड, ऑरेंज पील ऑईल हीं तयार करणें शक्य आहे. पुणें व मुंबईसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरांतून तेथें अगर जवळपास बिस्किटांचे कारखाने काढणें शक्य आहे. भात चांगल्या पिकणाऱ्या भागांत उदा. भिवंडी, पनवेल, चिपळूण येथें पोह्यांचे कारखाने काढणें शक्य आहे. तसेंच भंडारा जिल्ह्यांतहि हे कारखाने निघणें शक्य आहे. भात सडण्याच्या गिरण्यांची तेथें आणखी वाढ होणें शक्य आहे. जळगांव, भुसावळ या भागांत अगर दोंडाईचे, नाशिक जिल्ह्यांतील निफाड येथें गव्हाच्या पोह्यांचे कारखाने काढणें शक्य आहे. साखर कारखान्यांच्या जागेंत लेमन ड्रॉप्स वगैरे तयार करतां येणें शक्य आहे. सातारा, कराड या भागांत खाण्याच्या तेलाच्या गिरण्या सुरू करणें शक्य आहे. तसेंच वऱ्हाडमध्यें व नागपूर भागांत वनस्पतीजन्य तुपाचे कारखाने काढणें शक्य आहे. मुंबईप्रांत–महाराष्ट्रांतहि खानदेश व सातारा जिल्ह्यांत वनस्पती तुपाचे कारखाने काढणें शक्य आहे.

सिगारेट तयार करण्याचे कारखाने १९४४ सालीं मुंबईत ३ व. मुंबई उपनगरमध्यें ३ व पुण्यामध्यें १ होते. या सिगारेटच्या कारखान्यांची वाढ होणें शक्य आहे. विशेषतः कोल्हापूर, निपाणी, सांगली या भागांत तंबाखू चांगली पिकते. तेथें हे कारखाने निघणें शक्य आहे.

सातारा, सांगली या भागांतील कृष्णा खोऱ्यांत तसेंच वऱ्हाड व खानदेशमध्यें दूध मुबलक असल्यामुळें दुधापासून तयार होणाऱ्या टिकाऊ पदार्थांचे कारखाने तेथें काढणें शक्य आहे.

मच्छीमारीचा धंदा, विशेषतः कोंकण भागांत आजच्या पेक्षां कितीतरी पटीनें वाढणें शक्य आहे. सरकारनें या धंद्याची वाढ करण्याची योजना आखल्यास तो एक कोंकणांतील महत्त्वाचा धंदा होईल. आज हा धंदा मागासलेल्या अवस्थेंत आहे. अलीकडे या धंद्याचें शिक्षण देणाऱ्या शाळा सरकारनें काढल्या आहेत. मासे पकडण्यास मोटार बोटी वापरून व बाजारांत ताज्या स्थितींत त्यांची जलद वाहतूक करण्याची सोय करून, तसेंच शार्क लिव्हर ऑइल त्यापासून काढण्याची व्यवस्था करून, मासळींचे हवाबंद डबे तयार करून, मासळी खारवून वाळवण्याची पद्धत सुधारून मच्छीमारीच्या धंद्याची खूप वाढ होणें शक्य आहे.

रसायनें, रंग इत्यादि सदराखालीं रासायनिक पदार्थ तयार करणें, रंगविणें व धुणें, गॅस वर्क्स, आगपेट्यांचे कारखाने, तेलाच्या गिरण्या, रंग, साबण इत्यादींचे कारखाने येतात. या सर्वांचे मिळून मुंबईप्रांत–महाराष्ट्रांत १९४४ सालीं ३०८

सहानमोठे कारखाने होते व त्यांत काम करणाऱ्यांची संख्या २९,४९६ होती. पैकीं मुंबई शहरांत यांचे १०१ कारखाने होते व त्यांत काम करणाऱ्या मजुरांची संख्या २०,९१७ होती.

सातारा, प. खानदेश, अहमदनगर, सोलापूर, नाशिक या जिल्ह्यांत जवस पिकत असल्यामुळें जवसाचें तेल काढण्याच्या गिरण्या खानदेश व सातारा जिल्ह्यांत काढणें शक्य आहे. तसेंच सातारा जिल्ह्यांत एरंडांचें तेल काढण्याच्या गिरण्याहि काढणें शक्य आहे.

सध्या मुंबई शहरामध्यें साबण तयार करणारे बरेच कारखाने असून साबणाचें बरेंच उत्पादन मुंबईत होतें. वनस्पती तुपाच्या गिरण्याशेजारीं साबणाचे कारखाने काढणें शक्य व फायदेशीर आहे. अजूनपर्यंत पूर्ण साधनसामुग्रीयुक्त असे रंग व व्हार्निश यांचे कारखाने प्रांतांत नाहींत. त्याकरितां तज्ञ व वाकबगार कामगारांची गरज असते. ते मिळाल्यास हे कारखाने मोठ्या प्रमाणावर कल्याण—अंबरनाथ भागांत निघणें शक्य आहे. सध्या ठाणें जिल्ह्यांत २ व मुंबई उपनगरांत २ मिळून चार आगपेट्यांचे कारखाने आहेत. आगपेट्यांचा धंदा एक घरगुती धंदा म्हणून ठाणें जिल्ह्यांत करतां येणें शक्य आहे.

बस्तर संस्थानांत लाखेचें उत्पादन बरेंच होतें. त्यामुळें तेथें व्हार्निश, प्लॅस्टिक्स इ. तयार करण्याचे कारखाने काढणें शक्य आहे.

सह्याद्रीमध्यें औषधी वनस्पती बऱ्याच सांपडतात. त्यामुळें औषधी तयार करण्याचे कारखाने विशेषतः कल्याण—अंबरनाथ भागांत काढणें शक्य आहे.

देशी (आयुर्वेदीय) पद्धतीचीं औषधें तयार करण्याचे मोठे कारखाने पनवेल, नगर, पुणें, चेंबूर इ. ठिकाणीं आहेत. पाश्चात्य पद्धतीचीं औषधें तयार करणारे कारखानेहि महाराष्ट्रांत निघाले असून त्यांची संख्या वाढण्याचाहि संभव आहे.

महाविदर्भांत आंवळा, इंद्रजव व इतर वनस्पतींपासून औषधें तयार करण्याचे कारखाने काढणें शक्य आहे.

लाकडापासून कोळसा, डांबर, गॅस तयार करण्याचे कारखाने काढण्यासाठीं लागणारें लाकूड ठाणें, पश्चिम खानदेश, कुलाबा, डांग इ. प्रदेशांतून मिळणें शक्य आहे व त्यांचे कारखाने मुंबई, पुणें, सोलापूरसारख्या मोठ्या शहरांतून निघणें शक्य आहे, कारण कोलगॅसचा उपयोग कारखान्यांतून व घरगुती करणें शक्य आहे. महाविदर्भांत लाकडापासून कोळसा, डांबर, गॅस तयार करण्याचे कारखाने काढण्यास खूप अवसर आहे. उद्योगधंद्यास लागणारे रासायनिक पदार्थ व इतर रसायनें यांचे कारखाने कल्याण—अंबरनाथ भागांत काढणें शक्य आहे. सध्या ठाणें जिल्ह्यांत व मुंबई उपनगरांत या रासायनिक द्रव्यांचे ७ कारखाने आहेत व मुंबईत ५ आहेत.

कागद व छपाई या सदराखालीं कागदाच्या गिरण्या, छापखाने व पुस्तक-बांधणीचे कारखाने इ. उद्योगधंदे येतात. या उद्योगधंद्यांचे १९४४ सालीं मुंबई-प्रांत महाराष्ट्रांत लहानमोठे २३५ कारखाने होते व त्यांत काम करणाऱ्यांची संख्या ११,०२३ होती. पैकीं मुंबईत हे कारखाने १९४ होते व त्यांत काम करणाऱ्यांची संख्या ८,४३९ होती. यापैकीं कागदाच्या गिरण्या मुंबईत ३, मुंबई उपनगर १ व पुण्यांत २ आहेत. पुण्याच्या दोन कागदांच्या कारखान्यांपैकीं एक मोठी गिरणी असून त्यांत ८०० ते ९०० कामगार काम करतात.

महाविदर्भांतील चांदा जिल्ह्यांतील जंगलांत कागदाचा पल्प तयार करण्या-साठीं लागणारी कच्चीं द्रव्यें म्हणजे बांबू व इतर पदार्थ खूप असल्यामुळें चांद्या-जवळ कागदाची गिरणी काढणें शक्य आहे. कारवार जिल्ह्यांतील सुपा पेट्यांत बांबूचें खूप जंगल असल्यामुळें तिथेंहि कागदाचा कारखाना निघणें शक्य आहे. आणि काळ्या नदीचें धरण झाल्यानंतर त्यावर निर्माण होणाऱ्या विजेचा या कारखान्याकडे उपयोग होईल. पुठ्ठे तयार करण्याचे कारखाने प. खानदेशांत नरडाणा येथें काढणें शक्य आहे. कारण त्यास लागणारें गवत तेथील जंगलांत मिळतें. अहमदनगर जिल्ह्यांत असलेल्या साखरेच्या कारखान्याशेजारीं ऊंसाच्या चोथ्यापासून पुठ्ठे व ब्राऊन पेपर्स तयार करतां येतील. सातारा, खानदेश, वऱ्हाड वगैरे भुईमूग पिकणाऱ्या भागांत शेंगाच्या फोलपटापासून पुठ्ठे तयार करतां येतील.

धोटे व बॉबिन्स करण्याचे कारखाने बेळगांव जिल्ह्यांतील खानापूरजवळ तसेंच प. खानदेशमध्यें नवापूरजवळ काढणें शक्य आहे. हे तयार करण्यासाठीं लागणारें लाकूड, बांबू जवळपासच्या जंगलांतून मिळणें शक्य आहे. प्लायवुड तयार करण्याचे कारखाने कारवार जिल्ह्यांत काढणें शक्य आहे. कारण त्यासाठीं लागणारें लाकूड कारवारच्या जंगलांत मिळूं शकतें. तसेंच कोंकण भागांतील कांहीं बंदरांतून गलबतें बांधण्याचे कारखाने सुरू करणें शक्य आहे. ठाणें जिल्ह्यांत चांगल्या इमारती सागाचें जंगल आहे. तेथें अद्यावत पद्धतीचे लाकूड कापण्याचे कारखाने सुरू केल्यास त्यांची वाढ होण्यास खूप अवसर आहे. महाविदर्भांतील जंगल विभागांतहि प्लायवुड, धोटे व बॉबिन्सचे कारखाने काढणें शक्य आहे.

कांच, लांकूड, विटा इत्यादि तयार करण्याचे धंदे या सदराखालीं विटा व व कौलें यांचे कारखाने, सुतारी व फर्निचरचे कारखाने, सीमेंट व चुनखडीचे कारखाने, ( चिनी ) मातीच्या भांड्यांचे कारखाने, कांचकारखाने, लाकूड कापण्याच्या मिल्स ( कारखाने ), पाथरवटाचे कारखाने इत्यादींचा समावेश होतो. या सर्व धंद्यांचे १९४४ सालीं लहानमोठे मिळून मुंबई-महाराष्ट्रांत एकंदर २६४ कारखाने होते व त्यांतील कामगारांची संख्या २२०७१ होती. पैकीं मुंबई शहरांत या धंद्यांचे १०० कारखाने होते व त्यांतील कामगारसंख्या ११३३३

होती. कांचेचे कारखाने मुंबई शहरांत ३, मुंबई उपनगरमध्ये ४ व पुणें जिल्ह्यांत १ याप्रमाणें आहेत. औंध संस्थानांत ओगलेवाडीस एक कारखाना आहे.

महाविदर्भांत गोंदिया व नागपूर येथें मिळून कांचेचे ३ कारखाने आहेत. या धंद्यास लागणारी कच्चीं द्रव्यें त्या भागांतच जवळपास मिळूं शकतात. सोडा तेवढा बाहेरून आणावा लागतो. लोणार तळ्यांत तयार होणारा सोडा थोडाफार मिळूं शकतो. या अनुकूल परिस्थितीमुळें या भागांत कांचेच्या धंद्याची वाढ होणें शक्य आहे. मुंबई शहर व महाराष्ट्रांतील कांचेच्या कारखान्यांना कच्या मालासाठीं इतर प्रांतांवरच अवलंबून रहावें लागतें. सावंतवाडी—बेळगांव भागांत कांचेस लागणारी वाळू अगर त्या वाळूचे दगड मिळतात. तेथें हे कारखाने काढणें शक्य आहे. कांचेचे तक्ते ( शीट ग्लास ) अजून या प्रांतांत तयार होत नाहीं. त्याचे कारखाने काढणें शक्य आहे. यासाठीं त्यांतील तज्ञ कामगार मिळाल्यास हे कारखाने कल्याण अंबरनाथ भागांत काढणें शक्य आहे. तेथील कांचेच्या भट्ट्यासाठीं गॅसचा उपयोग करता येणें शक्य आहे. संयुक्त महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं घरगुती धंदे म्हणून बांगड्या तयार करण्याचे कारखाने सुरू करणें शक्य आहे. बांगड्यांचा संयुक्त महाराष्ट्रांत खूप खप असून त्यांची आयात बरीचशी बाहेरच्या प्रांतांतून ( संयुक्तप्रांत—फिरोजाबाद ) होते. बांगड्यांचे मोठे कारखाने काढावयाचे झाल्यास कांचेच्या कारखान्याजवळच काढणें फायद्याचें आहे.

महाविदर्भांत यवतमाळ जिल्ह्यांतील राजूर येथें सीमेंट तयार करण्याचा कारखाना काढता येणें शक्य आहे. कारण त्यात लागणारीं बहुतेक कच्चीं द्रव्यें ( जिप्समखेरीज ) तेथें उपलब्ध आहेत. नागपूर व चांदा जिल्ह्यांत चिनी मातीच्या भांड्यांचे कारखाने काढता येण्यासारखे आहेत. सध्या नागपूर येथें एक ( चिनी ) मातीचीं भांडीं करणारा कारखाना आहेच. पुणें जिल्ह्यांत तळेगांव येथेंहि एक पॉटरीचा कारखाना आहे. बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांत या धंद्यास लागणारी माती उपलब्ध असल्यामुळें तेथेंही पॉटरीचे कारखाने काढणें शक्य आहे. तेथें नुकताच एका नवीन पॉटरीच्या कारखान्याची उभारणी झाली आहे. पॉटरीसाठीं लागणारी चांगली माती बाहेरून आणून उत्तम दर्जाच्या पांढऱ्या पॉटरीचा कारखाना कल्याण—अंबरनाथ भागांत काढणें शक्य आहे. सध्या कल्याण भागांत विटांचे बरेच कारखाने आहेत. सध्या तेथें वापरतात त्यापेक्षा चांगली माती वापरून चांगल्या टिकाऊ विटांचे कारखाने तेथें वाढविणें शक्य आहे. तसेंच बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर तालुक्यांतहि विटांचे कारखाने वाढविणें शक्य आहे.

कातड्याचे जिन्नस, जोडे, बूट इत्यादींचे कारखाने: १९४४ सालीं मुंबई-महाराष्ट्रांत लहानमोठे मिळून ५६ होते व त्यांतील कामगारांची संख्या १९००

होती. पैकीं मुंबई शहरांत ह्यांचे ४ लहान व ४० मोठे कारखाने होते व त्यांत काम करणाऱ्यांची संख्या १५७८ होती.

जुन्या पद्धतीनें कांतडी कमावून त्याचे जोडे वगैरे करण्याची तसेंच कांतडी मोटा वगैरे करण्याचीं कामें घरगुती पद्धतीनेंच होतात. आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें कांतडी कमावण्याचे कारखाने पुष्कळ काढतां येण्यासारखे आहेत. त्यासाठीं लागणारीं कच्चीं द्रव्यें हिरडा, बाभळसाल, धावडयाचीं पानें वगैरे महाराष्ट्रांत विपुल आहेत. महाविदर्भांतहि त्यांची विपुलता आहे. सध्या महाविदर्भांत ६ लहान कांतडी कमावण्याचे कारखाने असून त्यांत चारपांचशें कामगार आहेत. नागपूरजवळ आधुनिक पद्धतीनें मोठ्या प्रमाणावर हे कांतडी कमावण्याचे कारखाने निघणें शक्य आहे. तसेंच मुंबई–महाराष्ट्रांत पुणें, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नंदुरबार, मालेगांव या ठिकाणीं हे कारखाने सुरू करणें शक्य आहे. क्रोम लेदर तयार करण्याचे सध्या २१३ कारखानेच महाराष्ट्रांत आहेत. आणखी असे पांच कारखाने महाराष्ट्रांत काढण्याची शक्यता आहे. कांतडी कमावण्याच्या कारखान्याशेजारींच हे कारखाने काढतां येतील. मोरक्को, कांतडी बॅगसाठीं लागणारे व गुंडाळण्याचें (रोलर) वगैरे उंची जातीचीं कांतडीं तयार करण्याचे कारखाने आधुनिक पद्धतीच्या यंत्रसहाय्यानें मुंबईत काढणें शक्य आहे. नाशिक येथेंहि याचे कारखाने काढतां येतील. गिरण्यासाठीं लागणारे पट्टे वगैरे कांतडी सामान अजून इकडे फारसें तयार होत नाहीं. तेव्हां याचेही कारखाने महाराष्ट्रांत निघणें शक्य आहे. पुणें, कराड, सोलापूर, मालेगांव, नंदुरबार येथें हे सुरू करतां येतील. पाश्चात्य पद्धतीच्या पादत्राणांचा कारखाना पुण्यांत काढणें शक्य आहे. तसेंच हँड बॅग, मनिपर्स, सूट केसेस, औषधांच्या बॅग्ज वगैरे सुंदर कांतडी माल तयार करण्याचे कारखानेहि वरील ठिकाणीं काढणें शक्य आहे.

या कांतडयांच्या कारखान्याशेजारींच सरस (ग्ल्यू) व जिलेटिन तयार करण्याचे कारखाने काढतां येतील. कांतडयाचे तुकडेताकडे व त्याच्या टाकाऊ भागाचा सरस तयार करण्याकडे उपयोग होतो. तसेंच मासे व हाडें यांच्यापासूनहि तो तयार करतां येतो. सरसाचा धंदा हा कांतडी कमावण्याच्या धंद्याचा एक जोड धंदा म्हणतां येईल. सरसाचा उपयोग बहुतेक सर्व महत्त्वाच्या धंद्यांत आहे. सूतगिरण्या फर्निचर, कागद, इत्यादींचे कारखाने, छापखाने, काडयाच्या पेट्या, रंग वगैरे अनेक धंद्यांसाठीं सरसाची जरूरी असते. म्हणून कांतडयाचे कारखाने जेथें निघूं शकतील असें वर म्हटलें आहे त्या ठिकाणीं हे सरसाचे कारखाने काढणें शक्य आहे. देवळाली (नाशिक) व पुणें येथ हे कारखाने निघूं शकतील. जिलेटिन करण्याची पद्धत सरसासारखीच आहे. पण तें करण्यास त्यांतील तज्ज्ञ कामगारांची गरज असते. जिलेटिन हा सरसाचाच अत्यंत स्वच्छ व पांढरा प्रकार आहे. त्याची निर्मिती सरसाच्या

कारखान्यांतून होणें शक्य आहे. मेलेल्या जनावरांच्या आंतड्यापासून कांतडी दोरे ( गट ) तयार करण्याचे कारखानेहि पुणें, अहमदनगर, सोलापूर व मुंबई येथें काढणें शक्य आहे.

हाडांची पूड करण्याचे (खतासाठीं) कारखाने सध्यां मुंबई उपनगर येथें एक व ठाणें येथें एक याप्रमाणें आहेत. यामध्यें १९४४ सालीं अनुक्रमें ४० व ७२ कामगार होते. हाडाच्या गिरण्यांची संख्या आणखी वाढणें शक्य आहे. महाविदर्भात नागपूर व वर्धा येथें यांचे कारखाने काढणें शक्य आहे. तसेंच महाराष्ट्रांतहि ठिकठिकाणीं रेल्वे केंद्रांच्या शेजारीं या कारखान्यांची उभारणी करणें शक्य आहे. हे कारखाने वर्षांतून कांहीं महिनेच चालतात. खेड्यापाड्यांतून हाडें गोळा करून तीं एका मध्यवर्ती ठिकाणीं आणून वाहतुकीच्या व इतर सोयी आहेत अशा ठिकाणीं हे कारखाने निघाल्यास वाया जाणाऱ्या पदार्थांपासून शेतीस लागणारें उत्तम खत मिळेल.

ब्रश तयार करणें, कॅनव्हासचें कापड तयार करणें, ग्रामोफोन रेकॉर्ड तयार करणें, कपडे धुणें, रबराचा माल तयार करणें, दोर तयार करणें व इतर किरकोळ उद्योगधंद्यांचे मुंबई-महाराष्ट्रांत १९४४ सालीं लहानमोठे मिळून १६३ कारखाने होते व त्यांत काम करणारांची संख्या २४०१५ होती. पैकीं १२२ कारखाने ( लहानमोठे मिळून ) मुंबई शहरांत असून त्यांत काम करणारांची संख्या ९४४३ होती. मुंबई उपनगरमध्यें याचे २१ कारखाने ( लहानमोठे मिळून ) होते व त्यांत २३३५ कामगार काम करीत होते. यांपैकीं रबराचे कारखाने मुंबई शहरांत ७ व पुणें येथें एक असून त्यांत काम करणारांची संख्या अनुक्रमें १०१८ व ९३ होती. ग्रामोफोन रेकॉर्डचा मुंबईत एक कारखाना आहे. ब्रशाचे व कॅनव्हासचे मिळून मुंबईत पांच कारखाने असून १ कॅनव्हासचा कारखाना ठाण्यांत आहे. दोरांचे कारखाने मुंबई उपनगरमध्यें एक व ठाणें येथें एक याप्रमाणें आहेत.

रबराच्या कारखान्यांची वाढ महाराष्ट्रांत खूप होणें शक्य आहे. कच्च्या रबराचा पुरवठा दक्षिण हिंदुस्तान, ब्रह्मदेश व मलाया यांतून होणें शक्य आहे. या धंद्यास लागणारीं इतर कच्चीं द्रव्येंहि येथें उपलब्ध आहेत. रबराचे टायर, रबराचे जोडे, यांत्रिक रबराचा माल, लॅटेक्स रबराचे फुगे व इतर वस्तू इत्यादींचे कारखाने महाराष्ट्रांत काढणें शक्य आहे. या कारखान्यासाठीं विशेष वाकबगार असा कामगारवर्ग लागत नाहीं. पण यास पाण्याची फार गरज असते. सायकलीच्या टायर व ट्यूब करण्याचे कारखाने कल्याण-अंबरनाथ भागांत व पुणें येथें सुरू करणें शक्य आहे. लॅटेक्स रबराचे कारखाने कुठेंहि काढतां येण्यासारखे आहेत व तो एक घरगुती ( कॉटेज ) धंदा म्हणून महाराष्ट्रांत सुरू करणें शक्य आहे. रबराचे जोडे, यांत्रिक रबराचा माल, रबरप्रूफ माल ( वरून रबराचें आवरण असलेला ) इ. चे कारखाने पुणें, सोलापूर व कल्याण-अंबरनाथ या भागांत काढणें शक्य आहे.

लॅटेक्स रबराचे, हातमोजे, फुगे, दुधाच्या बाटल्यांची बोंडें (निपल्स), पेसरी, ड्रॉपर्स, फौन्टनपेन ट्यूब्स, इत्यादि अनेक वस्तु करण्याचे कारखाने निघणें शक्य आहे.

इतर किरकोळ स्टेशनरी टॉयलेट, फेस पावडर, ब्रिलियन्टाईन, स्नो, वगैरेंचे कारखाने अलीकडे महाराष्ट्रांत निघूं लागले आहेत व त्यांची अजून पुष्कळ वाढ होण्यासहि अवसर आहे.

महाविदर्भांतील उद्योगधंद्यांची अलीकडील अधिकृत माहिती उपलब्ध झाली नाहीं. जी थोडीफार झाली ती वर दिलीच आहे.

मोठ्या प्रमाणावर संयुक्त महाराष्ट्रांत चालू असलेले कारखाने व त्यांची वाढ होण्याची शक्यता यांची माहिती वर दिलेली आहे. संयुक्त महाराष्ट्रांत घरगुती धंद्यांनाहि पुष्कळ वाव आहे. जुन्या पद्धतीनें चालणारे घरगुती धंदे, त्यांतील कामगारांना त्या धंद्यांचे शास्त्रीय शिक्षण देऊन, चांगल्या व किफायतशीर रीतीनें चालविणें शक्य आहे. महाराष्ट्रांतील कोष्टी लोकांचा विणकाम हा एक घरगुती धंदा आहे. त्याची सुधारणा करून कोष्टयांना फ्लाय शट्ल् व ऑटोमॅटिक माग वापरावयास दिल्यास त्यांचा धंदा किफायतशीर होणें शक्य आहे. तसेंच खेड्यापाड्यांतून वीज उपलब्ध झाल्यास पॉवरचे मागहि तेथें सुरू करणें शक्य आहे. लोंकरीचें विणकाम करणाऱ्या लोकांचा धंदा त्यांना फ्लाय शट्ल् व ऑटोमॅटिक माग देऊन आणि लोकरीच्या पद्धतशीर व निरनिराळ्या तऱ्हेच्या विणकामाची माहिती देऊन या धंद्याची किफायतशीर वाढ करणें शक्य आहे. होजियरीचा (फ्रॉक, पायमोजे वगैरे विणण्याचा) धंदा घरगुती रीतीनें विशेषतः स्त्रियांना करतां येणें शक्य आहे.

रेशमी किड्यापासून रेशीम तयार करण्याचा धंदा एक घरगुती धंदा म्हणून करतां येण्यासारखा असून सातारा, नाशिक व पुणें जिल्ह्यांत या धंद्याची सुरुवात करणें शक्य आहे. जुन्या पद्धतीनें 'जर' तयार करणाऱ्या लोकांना नवीन शास्त्रीय पद्धतीचें शिक्षण देऊन या धंद्याची एक घरगुती धंदा म्हणून वाढ होणें शक्य आहे. घायपात, अंबाडी वगैरेंचा 'वाख' काढून त्याचे दोर करण्याचा धंदा हा एक घरगुती धंदा म्हणून महाराष्ट्रांत चालू आहे व त्याची वाढ होणें शक्य आहे. तसेंच घायपाताच्या धाग्यापासून निरनिराळ्या तऱ्हेचे कलाकौशल्याचे पदार्थ करतां येणें शक्य आहे. कोंकणामध्यें काथ्या तयार करणें हा एक घरगुती धंदा आहे. हातकागद तयार करण्याचे घरगुती धंदे आज जुन्नर, एरंडोल वगैरे ठिकाणीं चालू आहेत. कांहीं विशिष्ट प्रकारचा म्हणजे ड्रॉइंग पेपर, ब्लॉटिंग पेपर, दस्तऐवजाचा कागद वगैरेसारखे कागद तयार केल्यास हा कागदाचा घरगुती धंदा किफायतशीर होईल.

खेड्यांतील चांभारांना कातड्याच्या टाकाऊ मालापासून सरस करण्याचें शिक्षण दिलें तर तो एक घरगुती धंदा म्हणून करतां येण्यासारखा आहे, बांबू व वेता-

पासून निरनिराळे पदार्थ करण्याचा धंदा जंगल भागांतील खेड्यांतून करता येण्यासारखा आहे. लाखेचा धंदाहि खानदेश व विशेषतः महाविदर्भातील बस्तर संस्थान या प्रदेशांत घरगुती रीतींनं वाढविणें शक्य आहे. लाखेपासून तयार होणारे निरनिराळे जिन्नस करण्याचें शिक्षण खेड्यांतील लोकांस दिल्यास या धंद्याची खूप वाढ होण्यास अवसर आहे. कुंभाराचा धंदा एक घरगुती धंदा म्हणून महाराष्ट्रांत चालू आहेच. त्यांना ग्लेझ माल व आधुनिक तऱ्हेची चिनी मातीचीं भांडीं तयार करण्याचें शिक्षण दिल्यास या धंद्याची विशेषतः रत्नागिरी व बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर येथें वाढ होणें शक्य आहे. बांगड्या तयार करण्याचा धंदा हा एक घरगुती धंदा म्हणून महाराष्ट्रांत कांचेच्या कारखान्यांच्या जवळपासच्या खेड्यांतून करणें शक्य आहे. फळें व फळांचे रस टिकाऊ करण्याचा धंदा घरगुती धंदा म्हणून रत्नागिरी व अहमदनगर या जिल्ह्यांतून करता येणें शक्य आहे. हे पदार्थ टिकाऊ करण्याचें शिक्षण खेड्यांतील लोकांना देऊन या धंद्याची तेथें खूप वाढ होणें शक्य आहे. तेल गाळण्याचा तेल्याचा घरगुती धंदा त्याला नवीन पद्धतीच्या घाण्यांचा वापर करावयास शिकवून सुधारणें शक्य आहे. इतरहि निरनिराळे हस्तकौशल्याचे धंदे, त्यांचे शिक्षणाची सरकारनें ठिकठिकाणीं सोय करून दिल्यास, महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं सुरू करणें शक्य आहे. मध तयार करण्याचा धंदा, त्याचें पद्धतशीर शिक्षण देऊन सह्याद्रीचे भागांत एक घरगुती धंदा म्हणून त्याची खूप वाढ होणें शक्य आहे.

---

टीपः—या प्रकरणांतील उद्योगधंद्यांच्या वाढीसंबंधीची माहिती मुंबई सरकारनें नेमलेल्या Provincial Industries Committeeच्या Sub-Committeesच्या Textile Industries, Miscellaneous Industries, Chemical Industries, Metals and Engineering Industries, Cottage and Small Scale Industries संबंधींच्या अहवालांच्या आधारें व ह्याच कमिटीच्या Special Sub-committee च्या अहवालाच्या आधारें दिली आहे. महाविदर्भाची माहिती Report of the Provincial Industries Committee of the Central Provinces याचे आधारें दिली आहे. साखरेच्या कारखान्यांची माहिती व सुताच्या गिरण्यांसंबंधींची माहिती M. P. Gandhi यांच्या Indian Sugar Annual व Indian Textile Industries Annual पुस्तकांच्या आधारें दिली आहे. चालू धंद्यांची आंकडेवार माहिती फॅक्टरी ॲक्ट ॲड्मिनिस्ट्रेशन रिपोर्ट ( १९४४ ) वरून घेतली आहे. मुंबई सरकारनें नेमलेल्या Industrial and Economic Survey Committee च्या अहवालांचाहि उपयोग केला आहे.

संयुक्त महाराष्ट्रांतील बँकिंग ( पेढीच्या ) धंद्यासंबंधींची थोडक्यांत कल्पना येण्याचे दृष्टीनें पुढील माहिती दिली आहे. उद्योगधंदे व व्यापार यांच्या वाढीस बँकांची अत्यंत आवश्यकता असते. उद्योगधंदे व व्यापार यांची वाढ व बँकांची वाढ हीं परस्परावलंबी आहेत. मुंबई शहर हें हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांचें व व्यापाराचें एक प्रमुख केंद्र असल्यामुळें बँकिंगच्या धंद्याचा बराचसा व्याप मुंबई शहरामध्यें आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतूनहि आतां बँकिंगचा धंदा वाढीस लागला आहे.

रिझर्व्ह बँकेतर्फे त्रैवार्षिक प्रसिद्ध होणाऱ्या बँकासंबंधींच्या अहवालावरून ( Banking Statistics ) पुढील माहिती दिली आहे. १९४६ सालीं प्रसिद्ध झालेल्या अहवालांतील ही माहिती आहे. १९४५ च्या बँकांच्या जमाखर्चाच्या तक्त्यावरून हे आंकडे घेतले आहेत.

ज्यांचें वसूल झालेलें भांडवल ( पेड्‌ अप्‌ कॅपिटल ) व गंगाजळी ( रिझर्व्ह ) मिळून पांच लाख रु. व त्याहून अधिक आहे अशा शेडयूल्ड बँका (वर्ग अ १).

(आंकडे हजार रुपयांचे आहेत)

| ठिकाण | नांव | वसूल झालेलें भांडवल | गंगाजळी |
|---|---|---|---|
| १ मुंबई | युनियन बँक ऑफ इंडिया | ३९९० | १६२५ |
| २ ,, | न्यू सिटिझन बँक | १००९ | ७६ |
| ३ ,, | नॅशनल सेव्हिंग्ज बँक | २८६६ | ५२४ |
| ४ ,, | हबीब बँक | ५००० | ७५० |
| ५ ,, | गडोदिया बँक | ७१९ | |
| ६ ,, | एक्सचेंज बँक ऑफ इंडिया आणि आफ्रिका | २५०० | ४० |
| ७ ,, | डिस्काऊंट बँक | १०२९ | |
| ८ ,, | देवकरण नानजी बँक | ५००० | १२०० |
| ९ ,, | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | २५१२७ | २७४३१ |
| १० ,, | बँक ऑफ इंडिया | १४८८४ | १८९३४ |
| ११ ,, | असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन | ६२५ | ३१ |
| १२ अकोला | लक्ष्मी बँक | २५०० | ९० |
| १३ वर्धा | बँक ऑफ नागपूर | ९८७ | ६० |
| १४ पुणें | बँक ऑफ महाराष्ट्र | १२५० | ३७९ |

ज्यांचें वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी मिळून पांच लाख रु. व त्यापेक्षा जास्त आहे अशा नॉन शेडयूल्ड बँका ( वर्ग अ २ ).

(आंकडे हजार रुपयांचे)

| ठिकाण | नांव | वसूल झालेलें भांडवल | गंगाजळी |
|---|---|---|---|
| १ मुंबई | ऑफ बँक | ६०० | ५ |
| २ ,, | नॅशनल सिक्युरिटी बँक | ५५६ | १७ |
| ३ सातारा | युनायटेड वेस्टर्न बँक | ४९९ | ५६ |
| ४ पुणें | * प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक | ४८९ | ३८ |
| ५ कोल्हापूर | बँक ऑफ कोल्हापूर | २०३ | ३९५ |
| ६ औरंगाबाद | बँक ऑफ औरंगाबाद | ५०४ | ... |

ज्यांचें वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी मिळून १ लाख ते ५ लाख रु. आहे अशा बँका (वर्ग ब).

| | | | |
|---|---|---|---|
| १ सांगली | सांगली बँक | २०० | १९० |
| २ नागपूर | सेफ बँक | २५७ | — |
| ३ पुणें | केरिंग रूपचंद आणि कं. बँकर्स | १०० | — |
| ४ ,, | भारत इंडस्ट्रियल बँक | ९७ | ६ |
| ५ पनवेल | बंथिया बँक | १४१ | ४ |
| ६ औंध | बँक ऑफ औंध | १४२ | ३९ |

ज्यांचे वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी मिळून ५० हजार ते एक लाख रुपये आहे अशा बँका ( वर्ग—क ).

| | | | |
|---|---|---|---|
| १ सातारा | स्वदेशी कमर्शिअल बँक | ३६ | ४७ |
| २ बार्शी | बँक ऑफ बार्शी | ५५ | ६ |
| ३ मुंबई | मॉडेल बँक ऑफ बार्शी | ४२ | १० |

ज्यांचें वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी मिळून ५ लाख व त्यापेक्षा अधिक रुपये आहे अशा कोऑपरेटिव्ह ( सहकारी ) बँका ( वर्ग अ ).

| | | | |
|---|---|---|---|
| १ मुंबई | मुंबई प्रॉव्हिंशियल को. बँक | १९९६ | ४८९ |
| २ ,, | मुं. प्रॉव्हिंशियल लँड मॉर्टगेज बँक | ५०१ | २४ |
| ३ ,, | शामराव विठ्ठल को. बँक | १३९ | १७१ |
| ४ जळगांव | पूर्व खानदेश को. बँक | ६१५ | ३९६ |
| ५ पुणें | पुणें जिल्हा सेंट्रल को. बँक | ३९५ | १८० |
| ६ उमरावती | उमरावती सें. को. बँक | १५ | १ |
| ७ नागपूर | सी. पी. बेरार प्रॉ. को. बँक | ६७८ | ३६२ |

* ही बँक आतां वर्ग अ १ शेडयूल्ड बँक झाली आहे.

ज्यांचे वसूल झालेलें भांडवल व गंगाजळी मिळून १ लाख ते ५ लाख रु. आहे अशा ब वर्गांतील कोऑपरेटिव्ह बँका संयुक्त महाराष्ट्रांत एकंदर २८ आहेत. अर्बन कोऑपरेटिव्ह बँका अगर निरनिराळ्या समाजांनीं व वर्गांनीं काढलेल्या को. बँका यामध्यें येतात. मुंबई-महाराष्ट्रांत यांची संख्या मुंबई शहर २ व इतर जिल्हे १५, महाविदर्भ ६ व मराठवाडा ५, याप्रमाणें आहे.

संयुक्त महाराष्ट्रांतील विम्याच्या धंद्याची थोडीफार माहिती पुढें दिली आहे. मुंबई शहर हें हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांचें व व्यापाराचें केंद्र असल्यामुळें मुंबई शहरांतच सर्व तऱ्हेच्या मिळून एकंदर ६९ विमा कंपन्या आहेत. त्यांपैकीं ज्यांची माहिती मिळाली आहे अशा ४६ आयुष्याचा विमा उतरविणाऱ्या असून १५ कंपन्या निव्वळ आग, मोटार, आगबोटी, इ. च्या विमा उतरविणाऱ्या आहेत. आयुष्याचा विमा उतरविणाऱ्या कांहीं कंपन्या आग, मोटार, आगबोटी वगैरेंचेही विमे उतरवितात. मुंबईच्या खालोखाल पुणें येथें विमा कंपन्या असून त्यांत आयुष्याचा विमा उतरविणाऱ्या ७ कंपन्या आहेत व एक निव्वळ मोटारीचा विमा उतरविणारी कंपनी आहे. नाशिक व सातारा येथें प्रत्येकीं एक विमा कंपनी असून त्या आयुष्याचा विमा उतरवितात. महाविदर्भांत नागपूर येथें ३ विमा कंपन्या आहेत. रत्नागिरी येथें एक मोटारीचा विमा उतरविणारी कंपनी आहे. याखेरीज प्रॉव्हिडंट विमा कंपन्या मुंबई शहरांत २३, पुणें १, कराड (सातारा जिल्हा) १, नाशिक १, पूर्व खानदेश १, ठाणें १ व महाविदर्भांत नागपूर येथें २ याप्रमाणें आहेत.

मुंबई शहरांतील आयुष्याच्या विमा कंपन्यांचा एकंदर चालू धंदा (Business in Force) १९४६ अखेर ३,२३,४१,०२,००० रु. चा झालेला आहे.

पुणें येथील सात आयुष्याच्या विमा कंपन्यांचा चालू धंदा १९४६ अखेर ४,७४,५२,००० रु. चा झाला आहे. सातारा येथील कंपनीचा १९४६ अखेर चालू धंदा १०,००,५४,००० रु. चा झाला आहे. नाशिकच्या कंपनीचा चालू धंदा १९४६ अखेर १,१६,२६,००० रु. चा झाला आहे. नागपूरच्या तीन कंपन्यांपैकीं दोन कंपन्यांचा चालू धंदा १९४५ अखेर ६३,५७,००० रु. चा झाला आहे.

विमा कंपन्यांची त्यांच्या चालू धंद्याचे दृष्टीनें वर्गवारी केल्यास मुंबई शहरांत १ ते १० लाखांच्या ४; १० ते ५० लाखांच्या १३; ५० लाख ते १ कोटीच्या ९; १ कोटी ते २ कोटिंच्या ८, २ ते ३ कोटिंच्या ३; ३ ते ५ कोटींच्या २; ५ ते १० कोटिंच्या २; १० ते २० कोटिंची १; २० ते ४० कोटिंच्या ३; व एक अब्जाचे वरची १ (ओरिएंटल विमा कं.) याप्रमाणें आहेत. पुण्याच्या ७ कंपन्यांपैकीं ६ कंपन्या १० लाख ते ५० लाख या वर्गांत येतात व १ कंपनी (कॉमनवेल्थ) २ ते ३ कोटिंच्या वर्गांतील आहे. नाशीकची कंपनी १ ते २ कोटिंच्या वर्गांत येते व सातारा येथील कंपनी १० ते २० कोटींच्या वर्गांत येते. नागपूरच्या विमा कंपन्यांपैकीं एक १ ते १० लाखांच्या वर्गांत व दुसरी ५० लाख ते एक कोटींच्या वर्गांत येते.

संयुक्त महाराष्ट्रातील चालू उद्योगधंदे व त्यांची वाढ होण्याची शक्यता, तसेंच नवीन सुरू करतां येण्यासारखे उद्योगधंदे यांची माहिती या प्रकरणांत दिल्यानंतर बँकिंग व विमा या दोन प्रमुख व्यापारधंद्यांची माहितीहि दिली आहे. संयुक्त महाराष्ट्रांतील व्यापारधंद्यासंबंधींची संपूर्ण माहिती येथें देण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. बँका व विमा यांखेरीज इतर व्यापारव्यवसाय करणाऱ्या मोठमोठ्या सामायिक भांडवलाच्या कंपन्या व खाजगी व्यक्ति संयुक्त महाराष्ट्रांत असून व्यापाराचें क्षेत्रांत संयुक्त महाराष्ट्राची अलीकडे प्रगतीच झाली आहे असें दिसून येईल. संयुक्त महाराष्ट्रांतील मुंबई शहरांतच हिंदुस्थानच्या अर्धाअधिक व्यापार केंद्रित झाला आहे असें म्हटलें तरी चालेल. विस्तारभयास्तव व्यापारविषयक सविस्तर माहिती येथें दिली नाहीं. आणि ती सर्व माहिती येथें देण्याची जरूर आहे असें वाटत नाहीं.

संयुक्त महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न, शेतीचें उत्पन्न, संयुक्त महाराष्ट्रांतील उद्योगधंदे व प्रमुख व्यापारव्यवसाय यांच्या येथें दिलेल्या माहितीवरून ' संयुक्त महाराष्ट्र ' हा नवीन भाषावार प्रांत निर्माण केला गेल्यास तो खात्रीनें स्वावलंबी होऊन आपला सर्वांगीण उत्कर्ष साधूं शकेल असें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. हिंदी संघराज्याच्या राजकीय संसारांत संयुक्त महाराष्ट्राला एक प्रतिष्ठेचें व मानाचें स्थान मिळण्यास कांहींच हरकत नाहीं, हें यावरून दिसून येईल. हिंदी संघराज्यांतील एक स्वतंत्र प्रांत म्हणून नांदण्यास आवश्यक असणाऱ्या भौतिक गोष्टींचाच तेवढा येथें विचार केला आहे. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक स्थितीसंबंधानें त्याचा एक स्वतंत्र प्रांत होण्याचे दृष्टीनें कांहीं विचार करण्याची आवश्यकता आहे अशी बिलकूल स्थिति नाहीं. महाराष्ट्राइतकी सांस्कृतिक व सामाजिक प्रगति हिंदी संघराज्यांतील फारच थोड्या प्रांतांची झालेली आहे. संयुक्त महाराष्ट्रांतील शिक्षणसंस्था, संशोधन संस्था, सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था, लोकजागृति व ज्ञानप्रसार करणारीं नियतकालिकें, वृत्तपत्रें व वाचनालयें ह्या सर्वांचा विस्तार व व्याप पाहिला असतां महाराष्ट्र या बाबतींत आघाडीवरील प्रांत आहे असेंच दिसून येईल.

# संयुक्त महाराष्ट्राचें हवामान

संयुक्त महाराष्ट्रांतील हवामान व पाऊस यांची माहिती पुढें दिली आहे. १९४० सालापूर्वीच्या ५० वर्षांचे पावसाचे प्रमाणावरून ही पावसाची वार्षिक सरासरी काढण्यांत आली आहे.

| नं. | जिल्हे | पाऊस (इंचांत) | नं. | जिल्हे | पाऊस (इंचांत) |
|---|---|---|---|---|---|
| १ | प. खानदेश | २५·४६ | ७ | सावंतवाडी | १७६·३८ |
| २ | पू. खानदेश | २८·१८ | १ | चांदा | ५४·८८ |
| ३ | नाशिक | ४१·६७ | २ | भंडारा | ५७·२० |
| ४ | अहमदनगर | २२·६२ | ३ | वर्धा | ४१·४० |
| ५ | पुणें | २६·५६ | ४ | नागपूर | ४६·१८ |
| ६ | सोलापूर | २३·२३ | ५ | अकोला | ३२·८१ |
| ७ | सातारा | ३१·६७ | ६ | उमरावती | ३३·३२ |
| ८ | बेळगांव | ४१·८६ | ७ | बुलढाणा | ३१·२२ |
| ९ | कोल्हापूर | ७०·८२ | ८ | यवतमाळ | ३८·८४ |
| १० | द. संस्थानें | २५·३५ | १ | औरंगाबाद | २८·२९ |
| १ | ठाणें | ८७·९८ | २ | बिदर | ३३·७४ |
| २ | मुंबई | ७१·२१ | ३ | बीड | २७·८६ |
| ३ | मुंबई—उपनगर | ८१·७० | ४ | नांदेड | ३८·९८ |
| ४ | कुलाबा | १२३·१५ | ५ | उस्मानाबाद | ३३·१८ |
| ५ | रत्नागिरी | ११९·७८ | ६ | परभणी | ३५·६७ |
| ६ | कारवार | १०६·८६ | | | |

हवेंतील आर्द्रता ( **Relative Humidity** ) दाखविणारे आंकडे पुढीलप्रमाणें

| ठिकाण | किमान | कमाल | वार्षिक | ठिकाण | किमान | कमाल | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अकोला | १७ | ७० | ३८ | अहमदनगर | १४ | ६५ | ३५ |
| उमरावती | ... | ... | ... | पुणें | १९ | ७८ | ४३ |
| नागपूर | १९ | ७६ | ४३ | सोलापूर | १७ | ६० | २६ |
| चांदा | १८ | ७४ | ४६ | मिरज | २७ | ७७ | ४६ |
| मुंबई | ५९ | ८४ | ६९ | औरंगाबाद | १६ | ७० | ३७ |
| रत्नागिरी | ५९ | ८७ | ७१ | महाबळेश्वर | ४१ | १०० | ६७ |
| मालेगांव | १८ | ६५ | ३७ | बेळगांव | २९ | ९० | ५५ |

संयुक्त महाराष्ट्रांतील निरनिराळ्या प्रमुख ठिकाणांचें वार्षिक किमान व कमाल सरासरी उष्णतामान तसेंच त्यांचें उन्हाळ्यांतील व हिंवाळ्यांतील कमाल व किमान उष्णतामान खालीं दिलें आहे.

| शहर | वार्षिक कमाल | वार्षिक किमान | एप्रिल—मे कमाल | एप्रिल—मे किमान | डि.-जाने. कमाल | डि.-जाने. किमान |
|---|---|---|---|---|---|---|
| अकोला | ९३·३ | ६७·८ | १०८·२ | ८१·३ | ८४·७ | ५३·३ |
| उमरावती | ९२·० | ६९·६ | १०७·६ | ८०·७ | ८३·२ | ५८·४ |
| नागपूर | ९२·१ | ७०·१ | १०८·७ | ८२·७ | ८१·७ | ५७·२ |
| चांदा | ९२·६ | ६८·८ | १०९·४ | ८२·१ | ८२·५ | ५२·८ |
| मुंबई | ८६·८ | ७३·८ | ९१·१ | ७९·६ | ८३·१ | ६८·८ |
| अलिबाग | ८५·८ | ७२·६ | ८८·९ | ७९·१ | ८२·६ | ६३·५ |
| रत्नागिरी | ८६·९ | ७३·४ | ९०·३ | ७९·८ | ८५·५ | ६७·१ |
| मालेगांव | ९२·२ | ६५·२ | १०५·० | ५२·३ | ८५·० | ७५·१ |
| अहमदनगर | ८९·८ | ६४·२ | १०१·९ | ७२·१ | ८३·१ | ५२·९ |
| पुणें | ८९·४ | ६४·४ | १००·९ | ७३·५ | ८४·९ | ५३·० |
| सोलापूर | ९२·७ | ६८·५ | १०४·७ | ७७·७ | ८७·४ | ५८·५ |
| मिरज | ८८·६ | ६६·० | ९९·२ | ७२·५ | ८४·० | ५७·० |
| औरंगाबाद | ९०·४ | ६६·५ | १०३·५ | ७५·८ | ८३·५ | ५५·८ |
| महाबळेश्वर | ७४·५ | ६१·० | ८५·४ | ६६·१ | ७२·७ | ५६·५ |
| जळगांव | ... | ६७·७ | १०८·७ | ८०·३ | ८८·० | ५३·१ |